सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर २०२५ वर्ष - तिसरे अंक २१८ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### दर्जेदार विकासकामांनी नाशिकला सुंदर आणि आधुनिक शहर करणार-मुख्यमंत्री



नाशिक, १३ नोव्हेंबर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते येत्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे आणि नाशिक महानगरपालिका तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने होणाऱ्या नाशिक शहरातील पाच हजार ६५७ कोटी ८९ लाख रुपये खर्चाच्या विकासकामांचे भूमीपूजन करण्यात आले. सिंहस्थ कुंभमेळ्याची कामे दर्जेदार आणि पारदर्शक पद्धतीने करून नाशिकला सुंदर आणि आधुनिक शहर करणार, अशी ग्वाही फडणवीस यांनी यावेळी दिली. यावेळी ते म्हणाले की प्रयागपेक्षा तीन पट जास्त गर्दी नाशिक मध्ये होणार असल्याने तसे नियोजन केले जात आहे. ठक्कर मैदान येथे आयोजित या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कुंभमेळा मंत्री गिरीष महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे, खासदार राजाभाऊ वाजे, खासदार शोभा बच्छाव, राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार व नगर विकास विभागाचे अपर सचिव गोविंदराज (दूरदृष्यप्रणालीद्वारे), जिल्ह्याचे पालक सचिव एकनाथ डवले, नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.प्रविण गेडाम, आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते. मागील कुंभमेळ्याचे चांगले आयोजन करण्यात आल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यावेळी कुंभमेळ्यात गतवेळेपेक्षा पाचपट अधिक भाविक येण्याची शक्यता आहे.

### जळगावला ९.१ अंश तापमान

जळगाव, १३ नोव्हेंबर : पुढील दोन ते तीन दिवसांत मध्य प्रदेश आणि छत्तीसगडच्या काही भागात थंडीची लाट येण्याची आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात रात्रीचे तापमान कमी होण्याची शक्यता आहे, अशी माहिती ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञांनी दिली आहे. जळगावात तीव्र थंडीची लाट असून नाशिक आणि यवतमाळ थंडीच्या लाटेकडे झुकत आहे. जळगावला ९.१ अंश तापमान नोंदवले गेले. डहाणू, नाशिक, मालेगाव, बीड, यवतमाळ शहरांबरोबरच विदर्भातील शहरात व लगतच्या परिसरात थंडीच्या लाटेसदृश स्थिती अनुभवली गेली. नाशिक, अहिल्यानगर, सांगली, सोलापूरसह संपूर्ण विदर्भ, मराठवाडा आणि खान्देशमधील जिल्ह्यांमध्ये शनिवारपर्यंत थंडी जाणवेल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.जळगाव जिल्ह्यात २० ते २५ नोव्हेंबरपर्यंत थंडीचा कडाका कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे जळगावकरांना महिनाभर तरी थंडीचा सामना करावा लागणार आहे.

### सोन्याच्या दरात घसरण

जळगाव , १३ नोव्हेंबर : गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या भाववाढीत चांदीत वाढ कायम राहत ती २ हजार रुपयांनी वधारून १ लाख ५८ हजार ५०० रुपयांवर पोहोचली आहे. तर सोन्याच्या भावात ५०० रुपयांची घसरण होऊन ते १ लाख २३ हजार ८०० रुपयांवर आले आहे. ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून घसरण सुरू झालेल्या सोने-



चांदीच्या भावात १० नोव्हेंबरपासून पुन्हा भाववाढ सुरू झाली. त्यामुळे दोन दिवसांत सोन्याच्या भावात चार हजार रुपयांची वाढ होऊन ११ नोव्हेंबर रोजी ते एक लाख २४ हजार ३०० रुपयांवर पोहोचले होते. मात्र १२ नोव्हेंबर रोजी त्यात ५०० रुपयांची घसरण होऊन ते एक लाख २३ हजार ८०० रुपये प्रति तोळा झाले. दुसरीकडे मात्र चांदीच्या भावात वाढ सुरूच आहे. १० व ११ नोव्हेंबर या दोन दिवसांत चांदीमध्ये सात हजार ५०० रुपयांची वाढ झाली. त्यामुळे ११ रोजी चांदी एक लाख ५६ हजार ५०० रुपयांवर पोहोचली. पुन्हा दोन हजार रुपयांची वाढ होऊन ती एक लाख ५८ हजार ५०० रुपये प्रति किलोवर पोहोचली. तीन दिवसांत चांदीमध्ये तब्बल नऊ हजार ५०० रुपयांची वाढ झाली आहे.

### मतमोजणीसाठी ४६ केंद्रांवर तयारी पूर्ण

पाटणा, १३ नोव्हेंबर : बिहार विधानसभा निवडणुकीची उद्या, शुक्रवारी मतमोजणी होणार आहे. त्यासाठी राज्यात ४६ केंद्रांवर मतमोजणीची तयारी पूर्ण झाली आहे. शुक्रवारी सकाळी ८ वाजता मतमोजणी सुरू होईल, प्रथम पोस्टल मतपत्रिका मोजल्या जातील. निवडणूक आयोगाने मुक्त आणि निष्पक्ष मतदान सुनिश्चित करण्यासाठी कडक सूचना जारी केल्या आहेत. कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. बिहारमध्ये विधानसभेच्या २४३ जागांवर २ टप्प्यात मतदान घेण्यात आले. पहिल्या टप्प्यात ६ नोव्हेंबर रोजी १२१ आणि दुसऱ्या टप्प्यात ११ तारखेला १२२ जागांवर मतदान झाले. बिहारमध्ये २०३ सामान्य श्रेणीच्या जागा, अनुसूचित जातीच्या ३८ जागा आणि अनुसूचित जमातीच्या २ जागा आहेत. याजांचा निकाल शुक्रवारी १४ नोव्हेंबर रोजी जाहीर होणार आहे.

# दक्षिण भारतात पाऊस आणि उत्तरेत बर्फवृष्टीचा इशारा

## हवामान खात्याने अनेक राज्यांसाठी पाऊस आणि बर्फवृष्टीचा इशारा दिला

नवी दिल्ली, १३ नोव्हेंबर : दिल्ली-एनसीआरसह संपूर्ण देशात थंडीचा प्रभाव वाढत आहे. हवामान खात्याने अनेक राज्यांसाठी पाऊस आणि बर्फवृष्टीचा इशारा दिला आहे. दरम्यान, पश्चिम मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमध्ये थंडीची लाट येण्याची शक्यता आहे.

दिल्ली-एनसीआरसह देशातील अनेक राज्यांमध्ये थंडीचा प्रकोप वाढत चालला आहे. पश्चिम मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमध्ये १५ नोव्हेंबरपर्यंत थंडीच्या लाटेचा इशारा दिला आहे. तामिळनाडू, केरळ आणि पुदुचेरीमध्ये गुरुवारी आणि शुक्रवारी हलक्या पावसाची शक्यता आहे. तर उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात बर्फवृष्टीचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, दक्षिण भारतातील राज्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. येत्या २४तासांत केरळ, तामिळनाडू आणि अंदमान-निकोबार बेटांवर हलका ते मध्यम पाऊस होण्याचा अंदाज आहे. उत्तर तामिळनाडू, दक्षिण केरळ आणि लक्षद्वीप येथेही हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे.

उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात हिमवर्षावाची शक्यता व्यक्त केली आहे. लाहौल-स्पीती आणि



मनाली येथे जड बर्फवृष्टी होण्याचा अंदाज आहे. हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडच्या अनेक भागांत किमान तापमान शून्य अंशाच्या खाली गेले आहे. उत्तराखंडातील चमोली, नैनीताल, मसूरी आणि रुद्रप्रयाग येथे थंडीची लाट अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. या राज्यांमध्ये शीतलहरमुळे तापमान आणखी खाली जाण्याचा अंदाज आहे.

दिल्ली-एनसीआर मध्ये हवामानापेक्षा प्रदूषणाची समस्या गंभीर बनली आहे. येथे धुक्यासोबतच स्मॉगनेही वातावरण व्यापले आहे. दिल्लीचा एक्यूआय अत्यंत गंभीर श्रेणीत (४१८) नोंदवला आहे, असे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) म्हटले आहे हवामान विभागाच्या मते, जम्मू-काश्मीरमध्ये १६ नोव्हेंबर रोजी पुन्हा सक्रिय होणाऱ्या पश्चिमी विक्षोभामुळे हलक्या वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. काही ठिकाणी हिमवृष्टी आणि दाट धुक्याची स्थिती राहील.

उत्तर प्रदेशातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये हवामान स्वच्छ आहे. जोरदार ऊन असल्याने दिवसाचे तापमान सामान्य आहे, परंतु पछाड वाऱ्यांमुळे किमान तापमानात सलग दुसऱ्या दिवशी घट झाली आहे. हवामान खात्यानुसार, आज, गुरुवारपासून लखनऊसह पूर्व उत्तर प्रदेशातील बहुतेक जिल्ह्यांमध्ये हलकी थंडी वाढेल. किमान तापमानात तीन अंश सेल्सियसपर्यंत घट होण्याचा अंदाज आहे. बिहारमध्ये तापमानात चढ-उतार सुरूच आहेत. सकाळ-संध्याकाळ धुके आणि थंडी जाणवते, तर दिवसा हलकी उष्णता जाणवते. हवामान विभागानुसार, डिसेंबरपासून पश्चिमी विक्षोभामुळे थंडी वाढण्याची शक्यता आहे.

# जालना महापालिकेवर भगवा फडकणारच - एकनाथ शिंदे

जालना, १३ नोव्हेंबर : जालना शहरात शिवसेनेचा कार्यकर्ता व पदाधिकारी मेळावा शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या मेळाव्याला जिल्ह्यातील हजारो शिवसैनिक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्यात शिवसेना उबाठा जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे जिल्ह्यातील शिवसेनेची



संघटनात्मक ताकद अधिक भक्कम झाले.

मेळाव्यात बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे म्हणाले, जालना शहरात जमलेला जनसागर पाहून खात्री पटते की आगामी निवडणुकांमध्ये जालना महापालिकेवर भगवा फडकणारच आहे. आमदार अर्जुनराव खोतकर, भास्कर आंबेकर आणि कार्यकर्ते जर मैदानात उतरले, तर विरोधकांचे डिपॉझिट जप्त झाल्याशिवाय राहणार नाही. शिवसैनिक पेटला की मागे फिरत नाही. बूथप्रमुख हा पक्षाचा खरा कणा आहे. प्रत्येक बूथवर 'सगळ्यात मजबूत कोण?' अशी स्पर्धा लागली पाहिजे.

त्यांनी पुढे जालना जिल्ह्याच्या विकासाबाबत सांगितले की, जालना-नांदेड समृद्धी महामार्गावरील शेतकऱ्यांना न्याय मिळेल, महात्मा फुले मार्केट, सिडको, पाणीपुरवठा व नगरविकासासाठी निधी उपलब्ध केला जाईल. झोपडपट्टीतील २.५ लाख नागरिकांना हक्कपत्र देण्याचा निर्णय सरकारने घेतला असून, जालना शहराचा विकास आणखी वेगाने होईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

# राष्ट्रवादी काँग्रेसकडून ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर

मुंबई, १३ नोव्हेंबर - आगामी नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून ४० स्टार प्रचारकांची यादी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी जाहीर केली आहे.

या स्टार प्रचारकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, माजी मंत्री धनंजय मुंडे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, महिला व बालविकास मंत्री अदितीताई तटकरे, पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक, माजी मंत्री धर्मरावबाबा आत्राम, माजी मंत्री अनिल भाईदास पाटील, माजी मंत्री संजय बनसोडे, आमदार प्रताप पाटील - चिखलीकर, माजी मंत्री नवाब मलिक, नेते सयाजी शिंदे, अल्पसंख्याक महामंडळाचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले, माजी खासदार समीर भुजबळ, आमदार अमोल मिटकरी, आमदार सना मलिक - शेख, महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर, आमदार इद्रीस नायकवडी, माजी आमदार अनिकेत तटकरे, माजी आमदार झिशान सिद्दीकी, माजी आमदार राजेंद्र जैन, मुंबई कार्याध्यक्ष सिध्दार्थ कांबळे, प्रदेश सरचिटणीस सुरज चव्हाण, लहू कानडे, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, सामाजिक सेलचे प्रदेशाध्यक्ष सुनिल मगरे, अल्पसंख्याक सेलचे प्रदेशाध्यक्ष नाझेर काझी, महेश शिंदे, श्रीमती राजलक्ष्मी भोसले, सुरेखाताई ठाकरे, नजीब मुल्ला, श्रीमती प्रतिभाताई शिंदे, विकास पासलकर आदींचा समावेश आहे.

# दुचाकी व ट्रक अपघातात पती ठार, पत्नी गंभीर

पालम : दि.१३ रोजी पेठशिवणी जवळील सकाळी ११च्या सुमारात सुतगिरणी समोर अपघात झाला मयत व जखमी नांदेड जिल्ह्यातील असल्याचे कळते ते विवाह सोहळ्यासाठी गंगाखेड येथिल मरडसगाव येथे



जात असताना दुचाकीचा व ट्रकचा अपघात झाला. यामध्ये पर्तीचा जागीच मृत्यू झाला तर पत्नी गंभीर जखमी झाली आहे.

या अपघाता विषयी अधिक माहिती अशी की, नांदेड जिल्ह्यातील अर्धापुर तालुक्यामधील आंबेगाव येथील विश्वनाथ माधवराव मुदखेडे व पत्नी विद्या विश्वनाथ मुदखेडे हे पती,पत्नी स्कुटीने मरडसगाव येथे जात आस्ताना सुतगिरणी समोर पालमकडून लोह्याकडे ट्रक भुसा घेऊन जात होता यात स्कुटीचा अपघात झाला. यात विश्वनाथ मुदखेडे यांना डोक्याला जबर मार लागल्याने ते जागीच ठार झाले. तर पत्नी विद्या मुदखेडे जखमी झाल्या जखमीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या आपघाता नंतर पालम पोलीसानी पारवा शिवारात ट्रकला ताब्यात घेऊन पालम पोलीस ठाण्यात जमा केला. मयतास पालम ग्रामीण रूग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी दाखल केला. घटनेची माहिती मिळताच मयताच्या नातेवाईकांनी पालम पोलीस ठाण्यात धाव घेतली.गुन्हा दाखल प्रक्रीया चालू आहे.

# केंद्र सरकारच्या निर्यात प्रोत्साहन निर्णयांमुळे देशाची जागतिक स्पर्धात्मकता बळकट होईल- पंतप्रधान

नवी दिल्ली, १३ नोव्हेंबर : जागतिक व्यापार अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निर्यातीला चालना देण्यासाठी भारत सरकारने जाहीर केलेल्या ४५,००० कोटी रुपयांच्या बूस्टर पॅकेजचे वर्णन जागतिक स्पर्धात्मकता सुधारणारे पाऊल असल्याचे केले. ते म्हणाले की, केंद्र सरकारच्या निर्यात प्रोत्साहन निर्णयांमुळे देशाची जागतिक स्पर्धात्मकता बळकट होईल, पुरवठा साखळी मजबूत होईल आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील.

तीन वेगवेगळ्या एक्स पोस्टमध्ये, पंतप्रधानांनी सांगितले की, हे निर्णय स्वावलंबी भारताचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. पंतप्रधान म्हणाले की, मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या निर्यातदारांसाठी क्रेडिट हमी योजनेमुळे निर्यातदारांना सुरळीत व्यवसाय चालना मिळेल आणि जागतिक स्पर्धेत भारताचे स्थान आणखी मजबूत होईल. ते म्हणाले की, हे पाऊल भारतीय उद्योगाच्या शाश्वतता, स्वावलंबन आणि रोजगार निर्मितीला देखील प्रोत्साहन देईल.


दुसऱ्या पोस्टमध्ये, पंतप्रधान म्हणाले की मेड इन इंडिया चा प्रतिध्वनी आता जागतिक बाजारपेठेत अधिक प्रभावीपणे ऐकू येईल. त्यांनी सांगितले की निर्यात प्रोत्साहन अभियान (एझच्) निर्यात स्पर्धात्मकता सुधारेल, विशेषतः चडचए क्षेत्र, नवीन निर्यातदार आणि कामगार-केंद्रित उद्योगांना याचा फायदा होईल. हे अभियान प्रमुख भागधारकांना सहभागी करून एक प्रभावी आणि परिणाम-केंद्रित प्रणाली तयार करेल.

जागतिक व्यापार अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारतीय निर्यातीला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने बुधवारी ४५,००० कोटींचे बूस्टर पॅकेज जाहीर केले हे उल्लेखनीय आहे. यामध्ये निर्यात प्रोत्साहन अभियानासाठी २५,०६० कोटी आणि निर्यातदारांच्या क्रेडिट हमी योजनेचा विस्तार करण्यासाठी २०,००० कोटींचे वाटप समाविष्ट आहे.

# अहमदाबाद विमान अपघात : 'पायलट दोषी नाही', केंद्र आणि डीजीसीएचे सर्वोच्च न्यायालयात उत्तर

नवी दिल्ली , १३ नोव्हेंबर : सुप्रीम कोर्टात एअर इंडिया विमान दुर्घटनेची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी सुरू आहे. दरम्यान, केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात आपला पक्ष मांडताना सांगितले की, प्राथमिक तपास अहवालात एअर इंडियाच्या वैमानिकाला (पायलटला) या दुर्घटनेसाठी जबाबदार धरलेले नाही.

या प्रकरणात केंद्राने सुप्रीम कोर्टाला कळवले की, एअर इंडिया विमान दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नियमावलीनुसार एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो



(एएआयबी) या संस्थेची चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे आणि ही चौकशी अद्याप सुरू आहे. त्याचबरोबर नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, प्राथमिक अहवालात एअर इंडिया विमान दुर्घटनेसाठी पायलटला जबाबदार धरलेले नाही.

१२ जून रोजी अहमदाबादहून लंडनकडे निघालेल्या एअर इंडिया बोईंग ७८७ ड्रीमलाईनर विमानाचे उड्डाणानंतर अवघ्या ३२ सेकंदात अपघात झाला आणि विमान एका इमारतीवर कोसळले. या भीषण दुर्घटनेत एका प्रवाश्याला वाचवून बाकी २६० जणांचा मृत्यू झाला. एएआयबीच्या अंतर्गत झालेल्या चौकशीत या प्रकरणातील अनेक महत्त्वाच्या बाबी उघड झाल्या होत्या आणि अपघाताचे कारण वैमानिकाची चूक असल्याचे सूचित करण्यात आले होते.

मात्र, हा अहवाल सार्वजनिक झाल्यानंतर त्या विमानाचे वैमानिक कॅप्टन सुमित सभरवाल यांचे वडील पुष्करराज सभरवाल यांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली. मागील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात केंद्र सरकार आणि नागरी विमान वाहतूक महानिदेशालय (डिजिसीए) यांच्याकडून उत्तर मागवले होते.

# पश्चिम विदर्भात १० महिन्यांत ८८८ शेतकऱ्यांनी कवटाळले मृत्यूला

अमरावती, १३ नोव्हेंबर : पश्चिम विदर्भात शेतकरी आत्महत्यांचे सत्र अजूनही सुरूच आहे . यावेळी दिवाळीच्या महिन्यात म्हणजेच ऑक्टोबरमध्ये तब्बल ८७ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले आहे, तर यंदाच्या १० महिन्यांत ८८८ शेतकरी आत्महत्या झाल्या आहेत. १ जानेवारी २००१ पासून आतापर्यंत २२,०३८ शेतकरी आत्महत्या झाल्याचे वास्तव आहे. पश्चिम विदर्भातील पाचही जिल्ह्यात जानेवारी २००१ पासून शेतकरी आत्महत्यांची नोंद केल्या जाते. तेव्हापासून ऑक्टोबर २०२५ या कालावधीत २२,०३८ शेतकऱ्यांनी मृत्यूचा फास ओढला आहे. यामध्ये शासन मदतीसाठी ११,२९५ प्रकरणे पात्र ठरली तर त्यापेक्षा अधिक ११,३६६ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे वर्षभरापासून ३७७ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असल्याची विभागीय



आयुक्तालयाची आकडेवारी आहे. हे सर्व शेतकरी केवळ अस्मानी सुल्तानी संकटाचे नव्हे, तर शासन, प्रशासनाच्या अनास्थेचे बळी असल्याचा आरोप होत आहे. नैसर्गिक आपत्ती, नापिकी, दुष्काळ, बँकांसह खासगी सावकारांचे कर्ज, मुलींचे लग्न, आजारपण आदींसह अन्य कारणांमुळे पश्चिम विदर्भात राज्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या होत आहेत. यामध्ये यवतमाळ, अमरावती व बुलढाणा जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे प्रकार वाढल्याचे वास्तव आहे.

# अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात मोठा शटडाऊन अखेर संपला

वॉशिंग्टन , १३ नोव्हेंबर : अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात दीर्घकाळ चाललेले शटडाउन अखेर संपले आहे. बुधवारी अमेरिकन काँग्रेसने शटडाउन संपविणाऱ्या विधेयकाला मंजुरी दिली आणि राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यावर स्वाक्षरी केली. यानंतर सलग ४३ दिवस चाललेले शटडाउन संपुष्टात आले.

शटडाउन संपविण्यासाठी झालेल्या करारानुसार, या ४३ दिवसांच्या काळात कामावरून काढण्यात आलेल्या फेडरल कर्मचाऱ्यांना पुन्हा नोकरीवर बहाल केले जाईल. प्रतिनिधीगृहात सत्ताधारी रिपब्लिकन पक्षाने हे विधेयक २२२ विरुद्ध २०९ मतांनी मंजूर केले. सिनेटने आधीच या विधेयकाला मान्यता दिली होती आणि आता राष्ट्रपती ट्रम्प यांच्या स्वाक्षरीने ते कायदा बनले आहे. राष्ट्रपती ट्रम्प यांनी या विधेयकाच्या मंजुरीला मोठा विजय असे संबोधले. डेमोक्रॅटिक पक्ष आर्थिक आरोग्यसेवा कायदा अंतर्गत मिळणाऱ्या आरोग्य कव्हरेजसाठी कर



सवलत वाढवण्याची मागणी करत होता. ही कर सवलत या वर्षाच्या शेवटी संपुष्टात येणार होती. जर सरकारने ती वाढवली नसती, तर लोकांना मिळणारे आरोग्य कव्हरेज अधिक महाग झाले असते. हाच मुद्दा दोन्ही पक्षांमध्ये वादाचा विषय ठरला आणि त्यामुळेच शटडाउन इतके लांबले. मात्र शेवटी रिपब्लिकन पक्ष मागे हटला नाही आणि डेमोक्रॅटिक पक्षालाच झुकावे लागले. शटडाउन संपविण्यासाठी रिपब्लिकन आणि डेमोक्रॅटिक पक्षांदरम्यान झालेल्या करारानुसार, आता ३१ जानेवारी २०२६ पर्यंत कोणत्याही अडथळ्याशिवाय सरकारी कामकाज सुरू राहील.

या कराराच्या अंतर्गत तीन वार्षिक खर्च विधेयकांना वित्तपुरवठा करण्यात आला आहे. रिपब्लिकन पक्षाने आरोग्यसेवा अनुदान वाढविण्यासाठी डिसेंबरच्या मध्यापर्यंत मतदान घेण्याचे आश्वासन दिले आहे, मात्र त्याच्या यशाची कोणतीही हमी दिलेली नाही.या विधेयकाअंतर्गत शटडाउन सुरू झाल्यानंतर ट्रम्प प्रशासनाने फेडरल कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याचा घेतलेला निर्णय रद्द करण्यात आला आहे. तसेच या करारामुळे फेडरल

# अंबाजोगाई, परळीत शिवसेना इच्छुकांच्या मुलाखतीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ नोव्हेंबर**

आगामी अंबाजोगाई आणि परळी नगर पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने उमेदवार निवडीची प्रक्रिया वेगात सुरू केली आहे. शिवसेने मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार, जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि.१०) शिवसेनेच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखतीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आगामी पालिका निवडणुकीत विकासाभिमुख उमेदवारांनाच शिवसेनेकडून संधी मिळणार असल्याचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले.



जिल्ह्यातील सर्वच नगर पालिकांवर भगवा फडकविण्यासाठी शिवसेना कामाला लागली आहे. सोमवारी (दि.१०) अंबाजोगाई येथे ३९, तर परळी येथे तब्बल ५३ इच्छुकांनी नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी मुलाखती दिल्या. दोन्ही ठिकाणी शिवसैनिकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. आगामी निवडणुकीत भगवा पुन्हा फडकवायचाच या निर्धाराने कार्यकर्त्यांनी हजेरी लावली.शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी स्वत: इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या. मुलाखतीदरम्यान उमेदवारांना त्यांचा प्रभागनिहाय विकास आराखडा, पक्षनिष्ठा, जनसंपर्क आणि स्थानिक कामकाजाबाबत प्रश्न विचारण्यात आले. पारदर्शक प्रक्रियेद्वारे योग्य उमेदवार निवडण्याचा पक्षाचा प्रयत्न असल्याचे मुळूक यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक म्हणाले की, शिवसेना हा केवळ राजकारण करणारा पक्ष नाही तर जनतेच्या सेवेत असलेली संघटना आहे. नगर पालिका ही लोकजीवनाशी थेट जोडलेली संस्था आहे. त्यामुळे आमचे उमेदवार जनतेशी जवळचे, काम करणारे आणि विकासासाठी कटिबद्ध असतील. शिवसेना कार्यकर्त्यांच्या निष्ठेच्या जोरावर अंबाजोगाई व परळी नगर पालिकांमध्ये भगवा पुन्हा फडकेल, याची मला खात्री आहे असा विश्वास मुळूक यांनी व्यक्त केला. दरम्यान,अंबाजोगाई आणि परळी नगर पालिका निवडणुकीत शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी अशा पद्धतीने इच्छुकांची मुलाखत घेऊन पक्षांतर्गत शिस्त आणि पारदर्शकता यांचा उत्तम आदर्श ठेवला आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर पक्षाची ताकद नक्की वाढणार आहे.

# आ. संदीप क्षीरसागर यांच्या गोटात मोठी फूट!

## अनिल जगताप यांच्या माध्यमातून सतीश शेळकेंसह शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश!

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ नोव्हेंबर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या उंबरठ्यावर बीडच्या राजकारणात जबरदस्त उलथापालथ झाली असून बीड राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठा धक्का बसला आहे. वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर



आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खा. डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या कुशल कार्य प्रणालीला प्रभावित होऊन शिवसेना जिल्हाप्रमुख सन्माननीय अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून बीड राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातील शेकडो महत्वपूर्ण पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला आहे.

काल, दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ९. ०० वाजताच्या दरम्यान मुंबईतील मुक्तागिरी निवासस्थानी महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांचे स्वीय सहाय्यक अत्यंत विश्वासू व खंदे समर्थक म्हणून सर्वश्रुत असणारे सतीष जगन्नाथ शेळके, कैलास रमेश घल्लाळ (सरपंच), अजिज चाँद शेख (उपसरपंच), प्रफुल्ल हनुमंतराव पाठक, किरण शिवाजीराव शिंदे, रोहित श्रीराम जाधव, सुरेश शिवाजीराव खुरणे (उपसरपंच), गणेश आनंदराव भरनाळे, महेश भगवान कदम, संदीप फल्हाद नवले यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा लक्षवेधी प्रवेश सोहळा पार पडला. या महत्वपूर्ण प्रवेश सोहळ्याने बीड राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट हादरला असून आगामी निवडणुकांत राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलून टाकली आहेत व शिवसेनाची पकड आणखी मजबूत झाली आहे. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्यासह जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर उपस्थित होते.

# बीड पोलीसांची प्रलंबित दंड वसुली मोहीम ११ लाखांचा प्रलंबित दंड वसूल

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ नोव्हेंबर**

बीड जिल्ह्यातील प्रलंबित वाहतूक दंडाची वसुली करण्यासाठी बीड पोलीस दलाने आज विशेष मोहीम राबवली. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हा वाहतूक शाखेच्या समन्वयातून ही मोहीम पार पडली.

या मोहिमेत पाडळशिंगी टोलनाका, बार्शी नाका, साठे चौक वडवणी, केज टोल नाका, चुंभळी फाटा पाटोदा, गोमाळवाडा फाटा शिरूर, धारुर टोल नाका, बर्दापूर टोल नाका,या मोहिमेत पाडळशिंगी टोलनाका, बार्शी नाका, साठे चौक वडवणी, केज टोल नाका, चुंभळी फाटा पाटोदा, गोमाळवाडा फाटा शिरूर, धारुर टोल नाका, बर्दापूर टोल नाका, परभणी टी पॉईंट माजलगाव, ईटके कॉर्नर परळी व आंभोरा चेकपोस्ट या ठिकाणी एकाच वेळी नाकाबंदी करण्यात आली.



या कारवाईदरम्यान १,३४० वाहनधारकांकडून प्रलंबित वाहतूक दंडासह एकूण ११,०८,९५०/- ची वसुली करण्यात आली. ही मोहीम अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये वाहतूक शाखेचे अधिकारी, विविध पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार सहभागी झाले होते.या मोहिमेमुळे प्रलंबित दंड भरणे टाळणार्या वाहनचालकांना धडा मिळून वाहतूक शिस्तीबाबत जागरूकता निर्माण झाली, असे पोलिसांनी सांगितले.यमध्ये वाहतूक शाखेचे अधिकारी, विविध पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार सहभागी झाले होते.या मोहिमेमुळे प्रलंबित दंड भरणे टाळणार्या वाहनचालकांना धडा मिळून वाहतूक शिस्तीबाबत जागरूकता निर्माण झाली, असे पोलिसांनी सांगितले.

# बेघरांना खरी जिव्हाळ्याची गरज-विजय जाधवर



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ नोव्हेंबर**

चांगले व्यक्तिमत्व कधीच जन्म घेत नाही. ते निर्माण करावे लागते. आपल्या सोबत दुसऱ्याचं ही भलं व्हावं अशी ज्यांची मानसिकता असते. त्यांना आयुष्यात कधीच कमी पडत नाही. सध्या कुटुंबात दिवसेंदिवस जिव्हाळा कमी होत चालला असून बेघरांची संख्या वाढत आहे. त्यासाठी बेघरांना वयोवृद्ध वयात मायेची उब देणे खूप गरजेचे आहे.त्यासाठी आपण सर्वांनी मिळून मदतीचा हात पुढे करत सहकार्य करणे गरजेचे आहे .असे मत बीड जिल्हा पोलीस वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी ११ नोव्हेंबर २०२५ रोजी बेघर निवारा केंद्रात वाढदिवसानिमित्त सत्काराला उत्तर देताना व्यक्त केले. बेघर जीव्हाला केंद्रामध्ये अन्नदान करून वाढदिवस साजरा करण्याचे हे त्यांचे पाचवे वर्ष आहे. गणराज बँकेचे संचालक मधुकर जाधवर व सौ. डॉ. संगीता जाधवर यांची कन्या समृद्धी हीचा ही वाढदिवस नुकताच दि.८ नोव्हेंबर २०२५ रोजी बेघर जिव्हाळा केंद्रात साजरा करण्यात आला.यावेळी ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे, डॉ. लक्ष्मण पवळ, पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ गुळभिले, वसुदेव मिसाळ, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक राजकुमार मोरे, बाबासाहेब जायभाये , सय्यद जाकेर ,दत्ता दुधाळ, मादळमोहीकर,रासवे, बाळासाहेब नागरगोजे, आदिनाथ मुंडे, सुरेश तांबडे, प्रदीप जगताप,शंकर भांगे ,सुरेंद्र बारगजे ,कल्याण सानप, लक्ष्मण चाटे ,लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, सुदाम कोळेकर, मधुकर ढाकणे आदींची उपस्थिती होती.

# रामतिर्थावर प.पू. दादा महाराज खडकीकर पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह, शिवमहापुराणकथा व विविध कार्यक्रमाचे आजपासून रामतिर्थावर सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ नोव्हेंबर**

बीड येथे रामतिर्थावर प.पू.महायोगी दादामहाराज खडकीकर यांच्या विसाव्या पुण्यतिथी निमित्त व श्री. विद्यागुरु खडकीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह व विविध धार्मिक कार्यक्रम सोहळा बुधवार दि.१२ नोव्हेंबर पासुन ते बुधवार १९ नोव्हेबर २०२५ पर्यंत आयोजित केला आहे.

यामध्ये गुरुचरित्र पारायण व श्री शिवमहापुराण कथा व कीर्तनाचे आयोजन असून दैनिक कार्यक्रमामध्ये पहाटे ४ ते ५ काकडा, ५ ते ६ श्रीविष्णूसहस्त्रनाम, सकाळी ६ ते ७ योगशिबिर, सकाळी ८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ८ ते ११ गुरुचरित्र पारायण, ११ ते १२ श्रींच्या समाधीला अभिषेक व आरती, दुपारी २ ते ५ शिवमहापुराणकथा, सायंकाळी ६ ते ८ हरिपाठ व आरती, रात्री ११ नंतर हरिजागर होईल. शिवमहापुराण कथाप्रवक्ते हभप भागवताचार्य अनिल महाराज जोशी माजलगांवकर यांच्या अमृतवाणीतून सात दिवस भागवत कथा दररोज दुपारी २ ते ५ वा. होईल. या सोहळ्याची सुरुवात भव्य शोभायात्रेने बुधवार दि.१२ नोंव्हेंबर रोजी सकाळी ११:३० वा. विठ्ठल मंदिर ते कथास्थळापर्यंत संपन्न झाली

दररोज रात्रौ ९ ते ११ या वेळेत खालीलप्रमाणे कीर्तनाचे कार्यक्रम होतील. दैनिक योगशिबिर दररोज सकाळी ६ ते ७ वा एस.आर. ढोरमारे, डॉ.काकाडे, उबाळे व सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली होईल. बुधवार दि.१२ नोव्हेंबर रोजी हभप. राधाबाई साळुंके. गुरुवार दि.१३ रोजी हभप मोहन महाराज खरमाटे, शुक्रवार दि.१४ रोजी हभप सुर्यकांत महाराज पुरुषोत्तमपुरीकर. शनिवार दि.१५ रोजी रामेश्वर बाहेती व सहकारी गेवराईकर यांचे सुंदरकांड रा.८ ते ११वा. रविवार दि. १६ रोजी हभप सुधाकर राऊत, हिवरशिंगा सोमवार दि.१७ रोजी बालकीर्तनकार हभप सोहम सातपुते. मंगळवार दि.१८ रोजी हभप अनिल महाराज जोशी यांची कीर्तनसेवा होईल.सप्ताहाची समाप्ती बुधवार दि.१९ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वा श्रीं च्या समाधीस महारुद्राभिषेक होऊन सकाळी ११:३० ते १:३० या वेळी हभप ज्ञानेश्वर महाराज माऊली माजलगांवकर यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होऊन त्यानंतर महाप्रसाद दु.२ ते ५ या वेळेत होईल. तरी सर्व भाविक भक्तांनी शिवमहापुराणकथा, कीर्तन, श्रवण व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन विध्यागुरू महाराज खडकीकर यांनी केले आहे.

# ऐ.डी.फाउंडेशनचा महाराष्ट्र नारिशक्ती समाजरत्न पुरस्कार २०२५ अनिता ठाकूर यांना जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ नोव्हेंबर**

अनुश्री धनश्री फाउंडेशन सांगली, यांच्या वतीने दरवर्षी समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान केला जातो.अनिता ठाकूर या स्वातंत्र्य सेनानी संग्रामसिंग चौहान यांच्या नातं व वामनराव ठाकूर यांच्या स्नुषा आहेत. त्यांना माहेरी, सासरी या दोन्हीकडे समाज कार्याचे बाळकडू मिळाले. त्यांनी ज्ञानप्रबोधिनी येथे प्रसाद चिक्षे,अभिजित जोंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली बालवाडी शिक्षिका म्हणून काम केले. त्या नंतर विमल मुंदडा यांच्या पारिवारिक संबंध तात आल्या त्या कालावधीत त्यांनी



तहसिल अंतर्गत दक्षता समिती,स्वा.रा.ती. रुग्णालय अभ्यागत मंडळ,भ्रष्टाचार समिती अशा अनेक शासकीय, निमशासकीय समितीवर कार्य केले. तसेच स्वातंत्र्य सैनिक वसाहतीमध्ये विविध महिलांना एकत्र करून बचत गटाची स्थापना केली व त्या माध्यमातून महिलांना स्वबळावर उभे राहण्याची प्रेरणा मिळाली.आधारकार्ड, मतदानकार्ड,आयुष्मान भारत कार्ड इ.तात्काळ उपलब्ध होण्यासाठी अधिकारी,कर्मचारी यांच्याशी संपर्क साधून ते उपलब्ध करून दिले. वसाहतीतील रहिवासी यांचे वाढदिवस अनाथाश्रम, अंधमूकबधिर शाळा आदी ठिकाणी साजरे करतात व ते साजरे करताना कपडे,खाऊ याचे वाटप केले जाते.छोट्या गोष्टीतून माणसं जोडणे,अडीअडचणी सोडवणे हा अनिता ताईंचा स्वभाव आहे.त्यांच्या या कार्याची नोंद घेऊन पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे. एका गृहिणीला, सर्वसामान्य स्त्री चा खऱ्या अर्थाने सन्मान होत असल्याने अनिता ठाकुर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# १४ नोव्हेंबर : बालदिन आणि जागतिक मधुमेह दिन आरोग्यदायी बालपण म्हणजेच सशक्त राष्ट्र

१४ नोव्हेंबर हा दिवस भारतासाठी आणि जगासाठी दुहेरी अर्थाने विशेष आहे . भारतात हा दिवस पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन म्हणून साजरा केला जातो , आणि त्याच वेळी जगभर हा दिवस जागतिक मधुमेह दिन म्हणून पाळला जातो . या दोन्ही दिनांच्या संगमातून एक अतिशय महत्त्वाचा संदेश मिळतो – बालपणापासूनच आरोग्याची सवय, म्हणजे मधुमेहमुक्त जीवन.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना मुलं अत्यंत प्रिय होती . ते म्हणायचे, आजची मुलं म्हणजे उद्याचे नागरिक. त्यांच्या मते , मुलांमध्ये असलेली निरागसता , कल्पकता आणि प्रामाणिकपणा हीच देशाच्या भविष्यातील खरी ताकद आहे . म्हणूनच त्यांच्या जन्मदिनी , १४ नोव्हेंबरला भारतात बालदिन साजरा करण्याची प्रथा सुरू झाली . या दिवशी शाळांमध्ये विविध उपक्रम , नाटिका , खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात . मुलांच्या शिक्षणाचा , आरोग्याचा आणि हक्कांचा विचार या दिवशी केंद्रस्थानी असतो . परंतु आजचा बालदिन केवळ आनंदाचा दिवस नसून , आत्मपरीक्षणाचाही दिवस आहे – कारण आधुनिक काळातील मुल शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या नव्या आव्हानांना सामोरे जात आहेत .

या निमित्ताने एक गाणं मनात पाझरतं – बच्चे मन के सच्चे, सारी दुनिया के अच्छे , बच्चे हैं भगवान का रूप , बच्चे हैं नूर का धूप . हे गाणं केवळ भावनिक नव्हे तर सामाजिक जबाबदारीची आठवण करून देतं – मुलांमध्ये भविष्यासाठीची बीज असतात , त्यांच आरोग्य , आनंद आणि सुरक्षा हेच आपल्या राष्ट्रनिर्मितीच मूळ आहे .




दुसरीकडे , १४ नोव्हेंबर हा जागतिक मधुमेह दिनही आहे . या दिवशी इन्सुलिनचे शोधक डॉ. फ्रेडरिक बँटिंग यांचा जन्म झाला होता . त्यांनी १९२१ मध्ये इन्सुलिनचा शोध लावून जगभरातील लाखो रुग्णांचे प्राण वाचवले . या दिवसाचा उद्देश आहे – मधुमेहाबद्दल जनजागृती , प्रतिबंध आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसार .

आज भारतात मधुमेहाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे . आंतरराष्ट्रीय मधुमेह महासंघाच्या अहवालानुसार , भारतात सुमारे १०१ दशलक्ष ( १०.१ कोटी ) लोकांना मधुमेह आहे . म्हणजे जवळपास प्रत्येक दहापैकी एक भारतीय मधुमेहग्रस्त आहे . त्यापैकी सुमारे ६० टक्के लोकांना आपल्या आजाराची कल्पनाच नाही . १९९० मध्ये दर एक लाख लोकांमागे १६२.७४ नवीन रुग्ण होते , तर २०२१ मध्ये हे प्रमाण २६४.५३ वर पोहोचले आहे – जवळपास दुपटीहून अधिक वाढ .

महाराष्ट्रातही ही स्थिती चिंताजनक आहे . शहरी भागात मधुमेहाचे प्रमाण सरासरी १४ ते १५ टक्के आहे , तर ग्रामीण भागात १० ते १२ टक्के . एका आरोग्य सर्वेक्षणानुसार राज्यात २.०२ कोटी लोकांची तपासणी झाली आणि त्यापैकी १०.९ लाखांना मधुमेह असल्याचे नव्याने निदान झाले . दुसऱ्या अहवालानुसार , सुमारे ६० लाख लोक महाराष्ट्रात मधुमेहग्रस्त आहेत आणि त्यापैकी ७० टक्के लोकांना आपल्या आजाराची माहितीच नाही .

या आकडेवारीकडे पाहता स्पष्ट होते की , मधुमेह हा आता केवळ वयस्क किंवा शहरी लोकांचा आजार राहिलेला नाही . आहारातील बदल , कमी शारीरिक हालचाल , जंक फूडचा अतिरेक , झोपेचा अभाव आणि वाढलेला तणाव यांमुळे मुल , किशोरवयीन तरुण आणि ग्रामीण भागातील नागरिकही मधुमेहाच्या विळख्यात अडकत आहेत .

या पार्श्वभूमीवर बालदिन आणि मधुमेह दिन यांचा एकत्र विचार करणे अत्यावश्यक आहे . बालपणापासूनच जर संतुलित आहार , दररोज खेळण किंवा व्यायाम , तणावमुक्त वातावरण आणि नियमित तपासणी या गोष्टींचा आग्रह धरला , तर मधुमेहासारख्या आजारांच प्रतिबंधात्मक संरक्षण सहज शक्य आहे . घरात पौष्टिक अन्न दिलं गेल पाहिजे, शाळांमध्ये क्रीडेला प्रोत्साहन मिळालं पाहिजे , मुलांना निसर्गाशी जोडलं पाहिजे . समाजाने आणि शासनाने मिळून या दिशेने पावलं उचलणं आवश्यक आहे. फिट इंडिया मोव्हमेंट , आयुष्मान भारत आणि पोषण अभियान सारख्या सरकारी उपक्रमांना सामाजिक पाठिंबा मिळणं ही काळाची गरज आहे.या १४ नोव्हेंबरला आपण सर्वांनी ही प्रतिज्ञा घ्यावी – मुलांना जंक फूडपासून दूर ठेवू , रोज त्यांच्यासोबत खेळू , आरोग्यविषयक शिक्षणाला प्राधान्य देऊ आणि समाजात निरोगी जीवनशैलीचा आदर्श निर्माण करू . कारण आरोग्यदायी बालक म्हणजेच निरोगी भारत . आणि निरोगी भारतच खऱ्या अर्थाने सक्षम , समृद्ध आणि आत्मनिर्भर होईल.१४ नोव्हेंबरचा दिवस आपल्याला दोन अमूल्य धडे देतो – एक , बालपण जपा आणि दुसरा , आरोग्याचे रक्षण करा . पंडित नेहरू म्हणायचे , मुलांमध्ये भविष्य पाहा . ते भविष्य उज्ज्वल आणि निरोगी ठेवायच असेल , तर आजपासूनच आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण आवश्यक आहे .

बालपण जर निरोगी असेल, तर राष्ट्र सशक्त होते– आणि सशक्त राष्ट्रच खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा अर्थ समजते.

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळ्यास प्रारंभ



खुलताबाद, १३ नोव्हेंबर : सुलीभंजन, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर येथे रामानंद संप्रदाय यांच्यावतीने आयोजित परमपूज्य रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळ्यास प्रारंभ झाला.यावेळी कन्नड विधानसभा मतदारसंघाच्या शिवसेना आमदार संजना जाधव यांची उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना आमदार संजय जाधव म्हणाल्या की,या सोहळ्यात सहभागी होताना अध्यात्मिक वातावरण, भक्तीभावाने भरलेली सभा आणि संतचरणांचा स्पर्श यामुळे मन प्रसन्न झाले. पूजनीय महाराजांच्या पादुकांचे दर्शन घेत नतमस्तक झाले. यावेळी अंतःकरणातून एक वेगळीच शांती, समाधान आणि सकारात्मक ऊर्जेची अनुभूती झाली. या प्रसंगी मिळालेली अध्यात्मिक प्रेरणा आगामी समाजकार्यात निश्चितच नवी दिशा आणि प्रेरणादायी ऊर्जा देईल. संतांच्या कृपेने समाजसेवेचा प्रवास अधिक दृढ आणि फलदायी व्हावा, हीच प्रार्थना.

## आयशर ट्रक्स अँड बसेसची आयशर प्रो एक्स डिझेल श्रेणी लाँच

पुणे – व्हीई कमर्शियल व्हेईकल्स (व्हीईसीव्ही) चे व्यवसाय युनिट आयशर ट्रक्स अँड बसेसने आज आयशर प्रो एक्स डिझेल लाँच करण्याची घोषणा केली, ज्यामुळे त्यांची श्रेणी वाढली. आयशर ट्रक्स अँड बसेसने २-३.५-टन लहान व्यावसायिक वाहन (एससीव्ही) विभागातील त्यांच्या नवीन पिढीच्या ऑफरचा विस्तार केला आहे. या वर्षाच्या सुरुवातीला इंडिया मोबिलिटी ग्लोबल एक्स्पोमध्ये आयशर प्रो एक्स ईव्हीच्या यशस्वी लाँचनंतर, डिझेल व्हेरिएंटच्या सादरीकरणात आयशरची इंधन कार्यक्षमता आणि डिझेल-चालित उपायांची आवश्यकता असलेल्या ग्राहकांसाठी आणि क्षेत्रांसाठी अनुप्रयोग उत्कृष्टतेमध्ये उद्योग-अग्रणी कौशल्य एकत्र केले आहे.

## आईक्यू १५ साठी प्री-बुकिंगची घोषणा

छत्रपती संभाजीनगर – आईक्यू १५ ची प्री-बुकिंग २० नोव्हेंबर २०२५ पासून सुरू होईल. ग्राहक त्यांचा फोन प्री-बुक करण्यासाठी १००० रुपये परत करण्यायोग्य रक्कम देऊन प्रायोरिटी पास मिळवू शकतात. प्रायोरिटी पाससह, तुम्हाला विशेष प्री-बुकिंग फायदे देखील मिळतील, ज्यामध्ये आईक्यू टीडब्ल्यूएस १ई इयरबड्सची एक मोफत जोडी आणि १२ महिन्यांची वाढीव वॉरंटी समाविष्ट आहे. प्रायोरिटी पास मर्यादित आहेत आणि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर दिले जातील.

## रुस्तमजी अर्बनिया येथे राम मंदिराचे भव्य उद्घाटन

मुंबई – श्रद्धा आणि एकतेचा अनोखा उत्सव साजरा करत ठाण्यातील रुस्तमजी अर्बनिया येथील रहिवाशांनी त्यांच्या परिसरात नव्याने उभारलेल्या राम मंदिराचे भव्य उद्घाटन केले. वर्षाच्या सुरुवातीला एका छोट्या देव्हाऱ्याच्या स्वरूपात सुरू झालेली ही यात्रा आज एक सुंदर आणि पूर्ण विकसित मंदिराच्या रूपात समाजासाठी अभिमानास्पद सांस्कृतिक आणि अध्यात्मिक टप्पा ठरली आहे.या प्रवासाची सुरुवात जानेवारी महिन्यात झाली, जेव्हा रहिवाशांनी परिसरात लहान देवस्थान उभारण्याची परवानगी मागितली. वाढत्या भक्तीभावाचा प्रत्यय येताच 'श्री राम मंदिर अर्बनिया ट्रस्ट' ची स्थापना करण्यात आली. या ट्रस्टचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब राजे निम्बाळकर यांनी इतर भक्तांसह मंदिर बांधकामाचे नेतृत्व केले. रहिवाशांच्या आणि जनतेच्या योगदानातून संपूर्ण निधी उभारण्यात आला, ज्यामुळे हे मंदिर एकतेचे आणि श्रद्धेचे प्रतीक ठरले.

## ॲडव्हेंट हॉटेल्स इंटरनॅशनलने एनएसई आणि बीएसईवर प्रस्तावित लिस्टिंगची घोषणा

पुणे – भारतातील प्रमुख उच्च-मागणी असलेल्या सूक्ष्म-बाजारांमध्ये लक्झरी आणि उच्च-स्तरीय हॉटेल्सची आघाडीची मालकी असलेल्या ॲडव्हेंट हॉटेल्स इंटरनॅशनल लिमिटेडने १३ नोव्हेंबर रोजी नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) आणि बीएसई लिमिटेडवर त्यांच्या इक्विटी शेअर्सची प्रस्तावित लिस्टिंगची घोषणा केली. ही लिस्टिंग ॲडव्हेंटच्या समर्पित हॉस्पिटॅलिटी प्लॅटफॉर्म म्हणून प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यामुळे बाजारातील दृश्यमानता, विद्यमान भागधारकांसाठी तरलता आणि भविष्यातील वाढीला पाठिंबा देण्यासाठी एक मजबूत भांडवली रचना सक्षम होते. व्हॅलर इस्टेट लिमिटेड (पूर्वी डीबी रिअल्टी लिमिटेड) पासून वेगळे झाल्यानंतर, ॲडव्हेंट हॉटेल्स इंटरनॅशनल आता संपूर्ण भारतातील प्रमुख हॉटेल मालमत्ता विकसित करण्यासाठी, मालकी मिळविण्यासाठी आणि व्यवस्थापित करण्यासाठी केंद्रित धोरणासह स्वतंत्रपणे काम करते. विभाजनानंतर, कंपनी तिच्या स्वतःच्या बोर्ड आणि व्यवस्थापन टीमद्वारे नियंत्रित केली जाईल.

## प्रियानी वाणी पंडित यांनी मुंबईत खचाखच भरलेल्या प्रेक्षकांसमोर सादरीकरण केले.

मुंबई – प्रियानी वाणी पंडित यांनी संगीतबद्ध केलेल्या रागगीताच्या चौथ्या आवृत्तीचे नुकतेच मुंबईतील नेहरू सेंटर येथे आयोजन करण्यात आले होते. कलांगन क्रिएशन्स आणि मैत्री मल्टीक्रिएशन्स यांनी भव्यपणे आयोजित केलेल्या या कार्यक्रमात प्रेक्षकांची गर्दी दिसून आली, ज्यामुळे बॉलीवूडच्या सर्वात प्रिय गाण्यांना प्रेरणा देणाऱ्या शास्त्रीय सुरांच्या कालातीत आकर्षणाची पुष्टी झाली. रागगीताची संकल्पना शास्त्रीय राग आणि हिंदी चित्रपट संगीताचे सुंदर मिश्रण करते, ज्यामुळे प्रेक्षकांना केवळ एक मैफिलच नाही तर भावना आणि आठवणींनी वेढलेले संगीत शिक्षण मिळते. संध्याकाळची स्टार कलाकार प्रियानी वाणी पंडित यांनी तिच्या भावपूर्ण सादरीकरणाने आणि मनमोहक कथाकथनाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. प्रेक्षक केवळ गुणगुणतच राहिले नाहीत तर इतिहास, ज्ञान आणि सुरांना एका अखंड अनुभवात विणण्याच्या तिच्या क्षमतेने ते खूप प्रभावित झाले.

## ईमामी लिमिटेडने धोरणात्मक रिब्रँडिंगची घोषणा केली

छत्रपती संभाजीनगर – केश किंग, भारताचा अग्रगण्य आयुर्वेदिक हेअरकेअर ब्रँड आहे. ह्या ब्रँडने स्वतःचा एक रूपांतरात्मक रिब्रँडिंगचा पुढाकार घेऊन सादर केले आहे केश किंग गोल्ड. यामुळे ब्रँडची ओळख, प्रस्ताव आणि पॅकेजिंगला एक नवा आणि आकर्षक दर्जा मिळाला आहे. ह्या रिब्रँडिंगच्या पुढाकाराने ईमामीने आपल्या ब्रँड केश किंग ब्रँडसाठी एक वेगळी धोरण आत्मसात केली आहे. आता हे आपल्या पारंपारिक आयुर्वेदिक मूळांपर्यंत मर्यादित नाही, तर, हा एक दमदार नवा विचार आत्मसात केला आहे.

## ग्रीनप्रो मिळवणारी पॉलीकॅब ठरली पहिली कंपनी

मुंबई, : केबल्स आणि वायर्समधील भारतातील आघाडीची उत्पादक कंपनी पॉलीकॅबने आणखी एक मानाचा पुरस्कार पटकावला आहे. हाऊस-वायर्स श्रेणीतील त्यांचे प्रमुख उत्पादन, पॉलीकॅब ग्रीन वायर+ चे कौतुक करत भारतीय उद्योग महासंघ – इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिलने त्यांना प्रतिष्ठित ग्रीनप्रो प्रमाणपत्र देऊन गौरवले आहे. हे प्रमाणपत्र मिळवणारी ही देशातील पहिली कंपनी ठरली असून हा त्यांच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.सुरक्षित, पर्यावरणपूरक, दीर्घकालीन आणि उच्च-कार्यक्षमतेचे विद्युत उपाय देण्याच्या पॉलीकॅबच्या अतूट वचनबद्धतेला ही मान्यता अधोरेखित करते. उत्पादनाच्या संपूर्ण प्रवासात म्हणजेच कच्च्या मालाच्या स्रोतापासून ते उत्पादन, वापर आणि विल्हेवाट लावण्यापर्यंत हे ग्रीनप्रो प्रमाणपत्र पर्यावरणाचे रक्षण होईल, याकडे लक्ष देते. या माध्यमातून इलेक्ट्रिकल व्यवसायात पर्यावरणीय नवोपक्रम चालविण्यामध्ये पॉलीकॅबचे नेतृत्व अधिक भक्कम होते आहे.

# विज्ञान निष्ठा जपा : दिलीप स्वामी

### इन्स्पायर वार्ड प्रदर्शन सोहळ्याचे उद्घाटन



छत्रपती संभाजीनगर, दि.१३ -विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासून विज्ञान निष्ठा जपावी. वैज्ञानिक दृष्टीकोन विकसीत करुन जीवन सुखकर करावे,असा हितोपदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी इन्स्पायर वार्ड प्रदर्शन सोहळ्यास सहभागी विद्यार्थ्यांना केला.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई, तसेच राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली व माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर आणि डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालय, समर्थ नगर, यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय इन्स्पायर अवॉर्ड प्रदर्शनाचे उद्घाटन सोहळा आज तापडिया नाट्यमंदिर येथे उत्साहात पार पडला.

प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य) श्रीमती अश्विनी लाठकर या होत्या. उपशिक्षणाधिकारी श्रीमती सीमा मेहेत्रे), प्राचार्य, डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालय डॉ. सुनीता बाजपाई, जिल्हा विज्ञान पर्यवेक्षक दिलीप सिरसाट, समन्वयक डॉ. प्रभाकर गायकवाड आणि पर्यवेक्षिका प्रा. माधुरी भावसार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, 'अनेक महान वैज्ञानिकांच्या चरित्रामधून आपल्या लक्षात येते की, हे वैज्ञानिक विद्यार्थी दशेपासूनच प्रयोग करीत होते. सुरुवातीला त्यांचे प्रयोग उलटे-सुलटेही झाले, पण अथक प्रयत्नानंतर त्यांनी यश मिळविले. त्यांच्या या संशोधनामुळे आज आपले जीवन सुखकर झाले आहे. अशा प्रदर्शनातून सहभागी होणारे विद्यार्थी आज विविध संशोधन संस्थांमध्ये मोठ्या पदावर कार्यरत आहेत. या प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनाही वैज्ञानिक होण्याची खूप मोठी संधी या निमित्ताने मिळत आहे. आजही विविध सामाजिक माध्यमातून मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा पसरवली जात आहे. आपल्याला यावर मात करून विज्ञाननिष्ठ होणे अतिशय महत्त्वाचे आहे.'

अध्यक्षीय समारोप करताना श्रीमती अश्विनी लाठकर यांनी केला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली, तर महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी व प्रा. शंकर विधाते यांनी स्वागत गीत सादर केले. प्रास्ताविक दिलीप शिरसाट यांनी केले. प्राचार्यडॉ. सुनीता बाजपाई यांनीहीमनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. शिला जिरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रभाकर गायकवाड यांनी केले.

या कार्यक्रमाला शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती कल्पना पातकोंडे, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य,प्राध्यापक, मुख्याध्यापक, विज्ञान शिक्षक,बालवैज्ञानिक, विद्यार्थी, पालक, यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी हळद व मिठाच्या रासायनिक अभिक्रियेतून सुवर्ण अक्षराने स्वतःचे नाव लिहून प्रत्यक्ष विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन केले.



महानगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपा मध्यवर्ती कार्यालयात महिला मोर्चाची बैठक घेण्यात आली. या बैठकीला शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, उपाध्यक्ष तथा माजी नगरसेवक शिवाजीराव दांडगे, महिला मोर्चा अध्यक्ष सौ. उज्वलाताई दहिफळे यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.



सोयगाव – अतिवृष्टी व अवकळी पावसाने कापूस हातातेंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावला आहे.तर आता शेतकरी वर्ग रब्बीत गहू,हरभरा,मका पिकाची पेरणी सध्या आपल्या शेतात ट्रॅक्टरने रब्बीची पेरणी करताना कृषी भूषण शेतकरी अरुण सोहणी छायाचित्रात दिसत आहे. छायाचित्र – (साई बोखारे,सोयगाव)

# अब्दुल समीर यांच्या उमेदवारी अर्ज भरल्यानंतर पदयात्रा



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.१३ सिल्लोड नगर परिषद निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने शिवसेनेच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अब्दुल समीर अ. सत्तार तसेच नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सिल्लोड शहरातील प्रभाग क्रमांक १ व ५ मधील जय भवनी नगर, श्रीकृष्ण नगर, नर्सरी परिसरात शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव पा. तायडे व नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अब्दुल समीर यांच्या प्रमुख उपस्थितीत पदयात्रा काढण्यात आली होती. या पदयात्रेस मतदार बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पदयात्रेत महिला भगिनींनी अब्दुल समीर यांचा औक्षण करून तर स्थानिकांनी शाल पुष्पहाराने स्वागत केले. सिल्लोड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेनेच्या धनुष्यबाण निशाणीला मतदान करण्याचे अवाहन याप्रसंगी अब्दुल समीर व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी मतदारांना केले.

पदयात्रेमध्ये शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव पा. तायडे, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अब्दुल समीर अ. सत्तार, शिवसेना पदाधिकारी नंदकिशोर सहारे, सुदर्शन अग्रवाल, मनोज झंवर, प्रताप प्रसाद ,विठ्ठल सपकाळ, सुधाकर पाटील, प्रशांत शिरसागर, राजश्री निकम, मेघा शाह ,संदीप राऊत, बाबर बागवान ,सुनील दुधे, संजय आरके, शेख मोहसीन, जितू आरके, सत्तार हुसेन ,राजू गौर, विशाल जाधव, रवी गायकवाड, प्रवीण मिरकर, संतोष खैरनार, स्वप्नील शेळके, सुनील पांडुरंग दुधे, शिवा टोम्पे ,सखाराम अहिरे ,धम्मा दांडगे, सुनील इंगळे, भगवान सुरडकर, दत्ता इंडोले ,बॉबी चौधरी, स्वप्निल काकडे, महेश पाटील, आदी पदाधिकारी व मतदार बांधवांची उपस्थिती होती.

## स्वदेशी वस्तूंचा पुरस्कार करा; स्वदेशीची प्रेरणा जागृत



छ.संभाजीनगर दिनांक १० नोव्हेंबर : स्वदेशी जागरण म'चाचे सस्थापक कै. दत्तोपंत ठेंगडी यांच्या जयंती निमित्त स्वदेशी प्रेरणा दिन कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले होते. छ. संभाजीनगर मधील सुप्रसिद्ध पतंजली स्क्वेअर मॉलचे स'चालक श्री. वसंत आरोळे यांच्या हस्ते ग्राहकांना स्वदेशी पत्रक व गुलाब पुष्प देऊन सुरुवात करण्यात आली. या परिसरातील सुमारे १०० ग्राहकांना स्वदेशी प्रेरणा दिनाची माहिती देण्यात आली व स्वदेशी वस्तूंचा पुरस्कार करण्याची विनंती करण्यात आली. पत्रकामध्ये स्वदेशी वस्तु रोजच्या वापरातील कोणत्या आहे याची यादी देखील देण्यात आली आहे. त्याचा उपयोग सर्व नागरिकांनी रोजच्या खरेदी करताना लक्षात ठेवावा असे आवाहन सर्व नागरिकांना करण्यात आले. विद्यार्थी मित्रांसाठी छोटी स्वदेशी प्रश्नावली देण्यात आली. व त्यांच्यामध्ये स्वदेशीची प्रेरणा जागृत केली. याप्रसंगी स्वावलंबी भारत अभियान देवगिरी प्रांत समन्वयक मिलिंद पोहनेरकर यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वावलंबी भारत अभियानचे जिल्हा समन्वयक अमोल काळे, सह समन्वयक योगेश दाशरथे तसेच धन्यकुमार मंडलेचा, गौरवकुमार कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

# राष्ट्रीय पातळीवरील वॉश प्रोजेक्टसाठी एमजीएम रेडिओची निवड

छत्रपती संभाजीनगर, दि.१३ : एमजीएम रेडिओ ९०.८ एफएम, डीडीडब्ल्यूएस, जलशक्ति मंत्रालय भारत सरकार आणि कम्युनिटी रेडिओ असोसिएशन यांच्या वतीने पाणी, स्वच्छता आणि आरोग्य या विषयावर जनजागृती करण्यात येणाऱ्या वॉश या प्रोजेक्ट अंतर्गत नोव्हेंबर २०२५ ते मार्च २०२६ या पाच महिने कालावधी मध्ये आयोजित प्रोजेक्टसाठी देशातील ५०० रेडिओमधून एमजीएम रेडिओ ची निवड झालेली आहे.

यामध्ये रेडिओवरून स्वछ सुजल गाव की कहाणी रेडिओ की जुबाणी या कार्यक्रमांतरंगत दहा कार्यक्रमांची मालिका प्रसारित केली जाणार आहे, त्यामध्ये स्वच्छ आणि सुरक्षित पाण्याच्या पद्धती, स्वच्छ भारत-शौचालयाचा उपयोग आणि व्यवस्थापन, जलसंवर्धन पद्धती आणि भूजल पुनर्भरण, व्यक्तिगत स्वच्छतेचे महत्व, वॉश एक जन आंदोलन लोकांच्या सहभागाने लोकांसाठी, पाण्याची गुणवत्ता आणि आजार थांबवण्याचे महत्त्व, जलजीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशनचा प्रभाव, स्थानिक एनजीओ- सिव्हिल सोसायटी आणि फील्ड एक्स्पर्ट यांची भूमिका, वॉश प्रोजेक्ट मध्ये स्थानिक लोकांचा सहभाग या विषयावर आधारित कार्यक्रम प्रसारित केले जाणार आहेत.

त्याचबरोबर प्रोजेक्ट अंतर्गत तीन ठिकाणी स्थानिक प्रशासनाच्या मदतीने प्रत्यक्ष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बेसलाईन सर्व्हे आणि एंडलाईन सर्व्हे करण्यात येणार आहे. या शिवाय कार्यक्रमामध्ये लोकांचा सहभाग वाढवण्यासाठी कार्यक्रमाच्या प्रत्येक भागाच्या शेवटी कार्यक्रमावर आधारित प्रश्नमंजुषा, स्पर्धाचे आयोजन केले जाणार आहे आणि विजेत्यांना प्रमाणपत्र आणि बक्षीस दिले जाणार आहेत. तसेच सोशल मिडियाच्या माध्यमातून श्रोत्यांबरोबर संवाद साधण्यात येणार असल्याचे एमजीएम रेडिओचे केंद्रप्रमुख सुनील शिरसिकर यांनी सांगितले.

या राष्ट्रीय पातळीवरील प्रोजेक्टमध्ये एमजीएम रेडिओची निवड झाल्याबद्दल एंजियएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके यांनी रेडिओच्या टीमचे अभिनंदन केले आहे.

## अजिंठा घाटात अपघातात एक तरुण जागीच ठार



तभा वृत्तसेवा

फर्दापूर. छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात सकाळी दहा वाजता ट्रक आणि मोटरसायकल समोरासमोर धडक एक तरुण जागीच ठार गुरुवारी सकाळी दहा वाजता एम पी ०९ एच एच ६४७३ हा ट्रक मध्य प्रदेश हुन छत्रपती संभाजीनगर जात असताना हा अवजड असल्याने घाटात हळूहळू चढत असताना समोरून मोटरसायकल एम एच २० एफ वाय ६८५८ हे तरुण खंडाळा येथून शेंदुर्णी येथे जात असताना यांची समोरासमोर धडक झाल्याने यातील शब्बीर बागूल वय २४ हा तरुण जागीच ठार झाला असून रोहन कृष्णा दांडगे वय १६ रोहित मधू बिरारे वय १८ हे दोन्ही तरुण जखमी असून यांना अजिंठा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून हे तिन्ही तरुण खंडाळा येथील असुन पुढील तपास पोलीस कर्मचारी योगेश कोळी, फिरोज तडवी हे करीत आहेत हा गुन्हा संध्याकाळी पर्यंत दाखल झाला नसुन तपास सुरू आहे सध्या छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर मोठ्या प्रमाणात अवजड वाहने यांची मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढल्यामुळे दररोज घाटात ट्राफीक जाम राहत असुन मोठी अडचण पर्यटक तसेच परीक्षार्थी विद्यार्थी तसेच रुग्ण यांना मोठ्या प्रमाणात दोन-तीन तास ट्रॅफिक मध्ये थांबावं लागत आहे तरी वरिष्ठ यांनी ताबडतोब अजिंठा घाटाचे रुंदीकरण करण्यात यावे अशी पर्यटकांची मागणी आहे

# शासकीय विभागीय ग्रंथालयात बालसाहित्यिकांची कार्यशाळा व ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर -सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय, शासकीय विभागीय ग्रंथालय आणि युगंधरा मराठी साहित्य, कला व सांस्कृतिक प्रतिष्ठान, छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताह तथा भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू व भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त बालसाहित्यिकांच्या कार्यशाळेचे व ग्रंथ प्रदर्शानाचे आयोजन शुक्रवार दिनांक १४ नोव्हेंबर रोजी शासकीय विभागीय ग्रंथालय, समर्थनगर येथे सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड यांच्या हस्ते होणार असून छत्रपती संभाजी नगर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे हे अध्यक्षस्थानी असणार आहेत. कार्यशाळेस प्रमुख अतिथी म्हणून विभागीय सहाय्यक भाषा संचालक बाबासाहेब जगताप,युगंधरा प्रकाशनच्या सौ सुनीता कावसनकर व पी. यु. जैन माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय पाटोदी प्रमुख अतिथी असणार आहे.

या प्रसंगी बाल साहित्याचे (ग्रंथाचे ) प्रदर्शन भरविण्यात येणार असून ते २० नोव्हेंबर पर्यंत सर्वांसाठी निःशुल्क खुले राहणार आहे. सदर कार्यशाळेस शहरातील विविध शाळेतील विद्यार्थी व शिक्षक सहभागी होणार असुन वाचनाची आवड असणाऱ्या व काव्य वाचन व लेखन करणाऱ्या नवोदित बालसाहित्यिकांनी उत्स्फूर्तपणे कार्यशाळेस सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री संतोष जाधव यांनी केले आहे.

# अर्चना भास्कर कुलकर्णी यांना नारीशक्ती समाज रत्न पुरस्कार जाहीर



तभा वृत्तसेवा

पैठण दी १३ :- महाराष्ट्र राज्यातील सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे तनिष्का फाऊंडेशन व ए डी फाऊंडेशन यांच्या वतीने पैठण मधील अर्चना भास्कर कुलकर्णी यांना महाराष्ट्र राज्य नारीशक्ती समाज रत्न पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे.

आयुष्यात भावनेपेक्षा कर्तव्य किती मोठे असते नुसती स्वप्न पाहून चालत नाही तर ती स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी चंदनप्रमाणे झिजून शैक्षणिक व सामाजिक कार्य करावे लागते. तेव्हाच आपल्या आयुष्याला बहरलेली बाग पाहायला मिळते.या उद्देशाने आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिर शाळेतील विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत सौ. अर्चना भास्कर कुलकर्णी मॅडम यांचा मोलाचा वाटा आहे.तसेच गरजुना आर्थिक व इतर मदत करण्यात ते नियमित पुढे असतात. दि. १६ नोव्हेंबर रोजी पुणे येथील सावित्रीबाई फुले सभागृह गंज पेठ येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत या पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. असे फाऊंडेशन चे अध्यक्ष अशोक गोरड यांनी सांगितले. अर्चना कुलकर्णी यांच्या निवडीबद्दल डॉ. सुरेंद्र आलुलकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, विद्या सभा अध्यक्ष डॉ. जयंत जोशी, विद्या सभा उपाध्यक्ष उमेश जगताप, डॉ.पद्मकुमार कासलीवाल , जुगलकिशोर लोहीया, विजय चाटुपळे,शिवाजी मारवाडी, नंदकिशोर मालाणी, डॉ राम लोंढे, किशोर भाकरे, विजय पापडीवाल, मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी आदी समवेत सहकारी शिक्षक बंधूनी व सामाजिक क्षेत्रातील अनेकांनी अभिनंदन केले आहे. व भावी वाटचालीसाठी शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

शैक्षणिक साहित्यातून ज्ञानाचा दिवा पेटवणारी शिक्षिका

विद्यार्थ्यांना कठीण वाटणारा विज्ञान विषय सहज सोप्या पद्धतीने समजावे या करीता विविध शैक्षणिक साहित्याच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना सोप्यात सोपं विषय वाटावा म्हणून प्रयत्न असतो. शिक्षक हा कधीच एका साच्यात अडकलेला नसतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे अर्चना कुलकर्णी असून त्यांनी आपल्या साहित्यातूनही विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्याचा मानस बाळगला आहे. हजारो विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी व आवड निर्माण केली. त्यांनी गेली २४ वर्षे ज्ञानदानाचे कार्य चालू आहे.

## 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये बालदिनाचा उत्साह

संभाजीनगर प्रतिनिधी-बालदिनानिमित्त एण्ड टीव्हीवर 'हप्पू की उलटन पलटन' मालिकेतील लहान कलाकारांच्या उत्साही अभिनयाचा जल्लोष पाहायला मिळणार आहे. मालिकेतील प्रतिभावान बालकलाकार त्यांच्या ऊर्जेने आणि मोहकतेने प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहेत.

मालिकेत 'ऋतिक'ची भूमिका साकारणारा आर्यन प्रजापती म्हणाला, ही भूमिका माझ्या आयुष्यातील सर्वात मजेदार आणि संस्मरणीय अनुभव आहे. ऋतिक खोडकर, आनंदी आणि जीवनाचा पुरेपूर आस्वाद घेणारा आहे.

तर 'चमची'ची भूमिका साकारणारी झारा वारसी म्हणाली, चमचीच्या भूमिकेमुळे प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर हास्य आणण्याची संधी मला मिळते, हे माझ्यासाठी आनंददायी आहे. हास्य हेच सर्वोत्तम औषध आहे, आणि मी ते जपते.

बालदिनानिमित्त या दोन्ही कलाकारांच्या खास संवादांमुळे मालिकेचा उत्साह आणखी वाढला आहे.

'हप्पू की उलटन पलटन' ही विनोदी मालिका सोमवार ते शुक्रवार रात्री १० वाजता केवळ एण्ड टीव्हीवर प्रसारित होते.

## अग्रलेख...

# धोका दारात आणि घरातही!

देशाच्या आत्म्याचे, सार्वभौमत्वाचे प्रतीक असलेल्या दिल्लीतील अगदी वर्दळीच्या ठिकाणी सोमवारी सायंकाळी उभ्या कारमध्ये स्फोट झाला, नव्हे तो घडवून आणला गेला. गेल्या काही दिवसांच्या वर्तमानपत्रांची मुखपृष्ठं बघितली तर देशात ठिकठिकाणी लहान मोठ्या आतंकी घटना घडताना दिसत आहेत. दिल्लीतल्या कार स्फोटाच्या बातमीने तर संपूर्ण देशाला हादरवून सोडले. या घटनेत 'व्हाईट कॉलर्ड' प्रोफेशनल्स म्हणून गणल्या जाणाऱ्या डॉक्टरांचा सहभाग असल्याचे निदर्शनास येणे आणि स्फोटाची घटना थेट दहशतवादी संघटनेशी जोडली जाणे, ही गोष्ट राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर अशी धोक्याची घंटा आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणा या प्रकरणाची सखोल चौकशी करेल यात शंका नाही. पण भारतासारख्या खंडप्राय देशात ठिकठिकाणी अशा दहशतवादाचा वाढता धोका पाहता, केवळ आणि केवळ सरकारी यंत्रणांच्या भरवशावर राहणे पुरेसे नाही. प्रत्येक नागरिकाची सावधगिरी, सतर्कता आणि जबाबदारी यातूनच दहशतवादाविरोधी लढ्याचा प्रभाव वाढविता येईल.

एक काळ होता, जेव्हा बहुतांशी दहशतवादी हल्ले सीमेपलीकडील शक्तीकडून प्रायोजित केले जायचे आणि त्यांचे स्वरूपही उघडपणे लष्करी किंवा निमलष्करी असायचे. ते तसे आता राहिलेले नाही, असेही नाही. तसे प्रकार थांबलेले नाहीत. मात्र, आता दहशतवादाने आणखी एक नवे रूप धारण केले आहे. आताचे दहशतवादी हल्ले 'हायब्रीड' आणि 'लोन वुल्फ' स्वरूपाचे जास्त दिसतात. दिल्लीच्या कार स्फोटातून हे स्पष्ट होते की, उच्चशिक्षित आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील असलेले लोकही कट्टरपंथी इस्लामींच्या देशविघातक विचारधारेचे बळी ठरत आहेत. आधीच्या हल्ल्यांमध्ये दहशतवादी संघटनांची थेट ओळख असायची. दहशतवादी संघटना जाहीर जबाबदारीच घ्यायच्या. दिल्लीच्या घटनेत असे दिसले की, अशा कारवायांसाठी 'व्हाईट कॉलर्ड' व्यक्तींचा वापर होतोय. याचा अर्थ असा की, दहशतवादी संघटनांनी आपली विषाक्त मुळे खोलवर रुजवली आहे. 'स्लिपर सेल' हा त्यातलाच एक प्रकार. दहशतवादी संघटनांचा हा गुप्त सदस्यांचा गट असतो, जो कोणत्याही देशात सामान्य नागरिकांप्रमाणे शांतपणे राहण्याचे ढोंग करतो. साधारणतः त्यांच्या 'आकां'कडून आलेला गुप्त आदेश मिळेपर्यंत तो अजिबात सक्रिय नसतो. आपली ओळख गुप्त ठेवणे हे त्याचे वैशिष्ट्य असते. या सेलचे सदस्य कुणीही असू शकतात. दिल्लीच्या घटनेत डॉक्टर्स सापडले. त्यांच्यात डॉक्टर, इंजिनीअर, शिक्षक, सॉफ्टवेअर प्रोफेशनल्स किंवा अगदी रोजंदारी करणारा सामान्य कामगारही असू शकतो. अशा लोकांना वरकरणी ओळखणे फार कठीण आहे, कारण आपले सामाजिक जीवन प्रामुख्याने परस्पर विश्वासावर चालते. स्लिपर सेलशी संबंधित लोकांचे जीवनही सामान्यांसारखेच असते. पण, संधी मिळाली तर ते किती भयंकर घडवू शकतात, हे दिल्लीत दिसले आणि त्या व आधीच्या घटनांच्या चौकशीदरम्यान स्फोटके तयार व गोळा करण्याच्या कामातील उच्चशिक्षितांच्या सहभागातही दिसले. असे लोक एरवी कोणत्याही संशयास्पद कृतीपासून दूर राहतात. बहुतांश वेळा त्यांना ऑनलाईन माध्यमातून किंवा स्थानिक गुप्त समन्वयकांच्या मार्फतच प्रशिक्षण दिले जाते. आयडी बॉम्ब बनवण्याचे साहित्य, गुप्त संवाद साधण्याचे मार्ग आणि कारवायांची योजना त्यांना गोपनीय पद्धतीनेच पोहोचविली जाते. योग्य वेळ, ठिकाण आणि संघटनेकडून 'हिरवी झेंडी' मिळाल्याबरोब्बर हा 'स्लिपर सेल' सक्रिय होतो. गुप्त माहिती गोळा करणे, घातपात करणे, बॉम्बस्फोट घडवणे किंवा दहशतवादी हल्ल्यासाठी 'लॉजिस्टिक' पुरवठा करणे आदी त्यांचे काम असते. हे लोक समाजाच्या मुख्य प्रवाहात असल्याने त्यांचा शोध घेणे तपास यंत्रणांसाठी वाटते तेवढे सोपे नाही. अटक होईपर्यंत त्यांचा साधा संशयही येत नाही. मात्र, तोपर्यंत मोठा घातपात घडलेला असतो आणि म्हणून सर्वसामान्य जनतेची सावधगिरी यापुढच्या काळात अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. आपल्या आसपासच्या, भोवतालच्या लोकांकडून देशविरोधी, समाजविघातक कारवाया होत असल्याचा साधा संशय जरी आला तरी ते तातडीने सुरक्षा यंत्रणांचा लक्षात आणून देणे ही एक प्रकारे देशभक्तीच आहे, असे समजून आपण काम केले पाहिजे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, २००४ ते २०१४ या काळात देशात ७,२१७ दहशतवादी हल्ले झाले, तर २०१४ ते २०२४ दरम्यान हा आकडा २,२४२ पर्यंत खाली आला, जो सरकारी सुरक्षा यंत्रणांच्या प्रयत्नांचे यश दर्शविणारा आहे. तरीही, २०२४ मध्ये ८५ हून अधिक दहशतवादी हल्ले झालेत आणि त्यांत २६ नागरिकांना आणि ३१ जवानांना आपले प्राण गमवावे लागले. हे आकडे असे सांगतात की, धोका कमी झाला असला तरी तो पूर्णपणे संपलेला नाही. उलट अशा हल्ल्यांचे स्वरूप अधिक कपटी आणि पाताळयंत्री झालेले आहे. दहशतवाद्यांचे लक्ष्य आता केवळ लष्करी तळ किवा महत्त्वाची सरकारी ठिकाणे नाहीत. ती तर त्यांच्या हिटलिस्टवर आहेतच. परंतु, आता लोकांची वर्दळ असलेली सार्वजनिक ठिकाणे हे त्यांचे लक्ष्य आहे. सामान्यांना लक्ष्य करणे व त्यातून व्यापक दहशत निर्माण करणे ही या दहशतवादी संघटनांची नवी रणनीती आहे. भारताचे लष्कर, सुरक्षा यंत्रणा जेवढ्या अधिक सक्षम होतील, तेवढी या दहशतवादी संघटनांची ही धूर्त रणनीती वाढत जाईल. या भ्याड संघटना भारतीय जवानांसमोर टिकूच शकत नाहीत, याची पुरेपूर कल्पना त्यांनाही आहे.

२००६ मध्ये झालेले मुंबई बॉम्बस्फोट आठवा. लोकल ट्रेनमध्ये अवघ्या ११ मिनिटांत झालेल्या स्फोटांच्या मालिकेत २०९ निरपराध माणसं ठार झाली होती किंवा २००८ च्या २६/११ ला झालेला मुंबई हल्ला आठवा. त्यात हॉटेल, रेल्वेस्थानक आणि रुग्णालयांसारख्या ठिकाणांना लक्ष्य केले गेले आणि १७१ लोक मारले गेले. त्याच वर्षी जयपूर आणि २०१० मध्ये पुण्याच्या बाजारपेठेत झालेले स्फोटही त्याच धर्तीचे. हे सारे हल्ले हेच स्पष्ट करतात की, धोका केवळ सीमेपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो आता आपल्या घराच्या दारावर उभा आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे तो अगदी घरातही शिरू लागला आहे. पाणीपुरवठ्यातून, तुमच्या घरी होणाऱ्या इंधन पुरवठ्यातून किंवा खाद्य पुरवठ्यातूनही तो तुमच्या-आमच्या घरात येऊ शकतो. आपल्या उत्सवांतून, यात्रेतून, मॉल्समधून किंवा मग शाळेतूनही तो आपल्या आयुष्याची राखरांगोळी करू शकतो. सरकार आणि सुरक्षा यंत्रणा चौकस आहेतच. पण, एवढ्या विशालकाय देशात सामान्यांची जागरूकता तेवढीच महत्त्वाची आहे.

प्रत्येक नागरिकाने आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींबाबत जागरूक राहणे काळाची गरज आहे. अपरिचित व संशयास्पद वस्तूंबाबत सुरक्षा यंत्रणांना तात्काळ सूचना देणे, आपल्या भागात किंवा सोसायटीमध्ये अचानक आलेल्या अनोळखी व्यक्ती, त्यांची असामान्य हालचाल किंवा संशयास्पद वर्तन आढळल्यास त्याची नोंद घेणे आणि पोलिसांना तातडीने कळविणे हेही देशाच्या सीमेवर सतर्क राहणाऱ्या सैनिकासारखीच देशाची सेवा आहे, हे आम्ही जाणले पाहिजे. ज्याप्रमाणे कोविड महामारीत प्रत्येक नागरिकाने मास्क घालून आणि नियम पाळून आपले योगदान दिले, त्याचप्रमाणे दहशतवादाविरुद्धच्या या लढ्यातही अत्यंत सावध राहणे मोलाचे आहे. दिल्लीतील दहशतवादी घटना वा मुंबईवरचा हल्ला असो, प्रत्येकच घटनेने हे सिद्ध केले आहे की, दहशतवादाचा धोका ही छुपी आग आहे. ती केव्हाही होत्याचे नव्हते करू शकते. अशा घटनांना सामान्य मानून त्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. सामान्य नागरिकांनी दाखवलेली जागरूकता अनेक हल्ले घडण्यापूर्वीच थांबवू शकते. आपली सतर्कता हेच आपल्या कुटुंबाचे, देशाचे सर्वांत मोठे सुरक्षा कवच आहे. देशविरोधी, विघातक शक्तींना सळो की पळो करून सोडा, आम्ही सरकार सोबत आहोत, असे सांगणेही गरजेचे आहे. हा संदेश प्रत्येक लोकशाहीवादी देशासाठी महत्त्वाचा आहे. 'जन सहभाग' आणि 'जन सहयोग' हाच दहशतवादाचा अंत करण्यासाठीचा प्रभावी 'मंत्र' आहे, हे समजून घेतले पाहिजे. रात्रच नव्हे तर सध्याचा अख्खा काळच वैऱ्याचा आहे, याची खूणगाठ बांधली पाहिजे.

## प्रासंगिक

श्रीश देवपुजारी

# भारताची संवाद भाषा काय असावी?

काहींचे उत्तर येईल हिंदी. पण तामिळनाडूमध्ये हिंदी? शक्यच नाही. मग उत्तर येईल इंग्रजी. तेही खरे नाही. कारण सगळ्या भारतीयांना इंग्रजी बोलता येत नाही. किमान नोव्हेंबर महिन्याच्या ७, ८, ९ दिनांकांना कोईम्बतूरला एकत्र आलेल्या सर्व राज्यातील नागरिकांना तर नाहीच नाही. कारण त्यात अधिक शिकलेले, कमी शिकलेले, ग्रामीण, नगरीय, स्त्री, पुरुष, युवक, वृद्ध असे सगळेच होते. मग ते कुठल्या भाषेत संवाद साधत असतील?

वास्तविक ते सगळे संस्कृत भाषेत संवाद करीत होते. खरंच? हो अगदी खरं! शप्पथ! हे अघटित कसे घडले? हे घडले संस्कृतभारती नावाच्या संघटनेच्या कारणाने. झाले असे की कोईम्बतूरला संस्कृतभारतीचे अखिल भारतीय त्रैवार्षिक अधिवेशन होते. पहिल्यांदाच तामिळनाडूमध्ये होणाऱ्या ह्या संमेलनाला सर्व म्हणजे ४३ प्रांतांतून २४७२ प्रतिनिधी उपस्थित होते. एवढेच नाही तर इंडोनेशिया व दुबईहून देखील काही कार्यकर्ते आले होते. संपूर्ण संमेलनाची भाषा संस्कृत होती. केवळ विविध सत्रांचीच नाही तर रात्री होणाऱ्या मंचीय कार्यक्रमांची सुद्धा. परस्परांचा संवाद संस्कृत भाषेत असल्याने विचारांची, मैत्रीची, खेळण्याची, गाण्याची भाषा पण संस्कृतच. परिसरही या दिव्य भाषेला पोषक असाच होता. माता अमृतानन्दमयी यांच्या विचारांचे पोषण करणाऱ्या विश्वविद्यालयाच्या भव्य, सुंदर, स्वच्छ व प्रदूषणरहित परिसरात हे संमेलन संपन्न झाले. इतक्या दूर असूनही मणिपूर सोडून सर्व प्रांतांचे प्रतिनिधित्व होते.

या अधिवेशनाचा भर होता भारतीय ज्ञान परंपरा या विषयावर. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयात भारतीय ज्ञान परंपरा हा विभाग सांभाळणारे प्रो. गंटी सूर्यनारायण मूर्ती यांचे संस्कृत भाषेत पीपीटीच्या साहाय्याने अत्यंत सोप्या शब्दांत प्रतिपादन झाले. ते आधुनिक विषयांचे ज्ञाता. शिवाय आय. आय. टी.सारख्या प्रतिष्ठित संस्थेत प्रोफेसर. त्यांच्या सोबत पारंपरिक चतुष्शास्त्र पंडित श्रीमान देवदत्त पाटील यांचे पण प्रबोधन झाले. हा दुग्धशर्करा योग होता. डॉ. देवदत्त पाटील गोव्यात स्वतःचे गुरुकुल चालवतात. येणाऱ्या पिढीला




संस्कृत शिकविण्याचा चंग बांधलेल्या प्रो. बी. एस. मूर्ती यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कारण त्यांनी आय. आय. टी. हैदराबाद येथे संस्कृत क्रेडिट कोर्स प्रारंभ केला.

भारतीय ज्ञान परंपरा या विषयावर सैद्धांतिक प्रतिपादनानंतर पुढच्या सत्रात शास्त्रे प्रत्यक्ष जगणाऱ्यांच्या कार्याचा गौरव करणारे सत्र झाले. त्यात चतुष्शास्त्र पंडित प्रो. मणिद्रविड शास्त्री (चेन्नै), वैद्य सेतुमाधवन् (ओट्टपालम्, केरळ), लोखंडापासून दर्पणाची काच निर्माण करणारे सेल्वराज, भारतीय पाकशास्त्राधारित भोजन निर्माण करणारे बालाजी पट्टप्पा, लोकनाथ (कांचीपुरम्, वस्त्र निर्माता) शांतीश्री (अभिनेत्री, नर्तकी), केलैवेन्दर वीरमंगलम् (अभिनेता), वीळ्ळीनाथाचार्य (स्थपति, मन्दिरनिर्माण), राजीवन् पणिकर (मरुत्कल्ली) इत्यादी जनांचा सन्मान केल्या गेला. सर्व तामिळनाडू व केरळमध्ये राहणारे आहेत.

एक विस्तृत प्रदर्शन अधिवेशन स्थळी आयोजित केले होते. तीन तळांवर स्थापित प्रदर्शन भारतीय ज्ञान परंपरा, तामिळ व संस्कृत भाषेचे साम्य, संस्कृतभारतीच्या विभिन्न गतिविधी यावर आधारित होते. अधिवेशनाचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी केले. एका सत्रात सुरेश सोनी यांनी संस्कृत कुटुंबाची कल्पना अधिक विशद केली. अधिवेशनात उपस्थित असलेल्या संस्कृत कुटुंबांचे अनुभव कथन अत्यंत रोचक होते. संस्कृत कुटुंब म्हणजे ज्या घरी माता-पिता संस्कृत भाषेत संवाद करतात व त्यामुळे अपत्यांची मातृभाषा संस्कृत आहे. अशी कुटुंबे स्वाभाविक आकर्षणाचे केंद्र होती. दर तीन वर्षांनी होणाऱ्या या संमेलनात संस्कृतभारतीच्या अखिल भारतीय अध्यक्षांची निवडणूक होते. त्याप्रमाणे अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ती झाली. प्रो. रमेश कुमार पाण्डेय (मनेसर, हरयाणा) हे बिनविरोध पुढील तीन वर्षांसाठी अध्यक्ष निर्वाचित झाले. पूर्व अध्यक्ष प्रो. गोपबन्धु मिश्र (काशी) यांनी सन्मानपूर्वक नवीन अध्यक्षांना आसनस्थ केले. रमेश कुमार हे निवृत्तीपूर्वी लालबहादूर शास्त्री केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे (दिल्ली) कुलपती होते. त्यावेळी ते दिल्ली प्रांताचे संस्कृतभारतीचे अध्यक्षसुद्धा होते. दुसऱ्या दिवशी नवीन अध्यक्षांनी अखिल भारतीय समिती व क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या घोषणा केल्या. विशेष कार्यक्रम म्हणजे रात्री बंगाल प्रांताच्या कलाकारांनी प्रस्तुत केलेल्या भाण रूपकाचे मंचन. पात्रे दोन. दोघेही नर्तक. एक नृत्य करतानाच संस्कृत भाषेत निवेदन पण करीत होता. निवेदनात व्याकरण, दर्शन, साहित्य इत्यादी गंभीर विषयांचे प्रतिपादन लीलया केले गेले. अद्भुत असा हा भाण प्रकार संस्कृत साहित्यात वर्णित आहे. पण त्याची प्रत्यक्ष प्रस्तुती अनेकांना पहिल्यांदाच पाहायला मिळाली. विलक्षण असलेले हे नृत्य नाट्य सर्वांच्याच स्तुतीला पात्र ठरले.

अधिवेशनात सहभागी प्रतिनिधींचे गटशः सामूहिक खेळ पण झाले. त्याला क्रीडोत्सव असे नाव दिले होते. अशा प्रकारे तीन दिवस उत्साह, ज्ञान चर्चा, आनंद यात कसे संपले काही कळले नाही. अधिवेशन खरंच एक सुशोभित, समृद्ध अनुभव होता, जणू संस्कृत गंगेचा प्रवाह! संस्कृत कुंभमेळाच वाटला! संपूर्ण समारंभाची व्यवस्था अत्यंत शिस्तबद्ध आणि नीटनेटकी होती. प्रत्येक कार्यकर्ता झऱ्यासारखा आपल्या कार्यात प्रेमाने, भक्तीने, सेवेच्या भावनेने, थकवा न जाणता गुंतलेला होता.

जयतु सस्कृतं विश्वपोषकम्!

संस्कृत भारती
shreeshdeopujari@gmail.com

## वेध

नीलेश जोशी

# विकृत मनोवृत्ती, उदासीन प्रशासन

'यत्र नार्यस्तू पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' असा संस्कृत श्लोक आहे. जिथे स्त्रीचे पूजन होते तिथे देवता वास करतात असा त्याचा अर्थ. आमच्या संस्कृतीत मातृपूजनाचे मोठे महत्त्व आहे. आश्विन नवरात्र तर मातृपूजनाचा मोठा उत्सवच. एकीकडे हजारो वर्षांपासूनची ही समृद्ध परंपरा असतानाच दुसरीकडे महिलांचे लैंगिक शोषण, विनयभंग, अत्याचार या मन सुन्न करणाऱ्या घटना वारंवार समोर येतात. या घटना कायद्याने गुन्हा या श्रेणीत येत असल्या तरी खरं म्हणजे हा मानवी सभ्यतेवर असलेला काळाकुट्ट डागच.

माहिती तंत्रज्ञान, शिक्षण आणि जागतिकीकरणाच्या या युगात आपण भौतिक प्रगती तर झपाट्याने करीत आहोत पण त्याच गतीने दिवसेंदिवस कमी होत असलेली नैतिकता ही समाजासमोर असलेली मोठी समस्या आहे. त्यातही ज्याने नैतिकतेचे, चांगुलपणाचे, चारित्र्याचे शिक्षण देणे अपेक्षित आहे असा शिक्षकच जेव्हा विद्यार्थिनींचा विनयभंग करतो तेव्हा मात्र स्वाभाविक आत्यंतिक चीड निर्माण होते. अकोला जिल्ह्यातील पातूर तालुक्यात असलेल्या एका आडवळणाच्या गावात जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकाने पाच चिमुकल्या मुलींचा विनयभंग केल्याची घटना उघडकीस आली आणि पुन्हा याबाबतची चर्चा सुरू झाली. देशात महिला, मुलींवर अत्याचाऱ्याच्या घटना नेहमीच घडतात. या संदर्भातील नोंद झालेली आकडेवारी भयावह आहे. २०२४ च्या आकडेवारीनुसार दररोज ९० पेक्षा अधिक बलात्काराच्या घटना नोंदविल्या जातात. केवळ अकोला जिल्ह्याचा आणि त्यातही शाळांमधील प्रकरणाचा विचार केला तर गत दोन वर्षांत पातूर तालुक्यात उघडकीस आलेली ही चौथी घटना आहे. एप्रिल २०२३ मध्ये बार्शिटाकळी तालुक्यातील धामणदरी येथील जिल्हा परिषद शाळेत दोन शिक्षकांनी चार मुलींवर अत्याचार केला होता. तर दुसरी घटना जुलै २०२४ रोजी गुडधी जिल्हा परिषद शाळेत घडली होती. पोषण आहार मदतनिसाने येथे मुलीचा विनयभंग केला होता. तिसऱ्या घटनेत बाळापूर तालुक्यातील काझीखेड जिल्हा परिषदेत शाळेतील विद्यार्थिनींनी शिक्षकाकडून छळ होत असल्याचा आरोप केला होता. या चारही घटनांमधील आरोपींना अटक करून गुन्हे देखील दाखल करण्यात आले. पण केवळ गुन्हे दाखल करून या समस्येचे निराकरण शक्य आहे का? हा खरा प्रश्न आहे. महिला, मुलींचे लैंगिक शोषण, विनयभंग हे मानवी मूल्यांच्या अध:पतनासह एक विकृती आहे. ही विकृती थांबविण्यासाठी केवळ कायद्याच नव्हे तर नैतिक मूल्य, संस्कारांची रुजवण आवश्यक आहे आणि त्यासाठी समाजातील विविध व्यक्ती, संघटनांना सकारात्मक पुढाकार घ्यावा लागेल. शासन देखील याबाबत गंभीर आहेच. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात यापूर्वी घडलेल्या घटनांमधून धडा घेत शासनाने विविध उपाययोजना त्या-त्या स्तरावर केल्या आहेत. यात शालेयस्तरावर सखी-सावित्री समितीचे गठन करून या समितीद्वारा संवाद आणि समुपदेशनाच्या माध्यमातून जाणीव जागरणाचे काम व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. स्त्री, मुली यांना आधार वाटावा याकरिता पोलिस प्रशासनाचे दामिनी पथक देखील कार्यरत आहे. पण मुळात सर्वच ठिकाणी या समिती, पथकाची क्रियाशीलता किती असा प्रश्न आहे. बहुतांश ठिकाणी सखी-सावित्री समिती केवळ कागदावर तर दामिनी पथक शहर, तालुकास्तरावर असलेल्या शाळा-महाविद्यालयांपर्यंत पोहोचून फोटो काढण्यात धन्यता मानते. काही ठिकाणी चिडीमारांचा बंदोबस्त होतो हे मान्य असले तरी स्वत:हून आवश्यक असलेला पुढाकार या समिती, पथकाद्वारे घेतल्या जात असल्याचे दिसून येत नाही. प्रशासकीय कोडगेपणाचे आणखी एक उदाहरण म्हणजे अकोला जिल्ह्यातील शाळांमधील घटनांनंतर राज्य शासनाने जिल्ह्यातील ९१२ शाळांमध्ये सीसीटीव्ही लावण्यासाठी तब्बल ४.१० कोटींचा निधी जानेवारी महिन्यात मंजूर केला. पण तब्बल ९ महिन्यांनंतरही शाळांमध्ये सीसीटीव्ही लागले नाहीत. जेमतेम दोन दिवसांपूर्वी त्याची निविदा प्रकाशित करण्यात आली आहे. शिक्षण क्षेत्रातील घटनांमुळे विकृतांबद्दल चीड निर्माण होणे स्वाभाविक आहे. पण याबाबत शासनाने योजिलेल्या उपाय योजनांची प्रशासनाने केवळ खानापूर्ती करावी हेही संतापजनक नव्हे का?

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

# लाल किल्ला किती वेळा 'लाल' होणार?

राजधानी दिल्लीत लाल किल्ला मेट्रो स्थानकाजवळ सोमवारी सायंकाळी झालेल्या शक्तिशाली स्फोटाने दिल्लीच नाही तर संपूर्ण देशाला जबर धक्का बसला आहे. लालकिल्ला आणि चांदनी चौकचा भाग हा अतिशय गर्दीचा भाग आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत या भागात हजारो लोक फिरत असतात. या भागात दिवसा कोणत्याही वेळी पायी चालणेही कठीण होते, एवढी गर्दी या भागात असते. त्यात सायंकाळची वेळ म्हटली तर विचारायलाच नको. त्यामुळे कार बॉम्बस्फोटासाठी दहशतवाद्यांनी या भागाची निवड का केली, याची कल्पना आपल्याला येईल.

या स्फोटाबाबत जी माहिती समोर येत आहे, ती अतिशय धक्कादायक आहे. या स्फोटाची जबाबदारी अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेने स्वीकारली नसली तरी अनेक दहशतवादी संघटनांचा यात सहभाग आहे, यात शंका नाही. या स्फोटप्रकरणी उत्तरप्रदेशच्या फरिदाबाद येथून ज्यांना अटक करण्यात आली, ते सर्व उच्चशिक्षित म्हणजे डॉक्टर आहेत. अशिक्षित वा अल्पशिक्षित लोकांचे ब्रेनवॉशिंग करणे सोपे असते, असे आतापर्यंत मानले जात होते, पण या स्फोटाने तर उच्चशिक्षित लोकांचेही ब्रेनवॉशिंग करणे कठीण नाही, हे दिसून आले.

शहरी नक्षलवादी या संकल्पनेसारखी आता शहरी दहतशवादी ही नवी संकल्पना समोर आली असे म्हणावे लागेल. देशाची राजधानी सर्वांत सुरक्षित मानली जाते. पण राजधानीत स्फोट घडवून दहशतवादी संघटनांनी आपले खतरनाक मनसुबे जाहीर केले आहेत. देशात मोदी सरकार सत्तेवर येऊन ११ वर्षे पूर्ण झाली आहेत. पण या ११ वर्षांच्या काळात देशाच्या राजधानीत एकही मोठा असा बॉम्बस्फोट झाला नव्हता. पण यावेळी स्फोट घडवून दहशतवाद्यांनी

एकप्रकारे मोदी सरकारला आव्हान दिले आहे. सरकारच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच या हल्ल्यातील सूत्रधारांना सोडणार नाही, कट रचणाऱ्यांना याची जबर किंमत चुकवावी लागेल, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे, तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी हल्लेखोरांना शोधून काढा, कुणालाही सोडू नका, असे निर्देश सुरक्षा दलांना दिले आहेत.

दिल्लीत झालेला हा पहिला स्फोट नाही. मागील २९ वर्षांत अनेक स्फोटांनी दिल्ली हादरली आहे. अशा स्फोटांनी काही काळ अस्वस्थता पसरत असली तरी दिल्ली घाबरली कधीच नाही. दिल्लीच्या लोकांनी हिंमत सोडली नाही. गेल्या २९ वर्षांत दिल्लीत १६ लहान मोठे स्फोट झाले. २५ मे १९९६ ला दिल्लीच्या लाजपतनगर बाजारात पहिला स्फोट झाला. यात १६ जण मृत्युमुखी पडले. त्यानंतर १ ऑक्टोबर १९९७ ला दिल्लीच्या सदर बाजारात दोन स्फोट झाले. या स्फोटात ३० जण जखमी झाले, पण सुदैवाने कोणाचा बळी गेला नाही. याच महिन्यात दिल्लीच्या वेगवेगळ्या भागांत आणखी तीन बॉम्बस्फोट झाले. १० ऑक्टोबर, १८ ऑक्टोबर आणि २६ ऑक्टोबरला बॉम्बस्फोट झाले. या बॉम्बस्फोटात प्राणहानी मोठ्या प्रमाणात झाली नसली तरी काही जण जखमी झाले. १० ऑक्टोबरला शांतिवन, कौडिया पूल आणि किंग्जवे कॅम्प या भागात बॉम्बस्फोट झाले. यात १६ जण जखमी झाले. १८ ऑक्टोबरला राणी बाग मार्केटमध्ये दोन स्फोट झाले. यात १ जण ठार, २३ जण जखमी झाले. २६ ऑक्टोबरला करोलबाग बाजारात पुन्हा दोन बॉम्बस्फोट झाले. यात एक जण ठार तर ३४ जण जखमी झाले.

३० नोव्हेंबरला १९९७ ला लाल किल्ला परिसरात दोन स्फोट झाले. यात ३ जण ठार, ७० जखमी झाले. ३० डिसेंबर १९९७ ला पंजाबीबाग परिसरात झालेल्या बसस्फोटात ४ जण ठार, तर ३० जखमी झाले. २७ जानेवारी २००० ला पहाडगंज भागात एक स्फोट झाला. १६ मार्चला सदर बाजार परिसरात बॉम्बस्फोट झाला, यात ७ जण जखमी झाले. १८ जून २००० ला लाल किल्ला परिसरात दोन शक्श्शिाली स्फोट झाले. यात दोन जण ठार तर अनेक जण जखमी झाले. यावेळी पुन्हा लाल किल्ला परिसरात बॉम्बस्फोट झाला, याचाच अर्थ लाल किल्ला परिसर हे तेव्हाही दहशतवाद्यांचे सॉफ्ट टार्गेट होते आणि आताही आहे. कारण हा परिसर अतिशय गर्दीचा आणि संवेदनशील आहे.

डिसेंबर २००१ मध्ये अतिरेकी संघटनांनी संसदेवर हल्ला केला होता. यात संसदेचे कर्मचारी आणि सुरक्षा जवान मिळून ९ जण हुतात्मा झाले होते. सतर्क सुरक्षा यंत्रणांनी अतिरेकी हल्ल्याचा हा प्रयत्न हाणून पाडला, अन्यथा त्या दिवशी संसदभवन परिसरात काय अनर्थ घडला असता, याची कल्पना करवत नाही. कारण त्या दिवशी संसदभवन परिसरात अनेक अतिमहत्त्वाच्या व्यक्ती उपस्थित होत्या. संसदेवरील अतिरेकी हल्ला हा लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरावर झालेला हल्ला मानला जात होता. २२ मे २००५ ला लिबर्टी आणि सत्य चित्रपटगृह परिसरात दोन बॉम्बस्फोट झाले. यात एक जण ठार तर ६० जखमी झाले. २९ ऑक्टोबर २००५ ला सरोजिनीनगर, पहाडगंज आणि गोविंदपुरी या तीन भागांत तीन शक्तिशाली बॉम्बस्फोट झाले. यात ५९ जण मृत्युमुखी पडले तर शंभरावर जखमी झाले. राजधानी दिल्लीतील हा सर्वांत शक्तिशाली स्फोट मानला जातो. १४ एप्रिल २००६ ला लाल किल्ला परिसरातील जामा मशीद जवळ दोन स्फोट झाला. यात १४ जण जखमी झाले. १३ सप्टेंबर २००८ ला करोल बाग (गफ्फारबाग), कॅनॉटप्लेस आणि ग्रेटर कैलाश १ मध्ये एकूण पाच स्फोट झाले. यात ३० च्या जवळपास माणसे मृत्युमुखी पडली. २७ सप्टेंबर २००८ ला मेहरौली परिसरातील फुल बाजारात स्फोट झाला. २५ मे २०११ ला दिल्ली उच्च न्यायालयाच्या पार्किंगमध्ये स्फोट झाला. यात कोणतीही प्राणहानी झाली नसली तरी यामुळे सुरक्षाव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले.

हे सर्व बॉम्बस्फोट संपुआ शासनकाळात झाले होते. २०१४ मध्ये मोदी सरकार आल्यानंतर राजधानी दिल्लीत एकही बॉम्बस्फोट झाला नाही. मोदी सरकारच्या ११ वर्षांत देशाच्या काही भागांत स्फोट झाले असले तरी राजधानी दिल्लीत एकही स्फोट नव्हता. त्याची कसर यावेळी अतिरेकी संघटनांनी भरून काढली. मोदी सरकारच्या काळात राजधानी दिल्लीही सुरक्षित नाही, असा संदेश यातून अतिरेकी संघटनांना द्यायचा असावा. त्यामुळे त्यांनी लाल किल्ला परिसरात यावेळी कार बॉम्बस्फोट घडवून आणले, असे म्हणायला जागा आहे. लाल किल्ला हा राजधानी दिल्लीचाच नाही तर देशाचा मानबिंदू म्हणायला पाहिजे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्यांदा झेंडावंदन याचठिकाणी झाले होते. ती परंपरा कायम ठेवण्यासाठी दरवर्षी १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावरच स्वातंत्र्यदिनाचा मुख्य शासकीय कार्यक्रम होत असतो. पंतप्रधान लाल किल्ल्यावरच तिरंगा फडकवून देशाला संबोधित करत असतात. त्यावरून लाल किल्ला परिसराचे महत्त्व आपल्या लक्षात येते. लाल किल्ल्याचा परिसरात निरपराध लोकांचे लाल रक्त सांडण्यासाठी दहशतवाद्यांनी यावेळी पुन्हा एकदा या परिसरात शक्तिशाली बॉम्बस्फोट घडवले. या स्फोटप्रकरणी अटक करण्यात आलेले सर्व जण मुस्लिम आहेत. देशातील सर्व मुस्लिम अतिरेकी नसले तरी जे अतिरेकी आतापर्यंत वेगवेगळ्या बॉम्बस्फोट प्रकरणात पकडले गेले, ते सर्व मुस्लिम आहेत, याकडे आपल्याला दुर्लक्ष करता येणार नाही. त्यामुळे यावेळी देशातील मुस्लिम समाजावरील जबाबदारी वाढली आहे. आपण राष्ट्रभक्त आहोत, आपली श्रद्धा आणि निष्ठा या देशाच्या मातीवर आहे, भारत हीच आपली मातृभूमी आहे, या देशाच्या मातीला वंदन करत वंदे मातरम् म्हणायला आपण तयार आहोत, हे सिद्ध करण्याची शेवटची संधी मुस्लिम समाजाला मिळाली आहे. या संधीचे त्यांनी सोने केले पाहिजे, माती करू नये. अन्यथा त्यांच्यावरच मातीत जाण्याची वेळ आल्याशिवाय राहणार नाही. या देशातील राष्ट्रभक्त जनता आणि मोदी सरकार असला प्रकार खपवून घेणार नाही. याला जशास तसे उत्तर दिले जाईल, याची जाणीव त्यांनी ठेवली पाहिजे.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### आपणही सतर्क हवे

भारताची राजधानी असलेल्या दिल्लीत स्फोट झाला ही बाब अतिशय गंभीर आहे. या घटनेमुळे संपूर्ण देश हादरला आहे. याच्या मुळाशी कोण आहे याचा अंदाज व्यक्त केला जातो आहे. तपास यंत्रणेचे कार्य सुरू असताना यात उच्चशिक्षित व्यावसायिकांचा हात असल्याचा अंदाज वर्तवला जातो आहे. याचा अर्थ दहशतवादी हे आतापर्यंत कट्टरपंथी किंवा अशिक्षित लोक असतात अशी धारणा होती ती खोटी ठरली आहे. ज्या व्यावसायिकांकडे जनता आदराने आणि विश्वासाने बघते ती साफ खोटी ठरली आहे. स्फोट मोठा असो वा मोठा ही बाब गौण ठरली आहे. ज्यांच्या कुटुंबावर हा आघात झाला त्यांच्या दुःखाला पारावार नाही. या घटनेमुळे देशविदेशात दहशत पसरली आहे. मोठ्या मेट्रो शहरात कुठेही घराबाहेर पडताना सामान्य माणसाच्या मनात सुरक्षितता राहील काय? गेल्या दशकात मोदी सरकारच्या काळात निर्माण झालेल्या सुरक्षिततेच्या भावनेला धक्का बसला आहे. देशभरात भीतीचे सावट निर्माण झाले आहे. सरकार आणि तपास यंत्रणा अव्याहतपणे परिश्रम घेत आहेत तरी केव्हा, कुठे, कधी दुर्घटना घडवल्या जाईल याबद्दल सामान्य नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे आणि हेच दहशतवाद्यांना हवे आहे त्यामुळे आपणही सतर्क व्हायला हवे.

**स्नेहल प्रकाश खंडाळगे**/नागपूर

### बालकांच्या हक्कांचे रक्षण सर्वांची जबाबदारी

बालके ही राष्ट्राची अमूल्य संपत्ती आहे. देशाच्या या अनमोल राष्ट्रीय संपत्तीचे लालनपालन, पोषण सुव्यवस्थित, निकोप, निरोगी, चारित्र्यसंपन्न व्हावे. उद्याचे ते एक जबाबदार नागरिक घडावेत, आदर्श नागरिक घडावेत ही सर्वांची अपेक्षा असते. यास्तव आई-वडील, शिक्षक, समाज व पालक या सर्वांनी बालकांबाबत अत्यंत जागरूक व संवेदनशील असायला हवे. त्यांना उत्तम शिक्षण मिळावे, उत्तम आरोग्य आहार मिळायला हवा. त्यांची सुरक्षितता ही अत्यंत महत्त्वाची आहे. या सर्व बाबी बालकांना आपली प्रारंभापासून उत्तमरीत्या व नियमित मिळाल्या तर उद्याच्या देशाचा हा बालक देशाची धुरा सांभाळण्यास सक्षम, सुदृढ असेल. अलिकडे बालक व बालकांच्या हक्कांकडे सर्वच स्तरावर दुर्लक्ष होत आहे. बालकांचे जीवन सर्वच स्तरावर सुरक्षित असावे व त्यांच्या हक्कांवर कुणीही गदा आणू नये असे वाटते.

**धोंडिरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### श्री कालभैरव जयंती!

कार्तिक कृष्ण पक्ष अष्टमीला श्री कालभैरव जयंती साजरी केली जाते. या दिवशी भगवान कालभैरवाचा जन्म झाला होता, म्हणून ही जयंती साजरी करतात. भैरव हा भगवान शंकराचा एक रौद्र अवतार मानला जातो. पुराणानुसार, एकदा ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तिघांमध्ये श्रेष्ठत्वाचा विवाद झाला.

त्या वेळी भगवान शंकरांनी रौद्र रूप धारण करून कालभैरव या स्वरूपात अवतार घेतला. या रूपाने त्यांनी ब्रह्मदेवाच्या अहंकाराचा नाश केला. म्हणून या दिवसाला कालभैरव जयंती म्हणतात. या दिवशी भगवान कालभैरवाचे पूजन केले जाते. कालभैरवाचे वाहन कुत्रा असल्याने त्याला नैवेद्य दाखवला जातो. 'भैरव' म्हणजे 'भयाचा नाश करणारा', जो भक्तांच्या सर्व प्रकारच्या भीतीचा नाश करतो.

या दिवशी भक्त 'कालभैरवाष्टक स्तोत्र' पठण करतात व भगवान कालभैरवाचा मंत्रजप करतात. या स्तोत्राच्या जपाने सर्व प्रकारचे भय नाहीसे होते. असे मानले जाते की, या दिवशी भगवान शंकराच्या भैरवरूपाचे स्मरण करून साधना प्रारंभ केल्यास जीवनातील संकटे, भय आणि अडचणी दूर होतात आणि यश, आरोग्य, शांतता प्राप्त होते.

**रेणुका हरदास**/नागपूर

## आजचे संघगीत-४१

गुरुवार, १३ नोव्हेंबर २०२५

### रक्षणार्थ ठाकुनी उभे चहूकडे

रक्षणार्थ ठाकुनी उभे चहूकडे
करु समर्थ हा समाज होउनी पुढे ॥धृ.॥

अन्नवस्त्र अल्पसे आसरा नसे पुरा
जाहला नसे प्रबुद्ध देश हा खराखुरा
सिद्धीस्तव कष्टांचे शिंपुनी सडे ॥१॥

भक्तिहीन वृत्तिचे शक्तिहीन बापुडे
जन्मती नांदती नष्ट होति बुडबुडे
जागत्या जनार्दनास घालु साकडे ॥२॥

सद्गुणी पराक्रमी आपुल्या पिढ्या पिढ्या
दुर्दिनास पचवुनी राहिल्या सदा खड्या
सांगतात नौबती सांगतात चौघडे ॥३॥

व्यक्ति व्यक्ति भिन्नता, ती मतस्वतंत्रता
घडवु त्यातुनी समर्थ स्नेहशील एकता
एकसूत्र सर्व लोक करुनिया खडे ॥४॥

नांदवुन शांतता, फुलवुनी समृद्धता
नाव सार्थ हे करू सुवर्णभूमि भारता
चालणे चालणे चालणे पुढे पुढे ॥५॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत बसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७६९८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# आकांक्षा

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

## आनंदाचे डोही

**अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८**

# सत्संगाची अवीट गोडी



मानवी मनाला मुळातच आनंदाची ओढ असते. शांती समाधानाचे पुष्प मिळवण्यासाठी मन धावत असते खरे पण, ते इतरत्र भटकत कुठेतरी ...मध्ये गुरफटते. त्या मनाला पुन्हा समाधानाचे लेपन करण्यासाठी सत्संग फार महत्त्वपूर्ण भूमिका निभावतो. आज धकाधकीच्या जीवनात तणाव भोवती पिंगा घालत असतो. त्यातून स्वतःला सावरत, शांतीचे चांदणे अनुभवण्यासाठी मानवी मनाला सत्संगाची आवश्यकता असते.

सत्संग म्हणजे एकप्रकारे ध्यान धारणाच होय. गुरु सान्निध्यात केलेले नाम संकीर्तन, सद्विचारांचे श्रवण यामुळे सकारात्मक चैतन्यगंधाने मन उल्हासित आणि प्रसन्न होते. तणावात असताना मनातील त्याच त्या विचारांचा प्रभाव कमी करण्यास हे प्रभावी साधन होय. मनाला स्थैर्य प्रदान करून शांती समाधानाचे दीप तेजाळतात. मनःस्थितीनुसार त्यांची दीप्ती कमी-जास्त जाणवली तरी त्या तरंगांनी ताणग्रस्तता खचितच कमी होते. पावित्र्याचा धूप-दीप मनाचा गाभारा उजळवतो. कीर्तन, प्रवचन, नामस्मरण याने सत्संगाचा आनंद द्विगुणित होतो. संतांच्या किंवा गुरुबंधूंच्या सहवासात भक्तिमय सुमधुर गायन, भजन यातून ईश्वरार्चन करण्यात नादमाधुर्याची लय असते. संगीत कोणतंही असलं तरी ते मनावर अलवार आनंदाची पखरण करतंच. पण, तेच ईश्वरस्तुती करणारे भक्तिसंगीत असेल तर त्याचा अधिक आनंददायक परिणाम दिसून येतो. सत्संगातील सुरावटीत भक्ती, मांगल्य, ईश गुणगान काठोकाठ भरलेले असल्याने मनातील कुविचार, नैराश्य क्षणभर का होईना लोप पावतात. मनभर चैतन्य लहरी उसळतात. फुलांची टवटवी मनास मिळते.

भागवत असो की रामकथा, दासबोध असो, श्रवणानंद घेताना थोडावेळ स्वतःचा विसर पडून त्या कथेशी एकरूप होत एका वेगळ्या विश्वात प्रवेशतो. ईश्वरी शक्ती, चैतन्याशी तादात्म्य पावण्यास अनुकूल अशी स्थिती अनुभूत होते. मनपाखरू इकडे तिकडे भिरभिरले तरी पुन्हा तिथेच येऊन विसावते. ज्ञान मकरंद चाखण्याचा मनाचा छंद मनास आपोआपच गवसतो. गणपतीत अथर्वशीर्ष पठण असो की नवरात्रात श्री सूक्त, देवी पाठ, भजन असो विष्णू सहस्त्रनाम, विविध स्तोत्रांचे मोठ्याने केलेले पठण आनंदाचे निधान ठरते. मंत्रोच्चाराच्या विशिष्ट लयीचा, शब्दांचा मनावरच नव्हे तर रोमारोमावर असा काही परिणाम होतो की, आनंदी तरंगाची लाट उसळून येते आणि वेगळ्याच वातावरणाचा आनंद कळत नकळत अनुभवायला मिळतो.

एकाचवेळी अनेकांच्या हृदयी सकारात्मकतेची रुणझुण आनंदाच्या गीताची निर्मिती करत असते. सामुदायिक उच्च ऊर्जा स्रोतांचा सकारात्मक प्रभाव अधिक आनंद देऊन जातो. आपापल्या इष्ट देवतेची, गुरूची आराधना करण्यासाठी ठिकाणी आयोजिण्यात येणाऱ्या उपासना मंडळांची आनंदी मांदियाळी वाढती आहे. सत्संगाच्या आनंदासारखा परमानंद कोणता बरे ! असे परमार्थाच्या वाटेवरील सर्व शिष्यांना वाटते. तर, शांतीच्या शोधात असलेल्यांना उल्हासित करणारी ही वाट आवडू लागते. गुरूसान्निध्य, ईश्वराशी निकटता वाढविण्यास सत्संग सहाय्यक ठरतो, मनोभूमी तयार होते. मनाची निर्मळता वाढते, काजळी दूर सारली जाते. मांगल्याची वीणा पावित्र्याची धून वाजवीत आनंद, सत्संगातून ब्रम्हकमळासम मंद दरवळ देत जीवन सौख्य वाढवतो. भक्तांकरीता गुरू भेट कोणत्याही माध्यमातून होत असली तरी, ती आनंदवर्षा ठरते. सत्संगाच्या आनंदोत्सवात चिंब भिजून आयुष्याची वाटचाल सुकर होते. हा आनंद अनुभवत पुन्हा आनंदाच्या डोहात डुंबत रहावेसे वाटते.

**'सत्संगाचा होई ऐसा साक्षात्कार,**
**विचलित मनास नेई शांतीच्या वाटेवर'**

त्या चैतन्यदायी स्वरांची अशी जादुगारी होते की, मेंदूचे डावे-उजवे दोन्ही गोलार्ध संतुलनाच्या स्थितीत येतात. शांती, स्थैर्य आणि आनंदाची मूळ स्थिती सहजची लाभते. अंतर्मनात चाललेली चलबिचल शांतावते. विश्वाच्या लयीशी जोडल्या जाऊन उच्च ऊर्जा, कंपने यांच्या जाणिवा मनःकेंद्रांवर नकळत अंकित होतात. अंतर्मुख होऊन शांतीच्या तरंगांना ग्रहण करण्याची क्षमता वाढते. आनंदाच्या नगरीचे प्रवेशद्वार उघडते. आपण जितके आत खोलात जाऊ तितके हे आनंद धन आपल्याला चिकटत जाईल. भावनिक, मानसिक, शारीरिक पातळीवर चंदनी गंधाचे विलेपन झाल्याचे जाणवत राहते.

म्हणून मानसिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी सत्संगाचा जीवनात अंतर्भाव करणाऱ्यांचे प्रमाण वाढते आहे. उपासना मंडळातील उपस्थिती वाढती आहे, शाश्वत आनंदाचा ठेवा प्रत्येकालाच हवा असतो पण, भौतिक प्रलोभनांची लेणी गुंतवून ठेवतात. अशावेळी सत्संगाची मात्रा अधून मधून थोडी घेत गेलं की, मनुष्य आपल्या मूळ चैतन्य आनंदाशी जोडल्या जातो.

काही क्षण का होईना विकारांचे काटे झडून जातात आणि सुकोमल सुगंधित आनंदीत पुष्पलता मनात उमलतात. चैतन्याच्या प्रमुदित स्पर्शाने, आनंदाचे कारंजे थुई थुई नाचतात. कोवळ्या सूर्यकिरणांनी वसुंधरा जशी उजळून निघते तशी मनाची स्थिती अनुभवायला मिळते. चंद्र-चांदण्यांची शीतल कौमुदी प्रसन्नतेची पौर्णिमा मनाच्या पटलावर हळूवार गोंदल्या जाते. प्रसन्न शांतीच्या शीतल लहरी तनमन व्यापून टाकतात. आत्मोन्नतीची वाट प्रकाशमय होते. सत्संगात व्यक्ती भान हरपून नाचू-गाऊ लागते. टाळ-चिपळ्यांच्या नादात हरवून जाते. नाम संकीर्तनाच्या जयघोषात तल्लीन होते. शुभ, पवित्र विचार तरंगात रममाण होत आनंदाच्या रथावर आरूढ होते. असा एकत्रित सकारात्मक परिणाम उच्च आभामंडळाची निर्मिती करतो. म्हणूनच, एकट्यात केलेल्या उपासना, साधनेसोबत सामुदायिक सत्संगाचा प्रभाव अधिक आनंददायी दिसून येतो. भारतवर्षात सत्संग सुधा अविरत प्रवाही आहे. म्हणूनच, आनंद आणि परमार्थ हे हातात हात घालून प्रसन्नतेचा प्रसाद सर्वांना देत आहेत.

काळज्यांचे माहेरघर असलेले मन आनंदी वास्तूत रुपांतरीत करण्याची शक्ती सत्संगात आहे. त्यामुळे मनाची अस्वस्थता, घालमेल अपूर्णता यांना पूर्णविराम देण्यासाठी सत्संग आनंद कधीतरी वेळात वेळ काढून साधायलाच हवा. कर्जबाजारी स्थिती, भीती, अपमान आणि अपयशाने खचलेल्या मनास धैर्य प्राप्त होऊन जीवनातील वादळ पेलण्याचे सामर्थ्य मिळते. आंतरिक सकारात्मकतेची ऊर्जा पातळी वाढून आनंदी संप्रेरके स्त्रवू लागतात. म्हणूनच,

**सत्संगाची अवीट गोडी । चाखावी थोडी थोडी ॥**

## संगीतिका

**संगीता तांबोळी/ ९८२२७३९४९३**

# मी मज हरपून बसले गं...



काही गाणी वर्षानुवर्षे कित्तीही वेळा ऐकली, तरी ती पुन्हा ऐकावीशीच वाटतात...अगदी पुन्हा पुन्हा! विविध गायकांनी त्याला स्वर साज चढवला असला तरी, त्याची गोडी किंचितही कमी होत नाही. त्यापैकीच हे आजचं गाणं मंडळी!

**मी मज हरपून बसले गं...**

कविवर्य सुरेश भट यांच्या बहारदार लेखणीतून उतरलेली ही रचना कितीतरी दिग्गज गायिकांनी त्याला आपल्या स्वरात गायले आहे, प्रत्येकीची स्वरांची गोडी अवीटच...पण चिरंतन लक्षात राहतो तो आशाताई भोसले यांचा स्वर! पंडित हृदयनाथ मंगेशकर यांचं संगीत या गाण्याला लाभले आहे.यमन कल्याण रागात असलेलं हे गीत खरंच,एकदा ऐकलं तरी दीर्घकाळ मनात हळुवारपणे रेंगाळत राहतं. गीताचा विषय देखील अगदी आपला वाटणारा...

राधा,कृष्ण, गोपिका हे सारे काही वेगळेच रसायन आहे. त्यांचे गारूड आहे साऱ्या रसिकांच्या आणि कवी-लेखकांच्या मनावर!

**मी मज हरपून बसले गं,**
**सखी मी मज हरपून बसले गं...**

कितीतरी वेगवेगळ्या पद्धतीने हे गाणं आपल्या मनात रुंजी घालतं. कधी राधा अन् तिच्या सखीचा कृष्णाबद्दलचा संवाद वाटतो तर कधी एखाद्या कृष्णवेडी गोपिकेची ती नाजूक तक्रार वाटते. शब्द न शब्द 'लाजवाब' म्हणावा असाच अगदी!

**आज पहाटे श्रीरंगाने,**
**मजला पुरते लुटले गं**
**साखर झोपेमध्येच अलगद,**
**प्राजक्तासम लुटले गं**

किती सुंदर शब्दात, प्रणयवर्णन केलंय नं!

स्वप्नात देखील तिला या श्रीरंगरूपाचेच ध्यान आहे आणि तो तर तिला हळूच येऊन भेटून देखील गेलाय. ती इतकी त्याच्या विचारात बुडून गेली आहे की, स्वप्न आणि वास्तव यांचे भान पण ती विसरली आहे, स्वतःला हरवून बसली आहे ती! काय सत्य अन् काय भास, याचा काही मेळ साधता येत नाहीये तिला! तिचं सारं चित्त त्यानंच व्यापलं आहे. ती स्वतःदेखील स्वतःची राहिली नाहीच मुळी! शृंगार रसाचा किती अलवार आविष्कार आहे हा! त्याची नजाकत देखील तितकीच गूढ! ही सारी आपबिती ती तिच्या सखीला सांगताना देखील मनात मोहरतेय. आता तर तिला त्याचे श्वास पण जाणवू लागलेत. अद्वैताचा हा परमोच्च बिंदू !

**त्या श्वासांनी दीप कळी गत,**
**पळभर मी थरथरले गं**
**त्या स्पर्शाच्या हिंदोळ्यावर लाजत उमलत झुलले गं**

हवेची नाजूक झुळूक आल्याने दिव्याची ज्योत जशी थरथरावी, अगदी तशीच तिची अवस्था झाली आहे. त्या स्वप्नवत स्पर्शाने ती लाजून चूर झाली आहे.

सत्यातलं स्वप्न की स्वप्नातलं सत्य, काहीच कळत नाही. गाणं ऐकताना हेच गारूड रसिकांवरही होतं. खरी गंमत तर त्यानंतर पुढे घडते. त्याच्या विचारात ती गढून गेली आहे, अगदी रममाण झाली आहे. त्याचा आणि त्याचाच म्हणजे चित्तचोर श्रीरंगाचाच विचार, त्याचेच तिला सारखे भास होत आहेत. आता तर उघड्या डोळ्यांनीसुद्धा तिला त्याचीच स्वप्नं दिसत आहेत. हे तिचं त्याच्याप्रती असणारं समर्पण इतकं की, त्याच्या त्या 'नभ श्यामल मिठीत' वीज चकाकल्याचा भास होतो.

**त्या नभ श्यामल मिठीत नकळत,**
**बिजली सम लखलखले गं...**
**दिसला मग तो देवकी नंदन,**
**अन् मी डोळे मिटले गं...**

कविवर्य सुरेश भट हे शब्दांचं साम्राज्यच उभं करतात अगदी! इथली हीच शब्दरचना रसिकांच्या मनाला भुरळ पाडते. 'नभ श्यामल मिठी'चा संदर्भ येताच, बिजली पण अगदी सहजगत्या आपसूकच संदर्भ घेऊन येतेच. किती कल्पकतेने योजले आहेत सारे शब्द ! नभाचा, श्यामलतेचा उल्लेख आल्याबरोबर निर्माण होणारे रोमांच म्हणजे वीजच! शब्दांचं सुयोग्य कोंदण वापरलं की, किती उदात्त अशी शृंगाररसाची निर्मिती होते, याचे हे उत्तम उदाहरण म्हणता येईल. या गीताची आणखीन एक विशेषता म्हणजे, यात वर्णन केलेल्या शब्दांनी रसिकांना त्या त्या अनुभवांची अक्षरशः अनुभूती येते. तेव्हा तुम्ही पण या गीतांच्या आनंदात वारंवार हरवून जा आणि मनसोक्त आनंद लुटा.

## अभिजात अमृत

**प्रा. सुनंदा पाटील/ ८४२२०८९६६६**

# डोहाळे पुरवा रघुकुलतिलका माझे...



संगीत हे आपल्या कष्टांवरचं, दुःखांवरचं, एक प्रभावी तसंच सौख्य वाढवणारं औषध आहे. या संगीताच्या मुळाशी जर शब्द असतील तर मग काय विचारता? आणि हे शब्द आपल्या मराठीचे असतील तर दुधात साखर! जात्यावरच्या ओव्यांचा जन्म अशाच प्रकारे झाला आहे. आजचं शीर्षक वाचून कळलं असेलच की, आजचा विषय आहे मराठीतली डोहाळ्याची गाणी! डोहाळे गीत म्हणजे गर्भवती स्त्रीसाठी आणि तिच्या होणाऱ्या बाळासाठी गायली जाणारी पारंपरिक गाणी! ही गाणी 'डोहाळे जेवण' या विधीचाच एक भाग आहेत ज्यात कुटुंब आणि मैत्रिणींच्या समवेत आनंद व्यक्त केला जातो. ही गाणी खेळ आणि विविध परंपरांचा सुरेख संगम आहेत. डोहाळे गीत गाण्याचा मुख्य उद्देश गर्भवतीला आनंदित करण्याचा आहे. या गाण्यांमधून स्त्रीच्या मातृत्वाचे कौतुक केले जाते आणि तिला कुटुंबातील सदस्यांकडून शुभेच्छा दिल्या जातात. डोहाळे जेवणाच्या वेळी अनेक नात्यातल्या, शेजारपाजारच्या, सासरमाहेरच्या महिला एकत्र येतात, विविध गाणी गातात. यामध्ये पारंपरिक ओव्या आणि इतर लोकगीतांचा समावेश असतो.

> **डोहाळे जेवणाची गाणी वेगवेगळी आणि प्रथासुद्धा वेगळ्या असतात. अनेक ठिकाणी डोहाळतुलीचा पाळणा करणे हाही भाग आहे. आंब्याच्या डहाळ्या आणि फुलांनी झोपाळा सजवला जातो. मुलीलाही छान सजवून फुलांचे दागिने घातले जातात. कुंकू लावून तिची ओटी भरतात. त्या गर्भवतीसाठी वेगवेगळे पदार्थ ताटात झाकून ठेवले जातात. तसेच, सात प्रकारच्या खिरी चांदीच्या वाटीत पुऱ्यांनी झाकून ठेवतात.**

सर्वसामान्यपणे हा सोहळा गर्भवतीला सातवा महिना लागला की केला जातो. या समारंभात तिच्या माहेरच्या लोकांनाही सहभागी केले जाते. यावेळी होणाऱ्या आईला हिरवी साडी नेसवली जाते, तिला सुंदर फुलांनी सजवलं जातं, सौभाग्यवाणांसह तिची ओटी भरतात. आईच्या आवडीचे पदार्थ केले जातात. त्यानंतर विविध खेळ खेळणे, गाणी गायली जातात. आज प्रत्येक गोष्ट शास्त्राच्या दगडावर घासून बघितली जाते. मग खरंच याही गोष्टीला काही शास्त्र आहे का? किंवा काही विज्ञान आहे का? हेही जाणून घेऊ!

साधारणपणे गर्भवती स्त्रीला पाचवा महिना लागला की, तिला गर्भाची हालचाल जाणवते. पुढे ही हालचाल वाढत जाते. या काळात तिला आराम हवा असतो. तिची इच्छा असेल ते सकस पण सुग्रास खाणं तिला द्यायचं असतं. त्यामुळे तिच्या गर्भाचीही वाढ अतिशय सुरेख होते. पूर्वी संयुक्त कुटुंब किंवा कुटुंबातील अधिक लोक, यामुळे त्या गर्भवतीच्या नशिबी सकस/सुग्रास अन्न येईलच, याची खात्री नसायची. त्यामुळे डोहाळे जेवणाचा सोहळा करून, सातव्याच महिन्यात तिला माहेरी पाठवलं जायचं. आपल्या माहेरी मुलगी जास्त आनंदी असते. यामागे गर्भाची आणि गर्भवतीची काळजी घेणे, हा एकमेव उद्देश होता. तसेच, आपल्याला अभिमन्यूची आणि चक्रव्यूह भेदाची गोष्ट सर्वांनाच ठाऊक आहे. त्यानुसार गर्भावरचे संस्कारसुद्धा आवश्यक आहेत, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

डोहाळे जेवणाची गाणी वेगवेगळी आणि प्रथासुद्धा वेगळ्या असतात. अनेक ठिकाणी डोहाळतुलीचा पाळणा करणे हाही भाग आहे. आंब्याच्या डहाळ्या आणि फुलांनी झोपाळा सजवला जातो. मुलीलाही छान सजवून फुलांचे दागिने घातले जातात. कुंकू लावून तिची ओटी भरतात. त्या गर्भवतीसाठी वेगवेगळे पदार्थ ताटात झाकून ठेवले जातात. तसेच, सात प्रकारच्या खिरी चांदीच्या वाटीत पुऱ्यांनी झाकून ठेवतात. या खिरी मालत्या, गव्हले, शेवया, सरगुंडे, जोंधळा, चिचमोहर अशा वेगवेगळ्या असतात. अंदाजाने ती मुलगी एक वाटी उघडते आणि मग तिला मुलगा होणार की मुलगी यावर तिची गंमत आणि थट्टामस्करी होते. त्यानंतर, चार स्त्रिया पाळण्याचे चार साखळदंड धरून डोहाळ्यांची गाणी म्हणतात. त्यात एका बाजूच्या दोन स्त्रिया तिच्या माहेरच्या आणि दुसऱ्या दोघी सासरच्या अशी भूमिका निभावत गाणी म्हणतात. यात मुख्यत्वे लोकसाहित्यातली ओवी हा प्रकार गायला जातो. शिवाय सध्या आधुनिक प्रकारची गाणीसुद्धा गायली जातात. इतरही हौशी स्त्रिया त्या गर्भवतीला आवडतील अशी आनंददायक गाणी गातात. साधारणतः या गाण्यांमध्ये तिचा गर्भवती म्हणून झालेला सात महिन्यांचा प्रवास आणि पुढे येणाऱ्या दोन महिन्यांचा प्रवास या घटनांचा उल्लेख असतो. जमलेल्या सर्व स्त्रियांना हळदीकुंकू देतात. गर्भवतीला भेटवस्तू देतात आणि सहभोजन होतं.

आपल्या शास्त्रात सातव्या महिन्याच्या डोहाळजेवणासाठी काही धार्मिक विधी आहेत का? तर, होय आहेत. हिंदू धर्मातील १६ संस्कारांपैकी गर्भाधान हा एक विधी केला जातो. या संस्कारानंतर इतर काही संस्कार जर केले नसतील तर पुण्याह वाचन व इतर विधी केले जातात. घरच्या कुळाचाराप्रमाणे या दिवशी मानवीण-सवाष्ण हिला जेवू घातलं जातं.

झोपाळ्यावर केल्या जाणाऱ्या डोहाळ जेवणाप्रमाणेच, चांदण्यातलं डोहाळ जेवण, नावेतलं, बागेतलं डोहाळे जेवण वगैरे केलं जातं. पूर्वी हा सोहळा घरगुती किंवा आसपासच्या काही बायका बोलावून केला जायचा. पण, आज याला 'बेबी शॉवर' या नावाखाली इव्हेंट्चं स्वरूप आलं ओ. एवढंच नाही तर मुंबईसारख्या शहरात लोकलमध्येसुद्धा मुलीच्या मैत्रिणी तिचं डोहाळे जेवण करतात.

***ओठात थांबुनी सशब्द आशा लाजे,***
***डोहाळे पुरवा रघुकुलतिलका माझे...***

हे प्रसिद्ध गीत गीतरामायण या पुस्तकात असून, ते ग.दि.माडगूळकर यांनी लिहिलंय. हे गीत तर गायलंच जातं. याशिवाय अनेक गाणी उपलब्ध आहेत. त्यातलं एक गाणं मात्र पिढ्यान्पिढ्या गायलं जातंय, तेच गाणं मी इथे देत आहे.

जाणार आज मी माहेराला
माझ्या माहेराला
ओटी भरा ग ओटी भरा
माझी ओटी भरा ॥ धृ ॥
हिरवी चोळी शालू हिरवा,
हाती भरला हिरवा चुडा
हिरवा मारवा वेणीत घाला,
माझ्या वेणीत घाला ॥१॥

हिरव्या वेली हिरव्या रानी,
मध्ये मी बसले हिरवी राणी
हिरवा चौरंग बसायला
मला बसायला ॥२॥
माझी मला जड झाली पाऊले,
डोळ्याभवती काळी वर्तुळे
आशीर्वाद तुम्ही द्या गं मला,
तुम्ही द्या गं मला ॥३॥

हसू नका गं गुपित सांगते,
आज जरी मी एकली जाते
आणीन संगे युवराजाला,
माझ्या युवराजाला ॥४॥
ओटी भरा गं ओटी भरा, माझी ओटी भरा

इथे 'मला' ऐवजी 'हिला' असा शब्दप्रयोग करून इतर मैत्रिणी हे गाणं गातात. अनेक प्रख्यात गायिकांनीही हे गीत गायलं आहे. लोकसाहित्यातील ओवी आणि भावगीत प्रकारातली ही डोहाळ्यांची गाणी म्हणजे आपलं अभिजात मराठी काव्याचं अलौकिक वैभव!

# वीरांगना अजिजन बाई



**शुभांगी गान/ ८६५७४२४०७१**

१८५७ चा स्वातंत्र्यसंग्राम हा इतिहासाच्या पानावरचा एक धगधगता कालखंड! या कालखंडात किती जणांनी देशासाठी प्राणार्पण केले, त्याची मोजदात नाही. प्रत्येक स्त्री-पुरुष भारतमातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून सोडवण्यासाठी कटिबद्ध झाला होता. असाच इतिहास अजिजन बाईसारख्या व्यवसायाने नर्तकी असणाऱ्या स्त्रीने घडवलाय. स्वातंत्र्ययुद्धात असणारा तिचा सहभागही अत्यंत महत्त्वपूर्ण आणि आम्हा सर्वांना अभिमानास्पद असाच होता. कोण होत्या अजिजन बाई?

व्यवसायाने नर्तकी आणि इंग्रजांसोबतच भारतीयांची करमणूक करणारी आणि हे करत असतानाच आपल्या देशासाठी गुप्तहेरगिरीचे काम करत आयुष्य देश प्रेमासाठी वाहून घेतलेली एक असाधारण सौंदर्य लाभलेली नर्तकी! सैनिकांना आपल्या प्रेमळ वागणुकीने सेवा सुश्रुषा करून आणि क्रांतीसाठी आपण करीत असलेल्या व्यवसायातून मिळालेला पैसा दान करून, एक प्रेरणादायी जीवन जगणारी अजिजन बाई असामान्य होती, हे निश्चित! २२ जानेवारी १८२४ ला राजगढ मालवा(मध्य प्रदेश)येथे जमीनदार असलेल्या शमशेर सिंहाच्या घरात हिचा जन्म झाला. शमशेर सिंहाची ही लाडकी लेक नाव होतं अंजुला! पण, मनुष्याची नियती माणसाला कुठून कुठे नेते. आपल्या घरात प्रेमात वाढत असलेली अंजुला मैत्रिणीसोबत एका मेळाव्यात गेली आणि इथूनच तिच्या आयुष्याच्या शोकांतिकेला सुरुवात झाली. तिचं सौंदर्यच कदाचित यासाठी कारणीभूत ठरलं. इंग्रजांच्या टोळीने तिला आणि तिच्या मैत्रिणीला पळवून नेलं. नदीच्या पुलावरून मार्गक्रमण करताना मैत्रिणीसोबत तिने नदीत उडी घेतली. पण, मृत्यूसोबत तिचं दुर्दैव संपणार नव्हतं. एका व्यक्तीने तिला वाचवलं आणि कानपूरला आणून एका कोठ्यात विकलं. अंजुलाची अजिजन बाई झाली. पुढे तिला तवायफ बनण्याचं प्रशिक्षण देण्यात आलं. काहीच काळात ती तिच्या सौंदर्यासाठी आणि नृत्यासाठी पंचक्रोशीत प्रसिद्ध झाली.

हा काळ होता १८५७ च्या संग्रामाचा! देशप्रेम आणि देशासाठी काहीतरी करायला हवं या भावनेने ती देशासाठी काहीही करायला तत्पर झाली होती आणि याच काळात तात्या टोपेंच्या संपर्कात आली. इथून सुरू झाला तिचा गुप्तहेर म्हणून प्रवास!

अजिजन बाईकडे अनेक इंग्रज ऑफिसर तिचं नृत्य बघायला येत. ही बातमी तात्या टोपेंना होती. त्यामुळे हेच ठिकाण इंग्रजांवर नजर ठेवण्यासाठी योग्य आहे, हे त्यांना ज्ञात होतं. ही संधी साधून एक दिवस तात्या टोपेंनी इंग्रजांवर हमला केला आणि संख्येने कमी असलेल्या इंग्रजांनी अजिजन बाईंना समोर करून तिथून पलायन केलं. तात्या टोपेंनी तिला बिठूरला येण्याचं आमंत्रण दिलं. होलिका दहनच्या दिवशी तिने तिथे नृत्यही सादर केलं. तिच्या या नृत्यावर प्रसन्न होऊन तात्यांनी तिला इनाम म्हणून पैशाची बिदागी पेश केली. पण, तिने याला नकार दिला आणि म्हणाली,'पुरस्कार द्यायचाच असेल तर मला सैनिकी पोशाख द्या. बाकी मला काहीही नको.' तात्या प्रसन्न झाले आणि त्यांनी तिला आपला गुप्तहेर म्हणून नियुक्त केलं. या संधीचं तिनेही सोनं केलं. अनेक इंग्रजांना तिने आपल्या नृत्यासाठी आमंत्रित केलं आणि दबा धरून बसलेल्या क्रांतीकारांनी त्यांच्यावर हमला करून त्यांना यमसदनाला पाठवलं.

आता तात्या टोपे आणि नानासाहेब पेशवा यांच्या प्रेरणेने तिने ४०० महिलांची एक सैनिकी तुकडी बनवली आणि तिला मस्तानी टोळी हे नाव दिलं. अजिजनला एक काम दिलं गेलं. आपलं सौंदर्य आणि नृत्य यांनी इंग्रज सैन्यात असणाऱ्या भारतीय सैनिकांना आपल्याकडे वळवून त्यांना नानासाहेब पेशव्यांच्या सैन्यात परत आणणे, युद्धात जखमी सैन्याची सेवा करणे आणि जे युद्धातून भयभीत होऊन जे परतले त्यांचं मनोबल वाढवणे. इंग्रजी सेनेतल्या गुप्त बातम्या पुरवणं, भारतीयांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण करणं, अजिजननं हे आवाहन सहर्ष स्वीकारलं. तिच्या या तेजस्वी रूपाने नानासाहेब, तात्या टोपे, अजीमुल्ला खां, टीकासिंह प्रभावी झाले.

नानासाहेबांचा आशिर्वाद आणि नवाब शमशुद्दीन यांच्या मदतीने बनवलेल्या मस्तानी टोळीला तिने तलवारबाजी, पोहणे आणि अनेक शस्त्रं चालवण्यात व युद्धनीतीत तरबेज केलं. या टोळीने अनेक कारनामे केले. अनेक इंग्रजी सैनिकांना मृत्यूचा मार्ग दाखवला. ती वारांगना नसून 'वीरांगना' आहे हे तिनं खऱ्या अर्थानं सिद्ध केलं. या सर्व क्रांतिकारकांच्या सहाय्याने नानासाहेबांनी इंग्रजांना कानपूरमधून पलायन करण्यास भाग पाडलं आणि स्वतंत्र राजा घोषित केलं. पण, पुढे केवळ दोन महिन्यांत इंग्रजांनी प्रचंड सैन्यासहित परत एकदा आक्रमण केलं आणि नानासाहेब पेशव्यांचा पराभव केला. या पराभवानंतर नानासाहेब आणि तात्या टोपे पलायन करण्यात यशस्वी झाले. परंतु, अजीजन बाईला पकडण्यात इंग्रज यशस्वी झाले. जनरल हैवलाक तिच्यावर फिदा झाला आणि म्हणाला,'जर तू आपली चूक कबूल करून क्षमायाचना कराल व टोपेंचा ठावठिकाणा सांगाल तर तुला माफ करू.' अजिजन बाईंनी त्याचा हा प्रस्ताव उडवून लावला आणि त्याला जबरदस्त उत्तर दिलं. त्या म्हणाल्यह,'माफी तर इंग्रजांनी मागायला हवी. त्यांनी आमच्यावर इतके अत्याचार केले. आमच्याच देशात आम्हाला गुलाम केलंय.' त्यांच्या या सणसणीत आणि स्पष्ट उत्तराने चिडलेल्या हॅवलॉकने अजिजन बाईंना गोळी घालण्याचे आदेश सैनिकांना दिले. पण, त्या रात्री तो परत एकदा बाईंना भेटला. धनदौलत देण्याचं प्रलोभन दाखवलं. पण त्या ठाम होत्या. त्यांचं म्हणणं एकच,'हे आम्हाला नको. देणारच असाल तर आमचा देश आम्हाला परत द्या. आम्हाला स्वतंत्र करा.' हॅवलॉक संतापला आणि त्याने बंदुकीच्या अनेक गोळ्या तिच्यावर झाडून तिच्या देखण्या देहाची चाळणी केली. एका क्रांतिकारी विरांगनेचा दुःखद अंत झाला. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी तिच्याविषयी गौरवोद्गार काढले की,'अजिजन बाई एक नर्तकी परंतु शिपायांविषयी तिला अतोनात प्रेम होतं. तिचं प्रेम फक्त धन मिळविण्यासाठी विकलं जात नव्हतं तर तिचं प्रेम अशा व्यक्तीला मिळायचं ज्याचं देशावर अपार प्रेम असे. तिच्या मुखावरच सुंदर हास्य युद्धातील शिपायांना प्रेरणा देत असे.'

## रानभाज्यांच्या जगात

**संगीता ठलाल/७८२१८१६४८५**

# गुणकारी रिंगणी



उघड्यावर मिळणारे खाद्यपदार्थ खाताना माणूस स्वतःच्या आरोग्याचासुद्धा विचार करत नाही. आधी आपले आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी व निरोगी आयुष्य जगण्यासाठी खाद्यपदार्थसुद्धा तसेच पोषक खायचे ज्यातून त्यांच्या शरीराला पोषण मिळत असे. म्हणून ते आहारात रानभाज्या, गावरान भाज्या, कंदमुळं, रानफुलं, पोषक कडधान्य आवर्जून खात. माठातील किंवा दुद्यातील पाणी पीत. त्यामुळे ते दीर्घायुष्य जगत. आजकाल खाद्यपदार्थ तर उघड्यावरचे खातातच आणि सोबतच पाणीसुद्धा बंद बाटलीतलं, फ्रिज मधील पितात. अनेकांना सर्दी, खोकला वारंवार होतो आणि ते आजाराने ग्रस्त असतात. निसर्गाच्या सान्निध्यात वाढणारी, कोणत्याही कीटकनाशकांची फवारणी नसलेली पोषक भाजी म्हणजे झाडीबोलीत रिंगणी या नावाने ओळखली जाणारी भाजी! तिला काटेरी रिंगणीसुद्धा म्हणतात. रिंगणीला जांभळी आणि पांढऱ्या रंगांची फुलं येतात. आकर्षक रंगांची ही फुलं अगदी मोहक दिसतात. या वनस्पतीच्या पानांवर व देठावर काटे असतात. एवढेच नाहीतर या वनस्पतीला फळंसुद्धा येतात. गावराणी वांग्यांसारखी लहान फळं येतात. गावखेड्यातील लहान मुलं खेळभांडी खेळताना, या रिंगणीच्या फळांची खोटीखोटी भाजी बनवतात. रिंगणीची ही वनस्पती जमिनीवरच पसरलेली दिसते. या वनस्पतीच्या फुलांपासून खोकला कायमचा बरा होतो आणि लहानथोरांच्या आरोग्यालासुद्धा फायदेशीर ठरते.

भलेही हे फुलं दोन रंगाचे असतील तरी त्यापासून फायदा सारखाच असतो. ही वनस्पती गरम असते. आधी त्या फुलांना तोडून, पाण्याने स्वच्छ धुवून घ्यायचं. तव्यावर ही फुलं भाजून घेतल्यावर त्यांना हातानेच बारीक करून मधात एकजीव करून खोकला झालेल्यांना चाटण दिलं की, खोकला कायमचा बरा होतो. या औषधाने कोरडा खोकलासुद्धा बरा होतो. जुनी माणसं अशा वनस्पतींचे महत्व जाणून होते म्हणून ते अशा दुर्मिळ वनस्पती उपटून फेकत नव्हते तर तिचे जतन करत. अशी ही बहुगुणी रिंगणी निसर्गाची देणगी आहे. गावखेड्यातील जाणकार माणसं सांगतात की, ऋतूमानानुसार रानभाज्या खाव्यात आणि आपले आरोग्य सुदृढ ठेवावे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



नांदेड- तहसील प्रशासनाने पुन्हा एकदा अवैध वाळू उत्खनन करणाऱ्यांवर मोठी कारवाई करत केली आहे. यामध्ये ४ इंजिन जिलेटीनने स्फोट करून नष्ट केली. तसेच २० तराफे जाळून नष्ट केले. या कारवाईत सुमारे २४ लाख रुपयांचा मुद्देमाल जागेवरच नष्ट करण्यात आला.

ही कारवाई जिल्हाधिकारी राहुल कर्डीले आणि उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार संजय वारकड यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. कारवाईदरम्यान नायब तहसीलदार संजय नागमवाड, सुनील माचेवाड, मंडळ अधिकारी मोहसीन सय्यद, कुणाल जगताप, अनिरुद्ध जोंधळे, ग्राम महसूल अधिकारी मनोज जाधव तसेच महसूल कर्मचारी बरोडा, श्रीरामे, जमदाडे, मनोज सरपे, महेश जोशी, गिरी, मुंगल, सकवान महसूल सेवक बालाजी सोनटक्के आदी पथकातील अधिकारी उपस्थित होते.

वाहेगाव परिसरात पहाटे ५ वाजता अवैध रेती उत्खनन प्रतिबंधासाठी गस्तीवर असलेले महसूल पथकसला अवैध वाळू उत्खनन करणारे ४ इंजिन आढळून आले. पथकाने मजुरांच्या साहाय्याने ही इंजिन जिलेटीनने उडवून नष्ट केले. त्याचबरोबर वाळू वाहतुकीसाठी वापरले जाणारे २० तराफे जाळण्यात आले. असे एकूण २४ लाख किंमतीचा मुद्देमाल जागेवर नष्ट करण्यात आला.

बेकायदेशीर वाळू उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्यांवर यापुढे अधिक कठोर कारवाई करण्यात येणार असून, संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबरोबरच आवश्यक असल्यास एमपीडीए अंतर्गत कारवाई केली जाईल, असा इशारा तहसीलदार संजय वारकड यांनी दिला आहे.

## विश्वशांती महायज्ञ व जगद्गुरु पट्टाभिषेक रजत सोहळा आता फेब्रुवारी महिन्यात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ नोव्हेंबर-**

उत्तराखंडमधील श्री केदारपीठाचे जगद्गुरु यांच्या पट्टाभिषेक सोहळ्यास २५ वर्ष पूर्ण झाले असून यानिमित्त विश्वशांती महायज्ञ व पट्टाभिषेक रजत महोत्सव पुढील वर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात आयोजित करण्यात आला आहे.



केदारपीठाचे जगद्गुरु श्री श्री श्री १००८ भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांची केदारपीठाचे ३२४ वे जगद्गुरु म्हणून ३ ऑक्टोबर २००० मध्ये नेमणूक झाली होती. या घटनेस २०२५ च्या ऑक्टोबर महिन्यात २५ वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त नांदेड शहरालगत असलेल्या गोपाळचावडी येथील श्री दशमुख आश्रम परिसरात विश्वशांती महायज्ञ व जगद्गुरु पट्टाभिषेक रजत सोहळा डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आयोजित करण्यात आला होता. यासाठी देशविदेशातील विविध धर्मगुरु व राजकारणासह वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रीत करण्यात आले होते. परंतु महाराष्ट्रामध्ये सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची धूम सुरु झाली असून या पार्श्वभूमीवर हा सोहळा आता डिसेंबर महिन्याऐवजी पुढील वर्षीच्या फेब्रुवारी महिन्याच्या प्रारंभी होणार आहे.

५ फेब्रुवारी २०२६ ते १२ फेब्रुवारी २०२६ या दरम्यान होणाऱ्या या सोहळ्यात विविध धार्मिक कार्यक्रमांचे भरगच्च आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शिवकथा, प्रवचन, कीर्तन, भजन यासह विविध संत महात्म्यांच्या आशीर्वचनाचा समावेश राहणार आहे, अशी माहिती संयोजन समितीच्यावतीने देण्यात आली आहे.

## बालदिनानिमित्त आज पेनूर हायस्कूलमध्ये बालकविसंमेलन

**नांदेड**-स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस म्हणजे १४ नोव्हेंबर बालदिन म्हणून देशभरात साजरा केला जातो. बालदिनाचे औचित्य साधून लोहा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या पेनूर हायस्कूलमध्ये शालेय बालकविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. आज १४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता होणाऱ्ग्ना या कविसंमेलनात येथील बालकवी पंडित पाटील बेरळीकर, ज्येष्ठ कवी गजानन हिंगमिरे, सुप्रसिद्ध कादंबरीकार अशोक कुबडे, ज्येष्ठ साहित्यिक अनुरत्न वाघमारे, समीक्षक प्रज्ञाधर ढवळे, ज्येष्ठ कवयित्री उषाताई ठाकूर, प्रथितयश लेखिका रुपाली वागरे वैद्य आदी साहित्यिक कवी कवयित्री तसेच शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थीनी सहभागी होणार आहेत. या कविसंमेलनाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन प्रशालेच्या वतीने करण्यात आले आहे.

## आदर्श ग्रामसेवक पूरस्कारासाठी भोकर पं.स.कडून प्रस्ताव सादर

**भोकर** -पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असलेले व उत्कृष्ट काम केलेले ग्राम पंचायत अधिकारी बालाजी इंगळे सह सात ग्रामसेवकांचे प्रस्ताव आदर्श ग्रामसेवक पूरस्कारासाठी गटविकास अधिकारी यांचे मार्फत उप मूख्यकार्यकारी अधिकारी (पं) जि.प.नांदेड यांचेकडे पाठविण्यात आले. जिल्हा परिषदेच्या वतीने देण्यात येणारा आदर्श पूरस्कारासाठी सन २०१८-१९ माधव मूसळे सन २०१९-२० बालाजी कनोजवार सन २०२०-२१ बालाजी इंगळे सन २०२१-२२ ज्ञानेश्वर कल्याणे सन २०२२-२३ माधवी जाधव सन २०२३-२४ शैलेश काळे सन २०२४-२५ वर्षा डोईवाडे आदींचे प्रस्ताव जि.प.नांदेड येथे पाठविण्यात आले असून लवकरच त्यांना एका विशेष कार्यक्रमात आदर्श ग्रामसेवक पूरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे.

## प्रविणकुमार पोहरे लिंबगावमधून लढणार

**नांदेड** -नांदेड तालुक्यातील लिंबगाव जिल्हा परिषद गट हा मागासवर्गीय प्रवर्गासाठी राखीव असून, या गटातून प्रविणकुमार उर्फ बंटी मधुकरराव पोहरे यांनी निवडणुकीत उमेदवारी दाखल करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. सर्वसामान्यांचे नेतृत्व करणारे, समाजहिताचा विचार करणारे, आणि युवकांमध्ये लोकप्रिय असलेले प्रविणकुमार पोहरे हे या भागातील ओळख निर्माण केलेले तरुण नेते आहेत. उच्चशिक्षित, मनमिळावू आणि कार्यतत्पर स्वभावामुळे त्यांच्याकडे नागरिकांचा मोठा पाठिंबा आहे. सामाजिक कार्यातून आणि सार्वजनिक जीवनातून त्यांनी या भागात विश्वासार्ह नेतृत्व उभे केले आहे. नागरिक, तरुण वर्ग तसेच ज्येष्ठ मंडळींचा पाठिंबा मिळाल्याने पोहरे यांनी निवडणुकीत उतरायचा निर्णय घेतला असून, समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन विकासाचा मार्ग निवडणे हेच आपले उद्दिष्ट आहे, असे त्यांनी सांगितले. या घोषणेनंतर लिंबगाव परिसरात आणि तालुक्यातील नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड** -नांदेड जिल्ह्यात १३ नोव्हेंबरच्या सकाळी ६ वाजेपासून ते २७ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १३ नोव्हेंबरच्या सकाळी ६ वाजेपासून ते २७ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही. अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच

## राजर्षी शाहू विद्यालयाच्या समृद्धीने केली सुवर्ण पदकाची कमाई

**नांदेड** -उत्तर प्रदेशातील गाजियाबाद येथे संपन्न झालेल्या ४४ व्या राष्ट्रीय शुटींग बॉल चॅम्पियनशीप २०२५ स्पर्धा ७ ते ९ नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्याच्या संघाने हरियाणा, पश्चिम बंगाल, कर्नाटक, उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश, त्रिपुरा आणि राजस्थान या राज्यातील संघाला एका पाठोपाठ हरवत महाराष्ट्र राज्याच्या संघाने प्रथम क्रमांक प्राप्त करून सुवर्ण पदकाची कमाई करत रोख ३१ हजार व ट्रॉफीवर आपल्या नावाचा शिक्का उमटवला. महाराष्ट्र राज्याच्या संघामध्ये राजर्षी शाहू विद्यालय, वसंतनगर, नांदेड येथील इयत्ता दहावी मधील विद्यार्थिनी समृद्धी विलासराव पवार हिने स्पर्धा दरम्यान आपल्या खेळातील सर्व्हीस आणि सेंटरप्लेसच्या बळावर राजर्षी शाहू विद्यालयाचेच नव्हेतर महाराष्ट्र राज्याचे, परिणामी देशाच्या शिरपेचात यशाचा व गौरवाचा तुरा खोवला. समृद्धी पवारच्या गगनभरारी यशाचा स्वागत कौतुक सोहळा राजर्षी शाहू विद्यालयाच्या एक हजार विद्यार्थ्यां समक्ष रांगोळी, फुलांची आरास, ढोल, एनसीसी पथकाच्या संचलनात थाटामाटात करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष तिवडे, उपमुख्याध्यापक निर्मला खुळे, मराठवाडा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गोपाळराव कदम, सचिव चंद्रशेखर सोनवणे, कोषाध्यक्ष नरसिंगराव पावडे, सहसचिव माधवराव देशमुख आदी उपस्थित होते.

## जिल्हाधिकाऱ्यांनी लोहा तालुक्यातील मतदान केंद्रांची केली पाहणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नुकतीच लोहा तालुक्यातील विविध मतदान केंद्रांची भेट देवून पाहणी केली. यावेळी त्यांनी केंद्रांवरील मूलभूत सुविधा, प्रकाश व्यवस्था, पिण्याचे पाणी, अपंग मतदारांसाठी रॅम्प आदी सुविधांची पाहणी केली.

लोहा येथील श्री. संत गाडगे महाराज प्राथमिक विद्यालय, टिंगरी गल्ली येथील मतदान केंद्र व इंदिरानगर येथील श्री संत गाडगे महाराज प्राथमिक विद्यालय येथे असलेल्या ५/१ मतदान केंद्र व कै. विश्वनाथ नळगे माध्यमिक महाविद्यालय जुनी इंदिरानगर येथील खोली क्रमांक २ व ३ येथील मतदान केंद्रास भेट देवून पाहणी केली. यावेळी मतदान केंद्रावर मतदारांना लागणाऱ्या सर्व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात, अशा सूचना त्यांनी केल्या.

मतमोजणी कक्षातील पाहणी करुन निवडणूकीच्या अनुषंगाने मतदान यंत्राच्या एफएलसी प्रक्रीयेची पाहणी करुन निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांना दक्ष व पारदर्शक राहून योग्य ती कार्यवाही करण्यासंदर्भात सूचना जिल्हाधिकारी श्री. कर्डीले यांनी दिल्या. मतदान केंद्रांवरील सर्व तयारी वेळेत पूर्ण करावी, मतदारांना कोणतीही गैरसोय होऊ नये याची विशेष दक्षता घ्यावी, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी त्यांच्यासोबत अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव व लोहा तहसिलदार श्री. परळीकर, निवडणूक शाखेचे अधिकारी, पोलिस अधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी लोहा नांदेड रोडवरील एसएसटी पथकास भेट देऊन पाहणी केली. निवडणूक काळात अनधिकृत वाहतूक, रोख रक्कम, दारू, भेटवस्तू आदींची देवाणघेवाण रोखण्यासाठी सतत गस्त आणि तपासणी सुरू ठेवण्याचे निर्देश त्यांनी पोलिस आणि प्रशासनाच्या संयुक्त पथकांना दिले.

## कल्पना नरवाडे यांचे निधन



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १३ नोव्हेंबर-**

मुदखेड येथील माजी नगरसेवीका कमलबाई भगवानराव कांबळे यांची मुलगी का.कल्पना भगवानराव कांबळे (एस.टी. महामंडळ कर्मचारी) यांचा वयाच्या ४७ व्या वर्षी दि.१२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७:०० वाजताच्या सुमारास हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांचा अंत्यविधी दि.१३ नोव्हेंबर रोजी दुपारी २:०० वाजता भिमनगर मुदखेड येथील बौध्द स्मशान भुमि येथे करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगी व हर्षवर्धन कांबळे, विलास कांबळे, इंडियन नेव्ही राहुलकुमार कांबळे, मनोजकुमार कांबळे, यांच्या त्या बहीण होत.

## वसतिगृहातील विद्यार्थिनींसाठी परीक्षेचा ताण-तणाव विषयक डॉ. पुष्पा गायकवाड यांचे मार्गदर्शन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १३ नोव्हेंबर-**

श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेत विष्णुपुरी नांदेड येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनी विद्यार्थी परीक्षेच्या काळात ताण तणावाखाली असतात या बाबींचा विचार करून संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांचे मार्गदर्शना खाली मानसोपचारतज्ज्ञ डॉ. पुष्पा गायकवाड यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले.



श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी नांदेड येथील देवगिरी, नंदगिरी आणि गोदावरी वसतिगृहातील निवासी विद्यार्थ्यांना संचालक डॉ. मनेश कोकरे त्यांच्या मार्गदर्शनाखाली रेक्टर डॉ. सावरकर सर व वसतीगृह वार्डन यांनी वसतिगृहातील निवासी विद्यार्थिनींसाठी ८ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता कृष्णा मेस रिक्रिएशन हॉलमध्ये एक दिवसीय, मार्गदर्शन वर्ग,चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या मार्गदर्शन वर्गात,चर्चासत्रात दोन महत्त्वाच्या विषयांवर विद्यार्थीनीना मार्गदर्शन करण्यात आले, ज्यात परीक्षेचा ताण व्यवस्थापन आणि वसतिगृह स्वच्छता या विषयांचा समावेश होता. यावेळी

मानसोपचारतज्ज्ञ डॉ. पुष्पा गायकवाड यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थीनीना परीक्षेच्या तणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि परीक्षेच्या काळात सकारात्मक मानसिक दृष्टिकोन राखण्यासाठी प्रभावी तंत्रांवर मार्गदर्शन केले. त्यांनी चांगल्या आरोग्यासाठी आणि राहणीमानासाठी वसतिगृह परिसरात स्वच्छता आणि स्वच्छतेचे महत्त्व देखील पटवून दिले. या चर्चासत्रास संचालक डॉ. मनेश कोकरे यांचे मार्गदर्शनाखाली रेक्टर डॉ.सावरकर, डॉ. प्रणिता बालवे व डॉ.पौर्णिमा तळेले उपस्थित राहून डॉ.पुष्पा गायकवाड यांचे आभार मानून परीसंवादाचा समारोप केला . सदरील चर्चासत्र यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी वसतिगृहाचे रेक्टर डॉ.सावरकर सर यांचेसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी प्रतिनिधी यांनी परिश्रम घेतले

## ड्रेनेज लाईनचे अर्धवट राहिलेले काम पूर्ण करण्यासाठी पैशांची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ नोव्हेंबर-**

ड्रेनेज लाईनचे अर्धवट राहिलेले काम पूर्ण करण्यासाठी महापालिकेतील कनिष्ठ अभियंता पैश्याची मागणी करत असून, त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी वसरणी येथील नागरिकांनी एका निवेदनाव्दारे राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

शहरातील वसरणी परिसरातील गट क्र.२९/२ व २७/२ यापैकी २७/२ मध्ये शारदा कंन्स्ट्रक्शन कंपनीने ज्या ठिकाणी ड्रेनेज लाईन पाण्याचा विसर्ग नैसर्गिकरित्याा होतो त्याठिकाणी न टाकता विरुध्द दिशेला टाकून उर्वरित काम सोडून दिले आहे. संबंधित गुत्तेदाराच्या संगनमताने महापालिकेतील कनिष्ठ अभियंता रविंद्र सरपाते यांनी हे काम केले आहे. याबाबत त्यांना विचारले असता ते अरेरावीची भाषा वापरत असून, पैश्याची मागणी करीत आहेत. याप्रकरणी ड्रेनेज लाईन टाकण्याबाबत उपोषणाचा इशारा दिल्यानंतर प्रशासनाने लेखी पत्राव्दारे भूसंपादनाची प्रक्रिया सुरु असून, भूसंपादन झाल्यानंतर अर्धवट ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण करुन देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु त्यानंतरही हे काम करण्यात आले नाही. दि.२८ ऑक्टोबर रोजी कनिष्ठ अभियंता रविंद्र सरपाते यांना विचारले असता त्यांनी अरेरावीची भाषा करत गट क्र.२९/२ च्या मुळ मालकांशी हातमिळवणी करुन आमच्याकडून तीन लाख रुपयांची मागणी केल्याचे निवेदनात नमुद केले आहे. हे निवेदन राज्याच्या मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले असून, या निवेदनावर शोभाबाई खंगळे, अंकिता जोंधळे, माधुरी निर्मले, सयाबाई वाघमारे, भाग्यश्री तारु, कमलबाई तारु, शितल खरे, उमेश जोंधळे, कावेरी मोहरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मुदखेड नगराध्यक्ष पदासाठी सोफिया अंजूम जागीरदार मैदानात

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १३ नोव्हेंबर-**

मुदखेड येथील नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पद सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित असल्यामुळे माजी नगराध्यक्ष मुजिब अन्सारी यांची सुकन्या सोफिया अंजूम मुजीब जागीरदार हे मैदानात उतरत असून दि.१७ नोव्हेंबर रोजी अपक्ष उमेदवारी दाखल करणार असल्याची माहिती जागीरदार यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली .



ते बोलताना पुढे म्हणाले की, मी नगराध्यक्ष असताना मुदखेड शहरातील केलेले विकास कामे जाहीरनाम्याप्रमाणे ९०% पूर्ण केलेली आहेत. मला जनतेने नगराध्यक्ष म्हणून निवडून दिलं होतं परंतु ठराव घेऊन कामे करण्याकरिता मला अनेक अडथळे आले. त्यामुळे काही कामे अपुरी राहिली असतील ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करीन. माझ्या कार्यकाळात नगर परिषदेचा आर्थिक सहायता करण्याचा प्रयत्न केला. पाच वर्षात कसलाही कर वाढवलेला नाही, भुयारी मार्गाचा प्रश्न निकाली काढला, मोंढा येथील फॉरेस्ट ऑफिसची जागा नगरपरिषदेने घेऊन त्या ठिकाणी युनानी दवाखान्याची जागा हस्तांतर केली, कॉम्प्लेक्स बांधण्यासाठी प्रयत्न केला,पोलीस स्टेशनसाठी जागा उपलब्ध करून देऊन त्या ठिकाणी पोलीस स्टेशन केले.शहरात अत्याधुनिक पाणीपुरवठासाठी प्रयत्न केले,भ्रष्टाचार मुक्त प्रशासन देण्यासाठी काम केले, गोरगरीब जनतेला घरकुल देण्यात आले. या सर्व बाबींचा विचार करून जनता पुन्हा माझ्या मुलीला निवडून देतील असा विश्वास त्यांनी बोलताना व्यक्त केला आहे. नगरपरिषदची हे निवडणूक जहागीरदारामुळे चुरशीची होण्याचे स्पष्ट संकेत प्राप्त होत आहेत .

## काँग्रेसकडून प्रभाग १३ मध्ये रत्नमाला यशमवार आणि लालू कोयलावार यांच्या उमेदवारांची घोषणा

**तभा वृतसेवा**
**देगलुर, दि. १३ नोव्हेंबर-**

आगामी नगरपरिषद निवडणुकीसाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने प्रभाग क्रमांक १३ मधून सौ. रत्नमाला सुनिल यशमवार आणि लालू हुल्लाजी कोयलावार यांच्या उमेदवारीची काल (१२ नोव्हेंबर) रोजी रात्री अधिकृत करण्यात आली. ही घोषणा माजी नगराध्यक्ष तथा काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार यांनी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत केली.

देगलूर नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी भारतीय काँग्रेस पक्षाकडून प्रभाग क्रमांक १३ मधील ओमनगर येथील अष्टविनायक मंदिरात उमेदवारांची घोषणा करण्यात आली. यांप्रसंगी नगराध्यक्षपदासाठी सौ. मनोरमा मष्णाजी निलमवार यांच्या उमेदवारीची अधिकृत घोषणा प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते करण्यात आली. काँग्रेस पक्षाच्या या उमेदवारी घोषणेमुळे पक्ष कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.





कार्यक्रमात मार्गदर्शन करताना रामदास पाटील सुमठाणकर, अविनाश निलमवार आणि मोगलाजी शिरशेटवार यांनी काँग्रेस पक्षाच्या विकासनिष्ठ धोरणांचा उल्लेख करत नागरिकांना एकजुटीने काँग्रेस उमेदवारांना विजय मिळवून देण्याचे आवाहन केले. तर रामदास पाटील सुमठाणकर म्हणाले की, आगामी निवडणुकीत काँग्रेस पक्षाला एकहाती विजय मिळवून द्यावे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी तुळशीराम संगमवार, लक्ष्मण कंधारकर, रामलू कोटलवार सर, गोपाळ दौंतुलवार, रत्नपारखे सर, देशमुख सर, कंधारे सर, विजय मट्टमवार, शंकरराव आऊलवार, कैलास येसगे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या उमेदवारी घोषणेमुळे प्रभाग क्रमांक १३ मधील निवडणूक रंगतदार होण्याची चिन्हे दिसत आहेत. काँग्रेस पक्षाच्या या नव्या जोडीकडून जनतेच्या अपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत.

## आ. प्रताप पाटील चिखलीकर यांची राष्ट्रवादीचे स्टार प्रचारक म्हणून निवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ नोव्हेंबर-**

राज्यात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे स्टार प्रचारक म्हणून लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या स्वाक्षरीनिधी राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्टार प्रचारकांची यादी राज्य निवडणूक आयुक्तांना देण्यात आली त्या यादीत आ. चिखलीकर यांचाही समावेश आहे. केवळ नांदेड जिल्ह्यातील नव्हे तर महाराष्ट्राच्या राजकारणातील एक जॉईंट किलर म्हणून ज्यांची ओळख निर्माण झालेली आहे ते नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार तथा लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर नेहमीच चर्चेत राहिले आहेत. सर्वसामान्यांच्या हितासाठी आणि लोक कल्याणासाठी सदैव तत्पर असणारे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आपल्या खांद्यावर आपल्या पक्षाने जी जबाबदारी सोपवली आहे ती जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत पक्षाला बळकटी मिळवून देण्याचे काम केले आहे.



विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर लोहा कंधार विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचा विजय झेंडा त्यांनी फडकवला. त्यानंतर नांदेड जिल्ह्यातील कानाकोपऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेस मजबूत करण्याचा त्यांचा सपाटा सुरूच आहे. अनेक माजी आमदारांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये खेचून आणल्यानंतर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष , जिल्हा परिषदेचे अनेक माजी सदस्य, पंचायत समितीचे माजी सभापती , माजी सदस्य , असंख्य ग्रामपंचायतचे सरपंच , ग्रामपंचायत सदस्य, माजी नगरसेवक यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश देत पक्षाला बळकटी देण्याचे काम त्यांनी केले आहे आणि हे काम अव्याहतपणे सुरू आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये त्यांचे योगदान , संघटना बांधणीतील त्यांची स्पष्ट भूमिका यामुळे मा.ना.अजितदादा पवार, मा. प्रफुलभाई पटेल, मा. खा. सुनीलजी तटकरे यांच्या स्टार प्रचारकांमध्ये आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे आता मन्याड खोऱ्याची ही डरकाळी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात गुंजणार आहे.स्टार प्रचारक म्हणून आपली निवड केल्याबद्दल आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, कार्याध्यक्ष प्रफुलभाई पटेल, राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांचे आभार मानले आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### महानगरपालिकेच्या शालेय कराटे स्पर्धा उत्साहात : १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींचा उत्स्फूर्त सहभाग

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका अंतर्गत आयोजित शालेय क्रीडा स्पर्धा २०२५ अंतर्गत मुले व मुलींच्या कराटे स्पर्धा आज गुरुवार १३ नोव्हेंबर रोजी येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या मैदानात मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धांमध्ये १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रभाकर प्रकाश पंडित उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी मनपा क्रीडा अधिकारी राजकुमार जाधव होते. यावेळी उमेश गाडेकर, बाळू मुदगलकर, बालाजी मानोलीकर, अलीम शेख, सोमनाथ झाकणे आदी मान्यवर उपस्थित होते.

१४ वर्षे वयोगटातील मुलांच्या स्पर्धेत २५ किलो वजन गटात नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी शाळेच्या अथर्व गोरख घांडगे यांनी प्रथम क्रमांक मिळवला. ३० किलो वजन गटात ओयासिस इंग्लिश स्कूलच्या आजय नारायण थिटे प्रथम, तर त्याच शाळेचे सर्वज्ञ प्रताप देसाई द्वितीय आला. ३५ किलो वजन गटात नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी शाळेच्या ऋषिकेश रामचंद्र जोगदंडने प्रथम, तर बाल विद्या मंदिर वैभवनगरच्या अथर्व भुसारेने द्वितीय क्रमांक पटकावला. ४० किलो वजन गटात नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी शाळेच्या हर्षद माणिक आव्हाड, ४५ किलो वजन गटात त्याच शाळेचे वेंकटेश कृष्णाजी जाधव, तर ५० किलो वजन गटात छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालयाचे आरव नांगनाथ पौळ यांनी प्रथम क्रमांक पटकावला. १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या गटात ४२ किलो वजन गटात छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालयाची अपेक्षा नागनाथ पौळ, ४६ किलो वजन गटात बाल विद्या मंदिर नानालपेठची आरुषी साहेबराव गायकवाड, तर ५० किलो वजन गटात त्याच शाळेची स्वरा सतीश मोरे यांनी प्रथम क्रमांक मिळवला.

### पाथरी नगरपालिकेत नगराध्यक्षपदासाठी १ व सदस्य पदाकरीता ४ उमेदवारी अर्ज दाखल

**पाथरी,/प्रतिनिधी :** पाथरी येथील नगरपालिका निवडणूकीकरीता आज गुरुवारी तीसऱ्या दिवसापर्यंत एकूण नगराध्यक्षपदासाठी १ व सदस्य पदाकरीता ४ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहे.

१० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु झाली. त्या दिवशी एकाही उमेदवाने अर्ज दाखल केला नाही. ११ नोव्हेंबर रोजी प्रभाग क्रमांक १० अ मधून राजेश मंगल पाटील, प्रभाग क्रमांक १२ मधून शेख खदीर शेख खाजा यांनी नगराध्यक्षपदासाठी तर दुर्राणी अब्दुल हन्नान खान अब्दुल मजीद खान यांनी प्रभाग ९ मधून सदस्य पदाकरीता उमेदवारी अर्ज दाखल केला. तर गुरुवारी सौ. नंदा प्रल्हादराव भाले यांनी प्रभाग क्रमांक ११ क मधून, शेख शरीम फातेमा अब्दुल मलिक यांनी प्रभाग क्रमांक ८ ब मधून उमेदवारी अर्ज दाखल केला.

### ट्रक-दुचाकी अपघातात पतीचा मृत्यू; पत्नी जखमी

पालम तालुक्यातील पेठशिवणी येथील घटना



**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी :** पालम तालुक्यातील पेठशिवणी येथे ट्रक - दुचाकीच्या अपघातात पतीचा जागीच मृत्यू झाला तर पत्नी गंभीर जखमी झाली. ही दुर्दैवी घटना आज गुरुवार १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजेच्या सुमारास घडली.

विश्वनाथ माधवराव मुदखेडे (रा. आंबेवग, ता. अर्धापूर, जि. नांदेड) हे पत्नी विद्या विश्वनाथ मुंदखेडे यांच्यासोबत गंगाखेड तालुक्यातील मरडसगाव येथे विवाह सोहळ्यासाठी जात होते. यावेळी पेठशिवणी येथील सुतगिरणीजवळ पालमकडून लोह्याकडे भूसा घेऊन जाणाऱ्या ट्रकसोबत मुदखेडे यांच्या स्कुटीचा अपघात झाला. या अपघातात विश्वनाथ मुदखेडे यांचा जागीच मृत्यू झाला, तर पत्नी विद्या मुदखेडे गंभीर जखमी झाल्या आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर ट्रक चालक पसार झाला असून पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# कलेक्टर आणि एसपी साहेब पाथरीत चालु आहे तरी काय?; अवैध धंदे जोरात सुरू आहेत;अवैध धंद्यावर कोणाचा वरदहस्त





**विशेष प्रतिनिधी**

**पाथरी/प्रतिनिधी-** पाथरी तालुक्यामध्ये गुन्हेगारी अवैध वाळू,अवैध इत्यादी गौण खनिज चोरी,गुटखा,बिंगो नावाचा मटका,जुगार व गुंडगिरीला चालना मिळणारे अनेक अवैध धंदे पाथरी मध्ये सुरू असताना याकडे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी साहेब व पोलीस अधीक्षकांनी वेळीच लक्ष देणे गरजेचे असून पाथरी शहरामध्ये चालू असलेले अवैध धंदे यावर कायमस्वरूपी बंदी येणार का असा प्रश्न जनसामान्यातून विचारला जात आहे. शहरामध्येराहणाऱ्यामोठ्यागुटखा माफियांवर पाथरी पोलिसांकडून कधी होईल ठोस कारवाई पाथरीमध्ये अवघ्या ठाण्याच्या आवारा पासूनच हाकेच्या अंतरावर असलेल्या प्रत्येक पान टपऱ्या प्रत्येक किराणा दुकान चहाच्या हॉटेल्स इत्यादी ठिकाणी व बस स्टँड परिसर,शेलु कॉर्नर, पोखर्णी फाटा,सोनपेठ फाटा,सेलू फाटा इत्यादी ठिकाणी असलेल्या पान टपरी असतील चहाच्या हॉटेल्स असतील या ठिकाणी विविध प्रकारचे गुटके त्यामध्ये मावा असेल बाबारत्ना असेल किंवा नवीन नवीन मार्केटला वेगवेगळ्या प्रकारचा गुटखा पाथरी शहरामध्ये व ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये विक्री होत असताना पाथरी पोलीस याकडे जाणून-बुजून दुर्लक्ष करते की काय यावर मात्र प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.या सर्व प्रकाराकडे पाथरी पोलीस प्रशासनाचे तर दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे परंतु त्याचबरोबर अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने पाथरी तालुक्यामध्ये अशी ठोस कारवाई झाल्याचे अध्यापही ऐकावयास मिळत नाही.पाथरी शहरासह ग्रामीण भागामध्ये हा गुटखा पोहोचवणारे गुटखा माफिया मात्र खुलेआम ग्रामीण भाग व शहरांमध्ये गुटखा पोहोचवत असून या गुटखा माफियांवर पाथरी पोलिसांकडून कारवाई होणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पाथरी तालुक्यामध्ये अवैध वाळू उपसा व वाहतूक चालू महसूल प्रशासनाकडून मात्र कुठलीही कारवाई नाही पाथरी तालुक्यातील मौजे गुंज गोंडगाव,उमरा येथून मोठ्या प्रमाणावर रात्रीच्या वेळी ट्रॅक्टर केणीच्या साह्याने दिवस-रात्र वाळू उपसा सुरू असताना महसूल प्रशासनातील तलाठी मंडळ अधिकारी किंवा वरिष्ठ अधिकारी यांच्याकडून कुठलीही कारवाई का करण्यात येत नाही ही चर्चा जनसामान्यांमध्ये रंगू लागली आहे याकडे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी लक्ष देऊन पाथरी तालुक्यात चालू असलेला अवैध वाळू उपसा बंद करतील का अशी चर्चा आता जोर धरू लागली आहे. गुंज खुर्द येथे रात्रीच्यावेळी २०-२५ ट्रॅक्टरच्या सहाय्याने रात्री वाळू उपसा सुरु सदरील ठिकाणचा फोटो उपलब्ध नसल्याने हा फोटो काल्पनिक घेतला आहे पाथरी तालुक्यामध्ये गोदावरी नदीचे पात्र मोठे असून त्यामध्ये नाथरा ते मुदगल पर्यंत असं गोदावरीचा पात्र आहे.परंतु मागील काही काळामध्ये काही अधिकारी व पोलिसांच्या संगणमताने पाथरी तालुक्यामध्ये अवैध वाळू उपसा मोठ्या प्रमाणावर चालू आहे मधल्या काळात गोदावरी नदीला पाणी आल्याने काही काळ गोदावरी नदीमधील अवैध वाळू उपसा बंद होता परंतु मागील आठ ते दहा दिवसापासून गुंज खुर्द येथील नदीपात्रातील पाणी कमी झाल्याने गुंज खुर्द येथे रात्री बारा ते सकाळी सहा वाजेपर्यंत २० ते २५ ट्रॅक्टरने मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा केला जात आहे.यामध्ये गावचे ग्रामपंचायत सदस्य असतील किंवा इतर गाव गाडा चालवणाऱ्यांचे नातेवाईकच असल्याचे बोलले जात आहे.ग्रामपंचायत गुंजखुर्द येथील ग्रामपंचायतीवर ठोस कारवाई करण्याची गरज असून जेणेकरून या ठिकाणी चालू असलेला अवैध वाळू उपसा बंद होईल. तालुक्यातील अवैध दारू विक्री कधी होणार बंद

पाथरी तालुक्यामध्ये अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणामध्ये होत असून तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये अवैधरित्या देशी दारू असेल यांची मोठ्या प्रमाणावर विक्री होत आहे. तालुक्यातील मौजे गुंज,बाभळगाव,रामपुरी, ढालेगाव,रेणाखळी,हादगाव,व ाघाळा कासापुरी,नाथरा लोणी इत्यादी ठिकाणी मोठ्याप्रमाणावर याकडे पोलिसांबरोबरच औषध व अन्न प्रशासनाकडून देखील दुर्लक्ष केले जात आहे विकास कामाच्या नावाखाली इच्छुकांकडून अवैध गौणखणीजाची चोरी

येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक डोळ्यासमोर ठेवून भावी जिल्हा परिषद सदस्य भावी पंचायत समिती सदस्य इत्यादींकडून ग्रामीण भागामध्ये विकास कामाच्या नावाखाली कुठलीही परवानगी न घेता मोठ्या प्रमाणावर अवैध गौण खनिज(मुरुम)उत्खनन मोठ्या करून गाव शिवारातील रस्ते इच्छुकांकडून करण्यात येत असून या विकास कामाच्या माध्यमातून येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीला निवडणुकीत गावकऱ्यांकडून भरघोस मतदान मिळेल या आशेने अवैध गौण खनिजाची चोरी करून विकास कामे करण्यात येत असल्याचे सध्या पहावयास मिळत आहे. शहरामध्ये विंगो नावाच्या मटक्याने घातला धुमाकूळ ;लाखो रुपयाची उलाढालश शहरामध्ये सध्या चर्चेमध्ये असलेला विषय म्हणजे विंगो नावाचा मटका या जुगारामध्ये दहा रुपयाला शंभर रुपये असे काही मिनिटातच मिळत असल्याने या विंगो नावाच्या मटक्याकडे शहरासह ग्रामीण भागातील अनेक तरुण वळाले असून या जुगारापायी अनेक युवकांचे व नागरिकांचे आर्थिक नुकसान होत असून जो पैसा त्यांच्या संसारात वापरायचा आहे तो पैसा या विंगो नावाच्या मटक्यात घालून अनेकांचे संसार उध्वस्त होण्याच्या मार्गावर दिसून येत आहेत. या मटक्या पायी अनेक तरुण व नागरिक हे चुकीच्या मार्गाला लागली आहेत. त्यामुळे चोऱ्या आणि गुंड प्रवृत्ती सध्याच्या तरुण आणि युवक वर्गामध्ये पहावयास मिळत आहे. शहरातील वाहतुकीला कधी लागणारे शिस्त शहरांमधून जात असलेला राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण वाढले असून शहरांमध्ये चालणारे तीन चाकी ऑटो, मोटरसायकल,जड वाहने मोठ्या प्रमाणावर बेसिस्तपणे चालवताना दिसून येत आहेत. यामध्ये शहरातील सेलू कॉर्नर बस स्थानकासमोरील मुख्य रस्ता व चक्क पोलीस स्टेशन समोर असलेल्या चौकामध्ये देखील बेसावधपणे वाहन चालवणारे वाहन चालक दिसून येत आहेत यामुळे शहरांमध्ये नेहमीच छोटे-मोठे अपघात होत असतात याकडे मात्र पाथरी पोलिसांचे लक्ष असल्याचे दिसून येत आहे यावर पाथरी पोलीस काय बंदोबस्त करणार याकडे जनसामान्याचे लक्ष लागला आहे.

## शिवसेना (उबाटा गट) कडून उमेदवारी न मिळाल्याने सुरेखा शेवाळे-टाळे यांची अपक्ष नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी दाखल

**रामप्रसाद कंठाळे**




**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत जवळ येत असताना स्थानिक राजकारणात एक नवा वळण दिसून आला आहे. शिवसेना (उबाटा गट) कडून उमेदवारी निश्चित करण्यात होत असलेल्या टाळाटाळीमुळे अखेर सुरेखा शेवाळे-टाळे यांनी नगराध्यक्ष पदासाठी अपक्ष उमेदवारी दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरेखा शेवाळे-टाळे या गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेना (उबाटा गट) सोबत कार्यरत असून त्यांनी पक्षाच्या विविध कार्यक्रमांत सक्रिय सहभाग नोंदवला आहे. पक्षाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये त्यांचा चांगला संपर्क असून, महिलांमध्येही त्यांची चांगली लोकप्रियता आहे. त्यामुळे त्यांना उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र, शेवटच्या क्षणी पक्षाकडून उमेदवारीबाबत विलंब होत असल्याने त्यांनी स्वबळावर रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला.

समर्थक आणि महिला व युवा पिढी यांची साथ या तिहेरी सुत्रामुळे अपक्ष म्हणून फॉर्म भरून जनसेवा जनतेची सेवा करता येईल असे सुरेखाताईंनी मत व्यक्त केले

याबाबत बोलताना सुरेखा शेवाळे-टाळे म्हणाल्या, ''मी पक्षासाठी मनापासून काम केले आहे. मात्र उमेदवारीबाबत अन्याय झाल्याने मी जनतेच्या आशीर्वादावर अपक्ष म्हणून लढण्याचा निर्णय घेतला आहे. माझी उमेदवारी ही जनतेच्या विश्वासाची आहे, पक्षाच्या तिकिटाची नव्हे.'' या घटनाक्रमामुळे शिवसेना (उबाटा गट) च्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे वातावरण असून, नगराध्यक्ष पदासाठीच्या स्पर्धेत आता नव्या समीकरणांची निर्मिती होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## प्रेमला संतोष एकलारे यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**पूर्णा,/प्रतिनिधी-** पूर्णा नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूक साठी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून महाविकास आघाडीच्या वतीने प्रेमला संतोष एकलारे यांची उमेदवारी खासदार संजय जाधव यांनी जाहीर केली आहे. बुधवारी पूर्णा येथील राम मंदिरात खासदार संजय जाधव यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली होती.या बैठकीत महाविकास आघाडीच्या वतीने नगरपालिकाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार म्हणून प्रेमला संतोष एकलारे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली. या बैठकीला माजी आमदार डॉ. मधुसूदन केंद्रे,संतोष एकलारे,साहेब कदम,राजू एकलारे,मुंजाजी कदम,महबूब कुरेशी, हिराजी भोसले, श्याम कदम, गोविंद कदम,मनोज काकानी,साहेब कदम, बाळू शिरगोळे आदी उपस्थित होते.


## राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे बुजवून उपकारच केले ?

### महामार्ग ५४८ (ब) चे थातूरमातूर बुजवलेले खड्डे जैसे थे धामोनी फाटा ते सोनपेठ रस्त्यावरील प्रकार: दोन महिन्यात दुसऱ्यांदा खड्डे बुजविण्याचा प्रयत्न सुरू, अपघातांच्या संख्येतही वाढ

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** तालुक्यातील हद्दीतून जाणारा ५४८ब हा महामार्ग धामोनी फाटा ते पाथरी पर्यंत पुर्णतः उखडून गेला आहे.या महामार्गावर सर्वत्र मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत.यावेळी या कामाचे टेंडर होऊन सध्या हे काम आर.बी.घोडके इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी ला सुटल्याचे कळते. या कंपनी कडून गेल्या दोन महिन्यांपूर्वी धामोनी फाटा ते सोनपेठ पर्यंत च्या हद्दीत खड्डे बुजवण्यात आले होते. परंतु काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्यामुळे सदरचे खड्डे पंधरा दिवसात उकरून जैसे ते परिस्थिती निर्माण झाली होती त्यानंतर पुन्हा एकदा याच मार्गावरील खड्डे बुजविण्याचे काम संबंधित गुत्तेदाराकडून सुरू आहे.

सोनपेठ तालुक्यातील प्रमुख महामार्ग असलेल्या पाथरी ते परळी वैजनाथ या राष्ट्रीय महामार्गाची सोनपेठ ते धामोणी फाटा दरम्यान ५४८ ब ची चाळणी झाली आहे. रस्त्यावरून वाहन चालवताना आणेक लहान-मोठे अपघात घडत आहेत. तर येथून वाहन चालविताना चालकाला आपला जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागते. दुचाकी घसरणे, महामंडळाच्या एसटी बसचे टायर फुटणे, पाटे तुटणे याबरोबरच खाजगी चार चाकी वाहने खड्ड्यांमध्ये आदळून नुकसान होणे यासारखे अपघातात आता नित्याचेच झाले आहेत. या मार्गावरून दररोज ये-जा करणाऱ्या अनेक नागरिकांना मनक्यांचे आजार जडल्याचे दिसून येत आहेत. या महामार्गाची झालेली अत्यंत दयनीय अवस्था पाहून याबाबतीत अनेक पत्रकारांनी



आपल्या बातमीच्या माध्यमातून ही बाब प्रशासनापर्यंत नेऊन पोहोचवली होती. त्या अनुषंगाने गेले दोन महिन्यापूर्वी अर.बी. घोडके इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीकडून धामोनी फाटा ते सोनपेठ पर्यंत खड्डे बुजविण्यात आले होते. त्यावेळी खड्ड्यामध्ये माती मिश्रित खपची टाकून त्यावर कुठलीही दबई न करता थातूरमातूर पद्धतीने बुजविलेले खड्डे पुढे पंधरा दिवस ही टिकले नाहीत ते पूर्णतः उखडून गेले त्यामुळे खड्डे बुजवून येथील नागरिकावर उपकारच केला की काय? असे नागरिकांतून बोलल्या जात आहे परत पुन्हा एकदा संबंधित गुत्तेदाराकडून याच मार्गावरी दुसऱ्यांदा उखडलेले खड्डे बुजविण्याचे काम सध्या सुरू आहे. आताही पूर्वीसारखेच माती मिस्त्री कच्ची खड्ड्यामध्ये टाकून मधुरा कडून मागून घेतली जात आहे त्यामुळे करून मुरूम टाकून पुन्हा दवई न करताथातूरमातूरमातूर बुजवलेले खड्डे पुढे किती दिवस टिकणार याबाबत नागरिकांतून शंका उपस्थित केल्या जात आहे.

# अमित बघेल यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

## हिंगोलीत सिंधी समाजाकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ नोव्हेंबर**

छत्तीसगड राज्यातील नेते अमित बघेल यांनी सिंधी समाज, अग्रवाल समाज व इतर समाजाबद्दल अपमानास्पद वक्तव्य केल्याचा सिंधी समाजाच्यावतीने तीव्र निषेध करण्यात आला असून अमित बघेल यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी सिंधी पंचायत समितीच्यावतीने निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवाड यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

अमित बघेल यांनी छत्तीसगडमध्ये सोशल मिडीया आणि मिडीयामध्ये अग्रवाल समाज तसेच सिंधी समाजाबद्दल अपमानास्पद वक्तव्य केले आहे. अग्रवाल समाजाचे महाराजा श्री अग्रसेन यांच्याबद्दलही अपमानास्पद वक्तव्य केल्यामुळे अग्रवाल समाजाने तीव्र निषेध करीत जिल्हाधिकारी यांचेमार्फत राष्ट्रपतीना निवेदन सादर केले होते. अमित बघेल यांच्यावर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती.

गुरूवारी सिंधी पंचायत समितीच्यावतीने उपाजिल्हाधिकारी बोधवाड यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात अमित बघेत यांनी सिंधी समाज आणि अग्रवाल समामाचे आराध्य दैवत भगवान वरूणदेवाचे अवतार व सिंधी समाजाची आस्थेचे प्रतीक असलेले श्री झुलेलाल भगवान व संपूर्ण सिंधी सामाजाविरूध्द अपशब्द व अपमानास्पद वक्तव्य केले आहे. या वक्तव्यामुळे जातीय तेढ निर्माण होत असून अमित बघेल यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी सिंधी पंचायत समितीच्यावतीने करण्यात आली आहे. याप्रसंगी संपूर्ण सिंधी समाजातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# कळमनुरी, औंढ्यात अवैध वाळूचे टिप्पर पोलिसांनी पकडले

## दोन टिप्परसह ४० लाखांचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ नोव्हेंबर**

हिंगोली पोलिसांकडून जिल्ह्यात नाकाबंदी करण्यात आली असून औंढा नागनाथ बसस्थानकासमोर नाकाबंदी दरम्यान अवैध वाळू वाहतुक करणारे टिप्पर पोलिसांनी जप्त केले तर कळमनुरी तालुक्यातील गांगापूर फाटा येथे पोलिसांनी अवैध वाळूचे टिप्पर वाळू सह जप्त केले आहे. या दोन्ही कारवाईमध्ये पोलिसांनी सुमारे ४० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

हिंगोली जिल्ह्यात पोलिस विभागाच्यावतीने अवैध धंद्याविरोधात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी धडक मोहीम उघडली असून जिल्ह्यात रात्री सर्वत्र नाकाबंदी करण्यात आली असून वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. दि १२ नोव्हेंबर रोजी औंढा नागनाथ शहरातील बसस्थानकासमोर रात्री १२ च्या सुमारास पोलिसांनी अवैध वाळूची वाहतुक करणारे टिप्पर क्र एमएच ३८ एक्स ४०८३ पकडले. पोलिसांनी टिप्परची तपासणी केली असता २ ब्रास वाळू अवैधरित्या विनापरवाना चोरटी वाहतुक करून विक्री करिता घेवून जात असतांना आढळले. याप्रकरणी पोउपनि शेख खुद्दुस शेख लाल यांच्या फिर्यादीवरून चालक रतन मधुकर साखरे रा औंढा नागनाथ आणि मालक नागनाथ दत्तराव कुटे यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीकडून १५ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दुसऱ्या एका घटनेत कळमनुरी तालुक्यातील गांगापूर फाटा रोडवर दि १२ नोव्हेंबर रोजी रात्री ९ च्या सुमारास पोलिसांनी टिप्पर क्र एम एच २६ सीएच १६६१ ची तपासणी केली असता या टिप्परमध्ये पोलिसांना ५ ब्रास अवैधपणे विनापरवाना वाळूची चोरटी वाहतुक करीत असतांना आढळून आले. याप्रकरणी ग्राम महसूल अधिकारी विशाल पतंगे यांच्या फिर्यादीवरून कळमनुरी पोलिस ठाण्यात सोमनाथ आत्माराम शिंदे रा नावलगाव, विलास धुतडे, कुणाल मुंजाजी धुतडे यांचयवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी दोघांना अटक केली आहे तसेच त्यांच्याकडून सुमारे २४ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# नियमांविरूध्द गेल्यास ढाबे, बार चालकांवर होणार कारवाई- कोकाटे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ नोव्हेंबर**

सध्या हिंगोली जिल्ह्यात नगर पालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. तसेच ग्रामीण भागात जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी राजकीय वर्तुळात हालचाली सुरू झाल्या आहेत. या अनुषंगाने जिल्ह्यातील ढाबे आणि बारवर मोठ्या प्रमाणावर कार्यकर्त्यांची गर्दी होत असून विनापरवना ढाबेवर दारू विक्री होत आहे तसेच उशिरापर्यंत बार खुले राहत असल्याचे दिसत आहे. यासंदर्भात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी संबंधित पोलिस ठाण्यांना नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ढाबे व बार चालकांवर कारवाई करण्याचे तोंडी आदेश दिले आहेत.

सध्या नगर पालिका तसेच आगामी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून राजकीय कार्यकर्ते दिवसभराच्या थकव्यानंतर रात्री शहरालगतच्या धाब्यावर, बारवर गर्दी करीत असतांना दिसत आहेत. रात्री उशिरापर्यंत ढाबे आणि बारवर मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून वाहने उभी केली जात आहेत.

हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी तसेच वसमत नगर पालिकेच्या निवडणुकासाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. प्रभागात इच्छुक उमेदवार त्यांच्या प्रभागात घरोघरी भेटी देत आहेत तसेच त्यांच्या सोबत कार्यकर्ते आणि पदाधिकारी देखील फिरत असल्यामुळे दिवसभरात त्यांची दमछाक होत असतांना दिसत आहेत. उमेदवार कार्यकर्त्यांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी विविध युक्त्या करीत आहे. तसेच प्रभागातील मतदारांना विकासाचे आश्वासन देत असतांना दिसत आहेत. आणखी प्रमुख राजकीय पक्षाचे उमेदवार जाहीर न झाल्यामुळे उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुक उमेदवार समर्थकांची संख्या वाढविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत असतांना दिसत आहे. जिल्ह्यातील तीनही नगर पालिकेची रणधुमाळी जोरात सुरू झाली असून सकाळी उठल्यापासून ते रात्री उशिरापर्यंत राजकीय पक्षाचे पुढारी, नेते, पदाधिकारी गाठीभेटी घेत असतांना दिसत आहेत.

ग्रामीण भागातही आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका होणार असल्यामुळे इच्छुक उमेदवार गावोगावी फिरत आहेत तसेच रात्री ढाबे किंवा बारवर उशिरापर्यंत बसत आहेत.



**हिंगोली- शहरातील अतिप्राचीन जलेश्वर तलाव पावसामुळे पूर्णपणे भरला असून या तलावाचे सौंदर्यीकरण आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या पाठपुराव्यामुळे पूर्ण झाले आहे. शहरातील मध्यभागी असलेल्या या तलावाला संरक्षणभिंत तसेच सर्व बाजूंनी रस्ता तसेच तलावाच्या काठाला विद्युत रोषणाई केल्यामुळे तलावाचे नयनरम्य असे चित्र रात्रीच्यावेळी दिसत आहे. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### शनिवारीही उमेदवारी अर्ज दाखल करता येणार

हिंगोली- नगर पालिका निवडणुकीसाठी शनिवार दि १५ नोव्हेबर रोजीही उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. याबाबत राज्य निवडणुक आयोगाने जिल्हा प्रशासनाकडे पत्र पाठवून सदर बाब स्पष्ट केली आहेत. दि १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर या कालावधीत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. तर दि १८ नोव्हेंबर रोजी छाननी, दि २१ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. परंतु रविवारी दि १६ ला सुट्टीच्या दिवशी उमेदवारी अर्ज स्विकारले जाणार नाहीत. शनिवारी १५ नोव्हेंबरला सुट्टीच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करता येणार किंवा नाही असा संभ्रम निर्माण झाला होता. यासंदर्भात राज्य निवडणुक आयोगाकडे बहुतांश जिल्ह्याकडून विचारणा केली जात होती. त्यानंतर राज्य निवडणुक आयोगाने तातडीने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना पत्र पाठविले आहे. यामध्ये दि १५ नोव्हेंबर शनिवारी अकरा ते दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज स्विकारले जावेत अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

### कुमार-कुमारी गट निवड चाचणीचे आयोजन

हिंगोली- हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने व श्रीगणेश मिल्ट्री फाउंडेशनच्या सौजन्याने हिंगोली जिल्हा कुमार व कुमारी गट निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२५ ते २९ नोव्हेंबर २०२५ रोजी पुणे येथे होणाऱ्या ५२ व्या कुमार व कुमारी गट महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी या जिल्हा स्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. हिंगोली जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, क्रीडा मंडळाच्या खेळाडूंनी दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता शीगणेश मिल्ट्री फाउंडेशन,टोकाई परीसर येथे स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित रहावे. कुमार गट मुली जन्म दि.२९ डिसेंबर २००५ व त्यानंतर जन्मलेले, वजन ६५ कि. असावे.कुमार गट मुले जन्म दि.१८ जानेवारी २००६ व त्यानंतर जन्मलेले व वजन ७५ कि. असावे स्पर्धेत संघांना प्रवेश फीस संघासाठी ३०० रूपये फीस राहील. सध्या ज्या शाळेत किंवा कॉलेजला शिकत असेल तेथील बोनाफाईडवर फोटोसह मुख्याध्यापकांच सही व शिक्का असावा.त्यावर शाळा/ कॉलेज चा युडायस नंबर व विद्यार्थ्याचा युडायस नंबर असावा. खेळाडूचा जन्म दाखला नसल्यास तो इयत्ता पहिलीमध्ये ज्या शाळेत शिकत होता त्या शाळेच्या इयत्ता पहिली च्या प्रवेश जनरल रजिस्टर ची साक्षांकित प्रत व त्यावर फोटो लावून मुख्याध्यापकांच्या सहिने प्रमाणित केलेला असावा. चाचणीला येताना खेळाडू चे आधार कार्ड अपडेट असणे आवश्यक आहे. वरील कागदपत्रे नसतील तर संबंधित खेळाडूंचे वजन करून घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी. संघ व्यवस्थापक व खेळाडूंनी अतिरिक्त माहितीसाठी डॉ.शिवशंकर कापसे मो.९०४९४९१३८५ कृष्णा बागल मो.९७३०९७८८६४ संपर्क करावा. स्पर्धेत जास्तीत जास्त संघाने सहभाग घ्यावा असे आवाहन असे आवाहन हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष माजी खासदार ॲड शिवाजीराव माने , उपाध्यक्ष बंडु पाटील, सरकार्यवाह प्रा. डॉ.नवनाथ लोखंडे, सहसचिव दिलीपराव बांगर, कोषाध्यक्ष मेजर पंढरीनाथ घुगे व सर्व कार्यकारणी सदस्य यांनी केले आहे.

# शांताबाई दराडे विद्यालयात आ. संतोष बांगर यांची भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ नोव्हेंबर**

सध्या नगर पालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली असून गुरूवारी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा आ. संतोष बांगर यांनी येथील श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयाला भेट दिली.

यावेळी नगर पालिका कर्मचारी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विश्वनाथ घुगे, मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे, गुड्डु बांगर, गजानन बांगर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आ. संतोष बांगर यांनी शाळेतील शिक्षक आणि शिक्षिका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. तसेच आगामी निवडणुकीत शिवसेनेला मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आ. बांगर यांचा सत्कार केला.

# हिंगोलीत चार जणांनी केले नामनिर्देशन पत्र दाखल





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ नोव्हेंबर**

हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी तसेच वसमत नगर पालिकेच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास दि १० नोव्हेंबरपासून सुरूवात झाली आहे. दि १३ नोव्हेंबर रोजी चार जणांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले आहेत.

हिंगोली, कळमनुरी आणि वसमत या तीनही नगर पालिकेची निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. निवडणुक विभागाच्यावतीने उमेदवारी अर्ज भरण्यासाठी दि १० नोव्हेंबरपासून सुरूवात करण्यात आली आहे. परंतु मागील दोन दिवसात एकाही उमदेवाराने उमेदवारी अर्ज दाखल केला नव्हता. निवडणुक विभागातर्फे जय्यत तयारी करण्यात आली आहे परंतु दि १३ नोव्हेंबर रोजी हिंगोली नगर पालिका निवडणुकीसाठी चार जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. उपविभागीय अधिकारी समाधान घुटकडे आणि मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी उमेदवारी अर्ज स्विकारले आहेत. यामध्ये अनिता उमेश गुठ्ठे, निधी संजय गोरे, शाम आंबादास कदम, राम आंबादास कदम यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

प्रमुख राजकीय पक्ष भारतीय जनता पक्ष, शिंदे शिवसेना, उबाठा शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गट तसेच कॉंग्रेस या प्रमुख राजकीय पक्षांनीअद्याप त्यांचे उमेदवार निश्चित न केल्यामुळे सध्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी गर्दी होत नसून पुढील दोन तीन दिवसांत मोठ्या प्रमाणावर सर्वच प्रमुख राजकीय पक्ष उमेदवारी देण्याच्या तयारीत आहेत. हिंगोलीत भाजप आणि शिवसेना शिंदे गट आमनेसामने आल्यामुळे राजकीय पेच निर्माण झाला असून उमेदवारी देतांना दोन्हीही पक्ष विजयाची समीकरणांची जुळवाजुळव करीत असतांना दिसत आहेत.

# कापसाची किमान आधारभूत किंमतीने खरेदीची प्रक्रिया पार पाडण्यासाठी जिल्ह्यात ४ स्थानिक निगराणी समित्या स्थापन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ नोव्हेंबर**

हमी दराने कापूस विक्री करण्यासाठी हंगाम सन २०२५-२६ मध्ये भारतीय कापूस (कपास) निगम लिमिटेड यांनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पूर्व नोंदणी करण्यासाठी कापूस किसान मोबाईल ॲप्लीकेशन सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.

या ॲपद्वारे शेतकऱ्यांच्या जमिनीच्या नोंदी आणि कापूस लागवड क्षेत्राच्या तपशीलांची पडताळणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी व राज्यातील कापसाची किमान आधारभूत किंमतीने खरेदीची कार्यवाही करण्यासाठी व राज्यातील कापसाची किमान आधारभूत किंमतीने खरेदीची कार्यवाही प्रभावी व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी कापूस उत्पादक क्षेत्रात तालुकास्तरावरील अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून स्थानिक सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

भारतीय कपास निगम लिमिटेड औरंगाबाद यांनी किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत सन २०२५-२६ या हंगामामध्ये भारतीय कपास निगम लिमिटेड यांच्यामार्फत कापूस खरेदीसाठी हिंगोली जिल्ह्यात ४ खरेदी केंद्राच्या ठिकाणी स्थानिक निगराणी समित्यांची स्थापना केली आहे.

हिंगोली येथील कापूस खरेदी केंद्रावर तहसीलदार श्रीकांत भुजबळ (९६५७७१९४७४) यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक निगराणी समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये सदस्य सचिव म्हणून सहायक निबंधक सहकारी संस्था एम. यु. यादव (९४२०४३३८३८) यांची तर तालुका कृषी अधिकारी शिवसंदीप रणखांब (८७६६४०३१७९), भारतीय कपास निगम लि.चे केंद्र प्रमुख उमेश डाबेराव (८०७४६५२७५०), कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव एन. बी. पाटील (९९२३८१०८५३) यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

वसमत येथील कापूस खरेदी केंद्रावर तहसीलदार शारदा दळवी (९६२३६०२१७३) यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक निगराणी समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये सदस्य सचिव म्हणून सहायक निबंधक सहकारी संस्था के. एम. कलेटवाड (८९७५९४३१११) यांची तर तालुका कृषी अधिकारी सुनिल भिसे (७५८८०१८६६७), भारतीय कपास निगम लि. चे केंद्र प्रमुख उमेश डाबेराव (८०७४६५२७५०), कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव एस. एन. शिंदे (९९२११२१५८७) यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर कापूस खरेदी केंद्रावर तहसीलदार जिवककुमार कांबळे (८६९८९९५०९२) यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक निगराणी समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये सदस्य सचिव म्हणून सहायक निबंधक सहकारी संस्था ए.डी.गुठ्ठे (७०२०४७५८३४) यांची तर तालुका कृषी अधिकारी के. एम. जाधव (७५८८१५३१५०), भारतीय कपास निगम लि.चे केंद्र प्रमुख उमेश डाबेराव (८०७४६५२७५०), आखाडा बाळापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव एन. आर. सावळे (९३७००७०९४३) यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

औंढा नागनाथ तालुक्यातील जवळा बाजार कापूस खरेदी केंद्रावर तहसीलदार हरीष गाडे (९१५८५८४५७७) यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक निगराणी समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये सदस्य सचिव म्हणून सहायक निबंधक सहकारी संस्था ए.डी.गुठ्ठे (७०२०४७५८३४) यांची तर तालुका कृषी अधिकारी श्री. संगेकर (८४०८८४०४८७), भारतीय कपास निगम लि.चे केंद्र प्रमुख उमेश डाबेराव (८०७४६५२७५०), जवळा बाजार कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव एस. एस. डोळस (७८८८२८२८२६) यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

स्थानिक निगराणी समितीने भारतीय कपास निगम लिमिटेडच्या तालुक्यातील कापूस खरेदी केंद्रावर कपास किसान ॲपद्वारे शेतकऱ्यांच्या नोंदणीमधील अडचणीची सोडवणूक करणे, कपास किसान ॲपबाबत प्रसिध्दी देणे, कापूस खरेदी प्रक्रियेवर देखरेख ठेवणे, शेतकऱ्यांच्या प्राप्त तक्रारी निकाली काढणे, शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी विशेष हेल्पाईन किंवा व्हॉटस्अप क्रमांक उपलब्ध करुन देणे, स्थानिक निगराणी समितीच्या दरमहा सभा आयोजित करणे, कापूस खरेदीबाबत वरिष्ठ कार्यालयाशी समन्वय साधून अहवाल सादर करणे इत्यादी स्वरुपाचे कामकाज करावेत, असे आदेश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले आहेत.